


Karl Marx, Friedrich Engels, Vladimir Lenin, Joseph Stalin, Enver Hoxha

**5 Classics of Marxism**

Comintern (Stalinist-Hoxhaists)

**http://ciml.250x.com**




Georgian Section

**www.joseph-stalin.net**

**SHMG Press** – 2012

Karl Marx Press of the Georgian section of

Comintern (SH) – Stalinist-Hoxhaists Movement of Georgia

कार्ल मार्क्स
फ्रेडरिक एंगल्स




# कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा


"नवीन जागतिक दृष्टिकोण, सामाजिक जीवनाच्या क्षेत्रालाही आपल्या कक्षेंत घेणारा सुसंगत भौतिकवाद, विकासक्रियेसंबंधींचा सर्वांत परिपूर्ण आणि गहन सिद्धांत म्हणजे गतिवाद, वर्गलढ्याचें शास्त्र, तसेंच नव्या साम्यवादी समाजाचा निर्माता जो कामगारवर्ग त्याच्या जागतिक-ऐतिहासिक क्रांतिकारक भूमिकेचें शास्त्र यांची रूपरेषा अलौकिक प्रतिभेस शोभेशा सुगम आणि तेजस्वी शैलीनें या ग्रंथांत मांडलेली आहे."

— **लेनिन**

संपादकः म.वि. श्रोक
टीपांचा अनुवादः म.वि. श्रोक



Karl Marx


F Engels

जगांतील कामगारांनो, एक व्हा!

कार्ल मार्क्स
फ्रेडरिक एंगल्स

# कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा[1]

विदेशी भाषा प्रकाशन गृह
मॉस्को

# संपादकीय

'कम्युनिस्ट पार्टीच्या जाहिरनाम्याचे' हें मराठी भाषांतर इ. स. १८८८ मध्यें फ्रे. एंगल्सनें संपादन केलेल्या इंग्लिश आवृत्तीवरुन करण्यांत आलेले आहे. वरील इंग्लिश आवृत्तीमध्यें व सन १८९० च्या जर्मन आवृत्तीमध्यें फ्रे. एंगल्सच्या ज्या टीपा आहेत त्यांचाही समावेश या भाषांतरांत करण्यांत आलेला आहे.

'जाहिरनाम्याच्या' मूळ लेखकांनीं त्याच्या आवृत्त्यांना वेळोवेळीं ज्या प्रस्तावना लिहिल्या होत्या त्याही वाचकांना या भाषांतरांत सापडतील.

# अनुक्रमणिका

पृष्ठ

१८७२ च्या जर्मन आवृत्तीची प्रस्तावना . . . . . . . . . . . . . . ७

१८८२ च्या रशियन आवृत्तीची प्रस्तावना . . . . . . . . . . . . . . १०

१८८३ च्या जर्मन आवृत्तीची प्रस्तावना . . . . . . . . . . . . . . १३

१८८८ च्या इंग्लिश आवृत्तीची प्रस्तावना . . . . . . . . . . . . . . १५

१८९० च्या जर्मन आवृत्तीची प्रस्तावना . . . . . . . . . . . . . . २३

१८९२ च्या पोलिश आवृत्तीची प्रस्तावना . . . . . . . . . . . . . . ३१

१८९३ च्या इटालियन आवृत्तीची प्रस्तावना . . . . . . . . . . . . . ३४

कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा

[१] भांडवलदार व कामगार . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३८

[२] कामगार व कम्युनिस्ट . . . . . . . . . . . . . . . . . . . . ५७

[३] समाजसत्तावादी व कम्युनिस्ट वाङ्मय . . . . . . . . . . . . . ७०

(१) प्रतिगामी समाजसत्तावाद . . . . . . . . . . . . . . . . . ७०

(अ) सरंजामदारी समाजसत्तावाद . . . . . . . . . . . . . . . ७०

पृष्ठ

**(आ) मध्यमवर्गीय समाजसत्तावाद** . . . . . . . . . . . . . . . ७३

**(इ) जर्मन अथवा 'अस्सल' समाजसत्तावाद** . . . . . . . . . . . ७४

**(२) पुराणवादी अथवा भांडवलदारी समाजसत्तावाद** . . . . . . . ७९

**(३) टीकात्मक व मनोराज्यमय समाजसत्तावाद आणि कम्युनिझम** . . ८१

[४] सध्यांच्या निरनिराळ्या सरकारविरोधी पक्षांच्या बाबतींत कम्युनि-
स्टांची भूमिका . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ८५

**टीपा** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ८८

# मार्क्स-एंगल्सच्या प्रस्तावना

## १८७२ च्या जर्मन आवृत्तीची प्रस्तावना

'कम्युनिस्ट लीग'[2] हा कामगारांचा आंतरराष्ट्रीय संघ होता. त्या काळांतील परिस्थितींत तो एक गुप्त संघटना म्हणूनच कार्य करूं शकत होता. कम्युनिस्ट पक्षाचे सिद्धांत व कार्य ह्याविषयीं एक सविस्तर कार्यक्रम प्रसिद्ध करण्याच्या उद्देशानें तो लिहिण्याची कामगिरी लंडन येथें नोव्हेंबर १८४७ मध्यें भरलेल्या परिषदेंत ह्या कम्युनिस्ट लीगनें आमच्यावर सोंपविली. प्रस्तुत 'जाहिरनामा' अशा रीतीनें जन्मास आला. त्याचें हस्तलिखित 'फेब्रुआरी क्रांती' च्या* कांहीं आठवडे अगोदर लंडन येथें छपाईसाठीं येऊन पोंचलें. प्रथम तो जर्मन भाषेंत प्रसिद्ध झाला, व त्याच भाषेंत त्याच्या निदान बारा निरनिराळ्या आवृत्त्या जर्मनी, इंग्लंड व अमेरिका या देशांत प्रसिद्ध झाल्या आहेत. तो इंग्लिश भाषेंत प्रथम १८५० सालीं लंडनच्या 'रेड रिपब्लिकन' पत्रांत प्रसिद्ध झाला; तें भाषांतर मिस् हेलेन मॅकफार्लेन हिनें केलें होतें. नंतर १८७१ सालीं अमेरिकेंत त्याचीं निदान तीन निरनिराळीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं. फ्रेंच भाषांतर प्रथम पॅरिसमध्यें १८४८ च्या जूनच्या बंडाच्या थोडे दिवस अगोदर प्रसिद्ध झालें, व अलीकडे न्यू यॉर्क येथील 'ल सोशियालिस्त' या पत्रांत ही तें प्रसिद्ध झालें आहे. नवें भाषांतर तयार होत आहे. जर्मन भाषेंत हा 'जाहिरनामा' प्रथम प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसांत लंडन येथें पोलिश भाषांतर

---

*म्हणजे फ्रांसमध्यें फेब्रुआरी १८४८ मध्यें झालेल्या क्रांतीच्या – संपादक

प्रसिद्ध झालें. १८६० ते ७० मधल्या काळांत जिनीव्हा येथें रशियन भाषांतर प्रसिद्ध झालें. डॅनिश भाषेंतसुद्धां त्याचें भाषांतर पहिली जर्मन आवृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तयार झालें.

गेल्या पंचवीस वर्षांत परिस्थिति कितीहि बदलली असो, ह्या जाहिरनाम्यांत नमूद केलेलीं सर्वसाधारण तत्त्वें एकंदरीनें पाहतां आजसुद्धां पूर्वीइतकींच बरोबर आहेत. कदाचित् एकादा तपशिलाचा मुद्दा मधूनमधून सुधारतां येईल. कोणत्याहि ठिकाणीं व कोणत्याहि काळीं हीं तत्त्वें प्रत्यक्ष व्यवहारांत कशीं लागू करावयाचीं, हें तत्कालीन ऐतिहासिक परिस्थितीवर अवलंबून राहील. खुद्द जाहिरनाम्यांतहि हेंच सांगितलें आहे. म्हणून विभाग २ च्या शेवटीं जे क्रांतिकारक उपाय सुचविले आहेत त्यांना स्वयंपूर्ण मानण्याचें कांहींच कारण नाही. त्या भागाची मांडणी बऱ्याच बाबतींत आज अगदीं निराळी करावी लागेल. १८४८ नंतरच्या काळांत भारी उद्योगधंद्यांची फारच प्रचंड प्रगति झाली आहे व त्याच बरोबर कामगारवर्गाच्या पक्ष संघटनेंचीही वाढ झाली आहे; या गोष्टीं लक्ष्यांत घेतां, तसेंच फेब्रुआरी क्रांतीमध्यें व त्याहूनहि जास्त प्रमाणांत पॅरिस कम्यूनमध्यें जो प्रत्यक्ष अनुभव आला तो लक्ष्यांत घेतां, ह्या कार्यक्रमांतील कांहीं तपशिलाचे मुद्दे आतां जुनाट ठरले आहेत. पॅरिस कम्यूनमध्यें कामगारवर्गाच्या हातांत दोन सबंध महिने राजकीय सत्ता होती. कम्यूननें विशेषतः एक गोष्ट सिद्ध केली व ती म्हणजे: "कामगारवर्ग पूर्वीचें राज्यसत्तेचें यंत्र केवळ जसेंच्या तसें कबजांत घेऊन स्वतःच्या कामासाठीं वापरूं शकत नाहीं." (१८७१ सालीं लंडन येथें प्रसिद्ध झालेल्या 'फ्रान्समधील यादवी युद्ध' आंतरराष्ट्रीय कामगार संघाच्या जनरल कौन्सिलचें निवेदन, या पुस्तकांत हा मुद्दा अधिक विस्तारपूर्वक मांडला आहे.) तसेंच जाहिरनाम्यांत समाजसत्तावादी वाङ्मयावर जी टीका केली आहे ती १८४७ सालापर्यंतचीच असल्यामुळें आजच्या दृष्टीनें अपुरी आहे, हें उघडच होय. निरनिराळ्या सरकारविरोधी पक्षांशीं कम्युनिस्टांचा संबंध कोणता असावा ह्यासंबंधीं विभाग ४ मध्यें जीं विधानें केलीं आहेत, तींही तत्त्वतः अजून बरोबर असलीं तरीं तपशीलांत आतां लागू नाहींत. कारण राजकीय परिस्थिति पूर्णपणें बदलली

आहे व त्या भागांत उल्लेख केलेले बहुतेक राजकीय पक्ष इतिहासाच्या महापुरांत गडप झाले आहेत.

पण हा 'जाहिरनामा' एक ऐतिहासिक लेख झाला असल्यामुळें त्याच्यांत कोणताहि फेरफार करण्याचा आम्हांला आतां हक्क पोंचत नाहीं. पुढील एकाद्या आवृत्तींत १८४७ पासून आतांपर्यंतच्या काळाचा परामर्श घेणारी प्रस्तावना कदाचित् घालतां येईल; पण प्रस्तुत पुनर्मुद्रण अनपेक्षित घाईनें तयार करावें लागल्यामुळें अशी प्रस्तावना लिहिण्यास ह्या खेपेस आम्हांला वेळ मिळाला नाहीं.

लंडन, कार्ल मार्क्स
ता. २४ जून १८७२. फ्रेडरिक एंगल्स

# १८८२ च्या रशियन आवृत्तीची प्रस्तावना

'कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा' ह्या पुस्तकाची बकूनिन यानें भाषांतर केलेली रशियन आवृत्ति 'कोलोकोल'[3] पत्राच्या छापखान्यानें १८६३* च्या सुमारास प्रसिद्ध केली. ही साहित्यक्षेत्रांतील एक कांहींशी असाधारण घटना आहे, ह्या व्यतिरिक्त पश्चिम यूरोपमधील लोकांना ह्या रशियन आवृत्तीचें कोणतेंच महत्त्व दिसूं शकलें नाहीं. पण आज अशा दृष्टीनें पाहणें अशक्य होईल.

डिसेंबर १८४७ मध्यें कामगार चळवळीचा व्याप फारच मर्यादित होता, हें 'जाहिरनाम्या'च्या शेवटच्या विभागावरून अत्यंत स्पष्टपणें दिसून येतें. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या सरकारविरोधी पक्षांच्या बाबतींत कम्युनिस्टांची भूमिका काय आहे, ह्याचें विवेचन त्या विभागांत दिलें आहे. रशिया व अमेरिका (युनायटेड स्टेट्स) या दोन देशांचा उल्लेख मात्र त्यांत नेमका नाहीं. त्या वेळीं रशिया हा यूरोपमधील सर्व प्रतिगाम्यांचा अखेरचा प्रचंड बालेकिल्ला होता. त्याच वेळीं, यूरोपमध्यें जरूरीपेक्षां जास्त संख्येंत असलेले कामगार देशांतर करून अमेरिकेंत जात

---

*ही पहिली आवृत्ति १८६९ सालीं प्रसिद्ध झाली होती. १८८८ च्या इंग्रजी आवृत्तीला एंगल्सनें लिहिलेल्या प्रस्तावनेंत जाहिरनाम्याच्या ह्या रशियन अनुवादाच्या प्रकाशनाची तारीख चुकीची दिलेली आहे.

— संपादक

होते व तेथें त्याची सोय होत होती. हे दोन्ही देश यूरोपला कच्चा माल पुरवीत, व त्याचवेळीं हे देश म्हणजे यूरोपच्या कारखान्यांतील माल विकण्याच्या बाजारपेठाही होत्या. म्हणून ह्या ना त्या परीनें हे दोन्ही देश यूरोपमधील विद्यमान समाजव्यवस्थेचे आधारस्तंभ होते.

परंतु आज किती निराळें दृश्य नजरेस पडतें! यूरोपमधील लोकांच्या आगमनामुळेंच उत्तर अमेरिका शेतीच्या उत्पादनांत अजस्र वाढ करण्यास लायक झाली, व त्याच्या चढाओढीच्या योगें यूरोपमधील छोटया व बडया जमीन-मालकीचा पायाच हादरून जात आहे. शिवाय यूरोपमधील लोकांच्या आगमनामुळेंच अमेरिकेला आपल्या अफाट नैसर्गिक साधन-सामुग्रीचा उपयोग इतक्या वेगानें व इतक्या मोठ्या प्रमाणावर करतां येत आहे, कीं त्याच्या योगें पश्चिम यूरोपची व विशेषतः इंग्लंडची आतांपर्यंतची औद्योगिक मक्तेदारी आतां लवकरच नष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं. खुद्द अमेरिकेंत ह्या दोन्ही गोष्टींची प्रतिक्रिया क्रांतिकारक रीतीनें झाली आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेचा पाया असलेला जो शेतकरी वर्ग, त्याची लहान व मध्यम प्रमाणांतील जमीन-मालकी अजस्र प्रमाणावरील शेतांच्या चढाओढीमुळें नामशेष होत आहे; त्याच वेळीं औद्योगिक टापूंत प्रथमच मोठ्या संख्येंतील कामगारवर्ग अस्तित्वांत येत आहे व भांडवलाचें केन्द्रीकरण कल्पनातीत प्रमाणांत घडून येत आहे.

आणि आतां रशिया! १८४८-४९ च्या क्रांतींत केवळ युरोपियन राजेरजवाड्यांनाच नव्हे, तर युरोपियन भांडवलदारांनासुद्धां, नुकत्याच जागृत होऊं लागलेल्या कामगारवर्गापासून स्वतःचा बचाव करण्याचा एकमेव मार्ग रशियानें हस्तक्षेप करणें हाच आहे असें आढळून आलें. झारला युरोपियन प्रतिगाम्यांचा अग्रणी म्हणून मान्यता मिळाली. आज तोच झार गात्चीनामध्यें क्रांतीचा युद्धकैदी बनला आहे, आणि रशिया देश यूरोपमधील क्रांतिकारक उठावाचें अग्रदल झाला आहे.

आधुनिक भांडवलदारी मालकी-पद्धतीचा अटळ व निकट विनाश जाहिर करणें, हा कम्युनिस्ट जाहिरनामा ह्या पुस्तकाचा उद्देश होता. पण रशियांत आपणांला दिसून येते कीं भांडवलदारीची वाढ तुफानवेगानें होत असतांना व भांडवलदारी जमीन-मालकी नुकतीच अस्तित्वांत येऊं

लागली असतांना, अर्ध्याहून अधिक जमीन शेतकऱ्यांच्या समाईक मालकीचीच राहिलेली आहे. या पुराणकालीन सामाईक जमीन धारणेचा — रशियन अब्श्शीना* चा पाया आतां जरी फार खिळखिळीत झाला असला तरी, प्रश्न असा उभा राहतो कीं, मूलतः समाज विकासाच्या पहिल्या पायरीवर उभ्या असलेल्या या पद्धतीचें रुपांतर सर्वांत विकसित कम्युनिस्ट जमीनधारणेमध्यें एकदम होऊं शकतें काय? कीं उलटपक्षीं पश्चिम यूरोपच्या इतिहासांत समाईक मालकी नामशेष होण्याचा क्रम जसा घडून आला तसाच तो रशियांतहि प्रथम घडून येणें आवश्यक आहे?

ह्या प्रश्नाला आज एकच उत्तर देतां येईल: जर रशियन क्रांतीच्या मागोमाग पश्चिम यूरोपमध्यें कामगार-क्रांतीचा उठाव होईल व अशा रीतीनें ह्या दोन्ही क्रांत्या एकमेकांना पूरक होतील, तर सध्यां रशियांत असलेल्या जमिनीच्या समाईक मालकींतून कम्युनिस्ट धर्तीची समाईक मालकी अस्तित्वांत येण्याचा संभव आहे.

लंडन, कार्ल मार्क्स
ता. २१ जान्युआरी १८८२. फ्रेडरिक एंगल्स

* अब्श्शीना: **ग्रामसंस्था** — संपादक

# १८८३ च्या जर्मन आवृत्तीची प्रस्तावना

ह्या आवृत्तीच्या प्रस्तावनेवर दुर्दैवानें मला एकट्यालाच सही करावी लागत आहे. कार्ल मार्क्स – यूरप व अमेरिकेचा समग्र कामगारवर्ग दुसऱ्या कोणाहिपेक्षां ज्याचा जास्त ऋणी आहे असा तो पुरुष – हायगेट स्मशानभूमींत विश्रांति घेत आहे आणि त्याच्या थडग्यावर गवतसुद्धां उगवूं लागलें आहे. त्याच्या मृत्यूनंतर 'कम्युनिस्ट जाहिरनामा' पुस्तकांत दुरुस्ती करण्याचा किंवा भर घालण्याचा विचार मनांत आणणें अशक्य आहे. म्हणूनच एक गोष्ट पुन्हा एकदां स्पष्टपणें जाहिर करण्याची मला आवश्यकता वाटते.

'कम्युनिस्ट जाहिरनामा' पुस्तकांत जो मूलभूत विचार सर्वत्र गुंफलेला आहे त्याचें सर्व श्रेय एकट्या मार्क्सलाच दिलें पाहिजे.*

---

*इंग्रजी अनुवादाच्या प्रस्तावनेंत मी लिहिलें आहे, "डार्विनच्या सिद्धांतानें जीवनविज्ञानाच्या बाबतींत जें कार्य केलें तेंच कार्य माझ्या मतें हा सिद्धांत इतिहासाच्या बाबतींत करील. १८४५ च्या पूर्वीं कांहीं वर्षें आम्ही दोघेंहि या सिद्धांताकडे क्रमाक्रमानें येऊं लागलों होतों. हा सिद्धांत शोधून काढण्याच्या दिशेनें मी स्वतंत्रपणें कितपत प्रगति करू शकलो हें माझ्या 'इंग्लंडमधील कामगारवर्गाची परिस्थिति' या पुस्तकावरून सर्वांत चांगले दिसून येईल. १८४५ च्या वसंतऋतूंत मार्क्सची व माझी ब्रुसेल्समध्यें पुन्हा भेट झाली त्यावेळीं त्यानें अगोदरच ह्या सिद्धांताची मांडणी तयार करून ठेवली होती. मी येथें ज्या शब्दांत तो सिद्धांत मांडला आहे, जवळजवळ जितक्याच स्पष्ट शब्दांत त्यानें त्यावेळीं तो माझ्यापुढें मांडला. (१८९० च्या जर्मन आवृत्तीमधील एंगल्सची टीप.)

मी ही गोष्ट यापूर्वी अनेकदां सांगितली आहे ; पण खुद्द जाहिरनाम्याच्या प्रस्तावनेंत ती नमूद करणें आज आवश्यक झालें आहे.

तो मूलभूत विचार असा : आर्थिक उत्पादन व त्यांतून स्वाभाविकपणेंच निर्माण होणारी प्रत्येक ऐतिहासिक युगाची समाजरचना, हाच त्या युगाच्या राजकीय व बौद्धिक इतिहासाचा पाया असतो. म्हणून (प्राथमिक काळांतील जमिनीची समाईक मालकी नष्ट झाल्यापासूनचा) समग्र इतिहास वर्गलढ्यांचा इतिहास आहे, समाज-विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांत असलेले शासित व शास्ते, पिळले जाणारे व पिळणूक करणारे, यांमधील लढ्यांचाच तो इतिहास आहे. आणि हा लढा आतां अशा अवस्थेला पोंचला आहे कीं पिळला व गांजला जाणारा वर्ग (म्हणजे कामगारवर्ग) पिळणूक, गांजणूक व वर्ग-लढे यांपासून आपणांबरोबर समग्र समाजाची कायमची मुक्तता केल्याशिवाय स्वतःला पिळणूक व गांजणूक करणाऱ्या वर्गापासून (भांडवलदार वर्गापासून) मुक्त करूं शकत नाहीं.

फ्रेडरिक एंगल्स

लंडन,

ता. २८ जून १८८३.

# १८८८ च्या इंग्लिश आवृत्तीची प्रस्तावना

'कम्युनिस्ट जाहिरनामा' हें पुस्तक 'कम्युनिस्ट लीग' या संस्थेचा कार्यक्रम म्हणून प्रसिद्ध करण्यांत आलें. 'कम्युनिस्ट लीग' हा प्रथम जर्मन कामगारांचा संघ होता. मागाहून तो आंतरराष्ट्रीय बनला, आणि १८४८ सालापूर्वी यूरोपखंडांत असलेल्या राजकीय परिस्थितींत त्याला एक गुप्त संस्था म्हणूनच काम करावें लागत होतें. लंडन येथें नोव्हेंबर १८४७ मध्यें भरलेल्या कम्युनिस्ट लीगच्या परिषदेनें पक्षाचे सिद्धांत व कार्य ह्यांविषयीं एक संपूर्ण कार्यक्रम प्रसिद्ध करण्यासाठीं लिहून काढण्याची कामगिरी मार्क्स व एंगल्स यांच्यावर सोंपविली. १८४८ च्या जान्युआरी महिन्यांत तो जर्मन भाषेंत लिहून तयार झाला, व त्याचें हस्तलिखित लंडनमधील मुद्रकाकडे ता. २४ फेब्रुआरीची फ्रेंच क्रांति होण्याच्या थोडे आठवडे अगोदर रवाना करण्यांत आलें. जून १८४८ च्या बंडाच्या थोडे दिवस अगोदर पॅरिस येथें त्याचें फ्रेंच भाषांतर प्रसिद्ध करण्यांत आलें. पहिलें इंग्लिश भाषांतर मिस् हेलन मॅकफार्लेन हिनें केलें होतें व तें १८५० सालीं लंडन येथें जॉर्ज ज्यूलियन हार्नें याच्या 'रेड रिपब्लिकन' पत्रांतून प्रसिद्ध झालें. याखेरीज डॅनिश आवृत्ति व पोलिश आवृत्तिही प्रसिद्ध झाली आहे.

जून १८४८ चें पॅरिस शहरांतील बंड म्हणजे कामगारवर्ग व भांडवलदार वर्ग या दोन वर्गांतील पहिली मोठी लढाई होती. त्या बंडाचा पराभव झाल्यामुळें यूरोपमधील कामगार वर्गाच्या सामाजिक व राजकीय आकांक्षा कांहीं काळपावेतों पुनः दडपल्या गेल्या. त्यानंतरच्या काळांत वर्चस्वासाठीं जो कांहीं लढा झाला तो फेब्रुआरी क्रांतीपूर्व काळाप्रमाणें

मालदार वर्गाच्या निरनिराळ्या विभागांचाच आपसांतील लढा होता. राजकारणांत अगदींच कोंडमारा होऊं न देतां कसेंबसें टिकून राहतां यावें एवढ्याचसाठीं लढण्याची व मध्यमवर्गीय जहालांचा डावा गट म्हणून काम करण्याची पाळी कामगारवर्गावर आली. जेथें जेथें स्वतंत्र कामगार चळवळींनीं आपला जिवंतपणा दाखविण्याचें चालू ठेवलें तेथें तेथें निर्दयपणें त्यांची शिकार करण्यांत आली. उदाहरणार्थ प्रशियन पोलिसांनीं त्यावेळीं कलोन शहरांत असलेल्या कम्युनिस्ट लीगच्या मध्यवर्ती मंडळावर धाड घातली. त्याच्या सभासदांना पकडण्यांत आलें व अठरा महिने तुरुंगांत डांबून ठेवल्यानंतर १८५२ च्या ऑक्टोबरमध्यें त्यांच्यावर खटला सुरू करण्यांत आला. हा सुप्रसिद्ध 'कलोन कम्युनिस्ट खटला' ता. ४ ऑक्टोबर ते ता. १२ नोव्हेंबर पर्यंत चालला, आरोपींपैकीं सातजणांना तीन ते सात वर्षें मुदतीची एका किल्ल्यांत तुरुंगवासांत ठेवण्याची सजा फर्माविण्यांत आली. खटल्याच्या निकालानंतर लगेच बाकीच्या सभासदांनीं औपचारिक रीत्या 'कम्युनिस्ट लीग' चें विसर्जन केलें. 'कम्युनिस्ट जाहिरनाम्या' विषयीं सांगावयाचें म्हणजे तो यापुढें विस्मृतीच्या गर्तेतच खितपत पडणार असें वाटलें.

राज्यकर्त्या वर्गावर फिरून हल्ला चढवितां येण्याइतकी ताकद युरोपच्या कामगारवर्गांत जेव्हां पुनः आली, तेव्हां 'इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन' (आंतरराष्ट्रीय कामगार संघ) ह्या संस्थेचा जन्म झाला. पण ही संस्था 'कम्युनिस्ट जाहिरनाम्यां'त नमूद केलेलीं तत्त्वें एकदम जाहिर करूं शकत नव्हती, कारण युरोप व अमेरिकेंतील समग्र लढाऊ कामगारवर्गाला एकत्रित करून एका संघटनेंत आणणें ह्या खास उद्देशानेंच ती स्थापन झाली होती. इंग्लंडमधील ट्रेड युनियन्स, फ्रान्स, बेलजीयम, इटली व स्पेन या देशांतील प्रुधाँचे अनुयायी, जर्मनींतील लासालचे अनुयायी,* या सर्वांना मान्य होण्यासारखा व्यापक कार्यक्रम

---

*लासाल हा आमच्याशीं बोलतांना आपण मार्क्सचा शिष्य असल्याचें नेहमीं जाहीर करीत असे, व या नात्यानें त्याची भूमिका 'जाहिरनाम्यां' तील तत्त्वांस अनुसरून होती. पण १८६२ ते १८६४ या काळांत

स्वीकारणेंच ह्या 'इंटरनॅशनल' ला प्राप्त होतें. मार्क्सनें हा कार्यक्रम तयार केला व तो सर्व पक्षांना समाधानकारक वाटला. संयुक्त लढा व आपसांतील चर्चा यांच्या योगें कामगारवर्गाचा बौद्धिक विकास अवश्य होईल यावर मार्क्सचा संपूर्ण विश्वास होता. भांडवलशाहीविरोधी लढ्यांतील यशापयशाचे हेलकावे – व यशापेक्षांहीं अपयशाचे धक्के – यांनी कामगारवर्गाला त्याच्या मुक्तीच्या उपायांबद्दल जास्त सखोलपणें विचार करावयास लावणें, व त्यानें उराशी बाळगलेल्या अनेक 'हमखास' उपायांचा फोलपणा शिकवणें, – या दोन्ही गोष्टी सहजच होत्या. व मार्क्सचा असा विश्वास खरा ठरला. १८६४ सालीं 'इंटरनॅशनल' स्थापन झाली त्या वेळचे कामगार व १८७४ सालीं ती विसर्जन पावली त्या वेळचे कामगार यांच्यांत जमीन अस्मानाचें अंतर होतें. फ्रान्समध्यें प्रूधाँचा पंथ व जर्मनींत लासालचा पंथ नामशेष होऊं लागले होते, व इंग्लंडमधील पुराणप्रिय ट्रेड युनियन्सपैकीं बहुतेक युनियन्सनीं यापूर्वी केव्हांच 'इंटरनॅशनल' शीं आपला संबंध जरी तोडून टाकला होता, तरी त्या युनियन्सनींसुद्धां क्रमाक्रमानें प्रगति करीत एवढी मजल गांठली कीं गेल्या वर्षी स्वॉनसी येथील परिषदेंत त्यांच्या अध्यक्षाला "युरोपखंडांतील समाजसत्तावादाचें आम्हांला भय वाटेनासें झालें आहे" असे उद्गार त्यांच्या वतीनें काढतां आलें. खरें सांगावयाचें म्हणजे, सर्व देशांतील कामगारांत 'कम्युनिस्ट जाहिरनाम्या' च्या तत्त्वांचा पुष्कळच प्रसार झाला होता.

अशा रीतीनें खुद्द 'जाहिरनाम्या' ला पुनः एकदां प्रामुख्य प्राप्त झालें. १८५० नंतरच्या काळांत स्वित्झर्लंड, इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत जर्मन भाषेंतील आवृत्तीचें पुनर्मुद्रण अनेकदां झालें होतें. १८७२ सालीं न्यू यॉर्क येथें त्याचें इंग्लिश भाषांतर झालें व तें 'वुडहल अँड क्लॅफ्लिन्स वुइकली' या पत्रांतून प्रसिद्ध झालें. ह्या इंग्लिश भाषांतरावरून

---

सार्वजनिक प्रचार करतांना त्यानें सरकारी कर्जाच्या मदतीनें सहकारी कारखाने उघडण्यांत यावे यापलिकडे कोणतीच मागणी मांडली नाहीं – (एंगल्सची टीप.)

न्यू यॉर्क येथील 'ल सोशियालिस्त' पत्रांत फ्रेंच भाषांतर प्रसिद्ध करण्यांत आलें. त्यानंतरच्या काळांत आणखी निदान दोन इंग्लिश भाषांतरें अमेरिकेंत प्रसिद्ध झालीं आहेत व तीं कमीअधिक प्रमाणांत मोडकींतोडकीं आहेत. त्यापैकीं एकाचें इंग्लंडमध्यें पुनर्मुद्रण करण्यांत आलें आहे. पहिलें रशियन भाषांतर बकूनिन यानें केलें व तें १८६३ च्या सुमारास जिनीव्हा येथें ग्येर्त्सेनच्या 'कोलोकोल' पत्राच्या छापखान्यांत प्रसिद्ध झालें. दुसरे रशियन भाषांतर वेरा झसूलिच या शूर महिलेनें केलें व तेंसुद्धां जिनीव्हा येथें १८८२ सालीं प्रसिद्ध झालें.* कोपेनहेगन येथें १८८५ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'सोशल डेमॉक्रॅटिक बिब्लियोथेक'मध्यें नवी डॅनिश आवृत्ति आढळते. पॅरिसच्या 'ल सोशियालिस्त' पत्रांत १८८५ सालीं नवें फ्रेंच भाषांतर प्रसिद्ध झालें, व त्यावरून स्पॅनिश भाषांतर तयार करून तें मॅड्रिड येथें १८८६ सालीं प्रसिद्ध करण्यांत आलें. जर्मन पुनर्मुद्रणांची मोजदादच करतां येत नाहीं – निदान बारापर्यंत त्यांची संख्या भरेल. आर्मीनियन भाषेंतील भाषांतर कांहीं महिन्यांपूर्वीं कॉन्स्टँटिनोपल येथें प्रसिद्ध व्हावयाचें होतें, पण तें होऊं शकलें नाहीं, व त्याचें कारण मला असें कळतें कीं मार्क्सचें नांव असलेलें पुस्तक प्रसिद्ध करण्याची प्रकाशकाला भीति वाटली, व भाषांतरकारानें तें स्वतःचेंच पुस्तक म्हणून जाहिर करण्यास नकार दिला. इतर भाषांतहि अलीकडे भाषांतरें झाल्याचें मी ऐकलें आहे, पण तीं मी पाहिलेलीं नाहींत. अशा रीतीनें 'कम्युनिस्ट जाहिरनामा' पुस्तकाच्या इतिहासांत आधुनिक कामगार चळवळीचा इतिहास बऱ्याच अंशीं प्रतिबिंबित झाला आहे; आजच्या काळीं ह्या पुस्तकाइतका विस्तृत प्रसार झालेलें, व इतकें आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें, दुसरें कोणतेंहि पुस्तक समग्र समाजसत्तावादी वाङ्मयांत सांपडणार नाहीं. आज हा

---

*पुढें, 'इंटरनॅशनालेस औस देम फोक्ससात' (१८७१-७५), बर्लिन १८९४, यामध्यें लिहिलेल्या "रशियांतील समाजसंबंध" या लेखांत एंगल्सनें स्वतःच ह्या चुकीची दुरुस्ती करून खरा भाषांतरकर्ता प्लेखानोव असल्याचें म्हटलें आहे. – संपादक

'कम्युनिस्ट जाहिरनामा' म्हणजे सैबेरियापासून कॅलिफोर्नियापर्यंत कोटयवधि कामगारांनीं मान्य केलेला संयुक्त कार्यक्रमच होय.

तरीसुद्धां जेव्हां तो लिहिला त्यावेळीं त्याला 'सोशलिस्ट' जाहिरनामा असें नांव आम्हांला देतां आलें नसतें. १८४७ सालीं 'सोशलिस्ट' या शब्दाचा एक अर्थ म्हणजे निरनिराळ्या मनोराज्यमय समाजपद्धतींचे पुरस्कर्ते असा करण्यांत येत असे; उदाहरणार्थ इंग्लंडमध्यें ओवेन याचे अनुयायी, फ्रान्समध्यें फूरिये याचे अनुयायी. हे दोन्ही गट यापूर्वीच रोडावून केवळ चिमुकले पंथ बनले आहेत व क्रमशः मृत्युपंथाला लागले आहेत. तसेंच, 'सोशलिस्ट' हें नांव सामाजिक रोगावर नाना प्रकारच्या जडीबुट्टया सुचविणाऱ्या लोकांनाहि लावण्यांत येत असे; हे लोक भांडवलाला व नफ्याला मुळींच धोका पोंचूं न देतां कांहीं तरी लटपटपंची करून सर्व प्रकारच्या सामाजिक अन्यायांचें निराकरण करण्याचा आव आणीत असत. ह्या दोन्ही अर्थांनीं 'सोशलिस्ट' म्हणविण्यांत येणारे लोक कामगार-चळवळीच्या बाहेर होते, व 'सुशिक्षित' वर्गाच्या पाठिंब्यावर त्यांचा जास्त भर होता. कामगारवर्गातील ज्या विभागानें केवळ राजकीय क्रांत्यांनीं भागणार नाहीं अशी खात्री झाल्यामुळें संपूर्ण सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता जाहिर केली होती, त्यानें त्या काळीं 'कम्युनिस्ट' हें नांव धारण केलें. त्यांचा कम्युनिझम ओबडधोबड स्वरूपाचा व केवळ सहजप्रवृत्तींतून निर्माण झालेला होता; त्यांत रेखीवपणा व सफाई नव्हती; तरीसुद्धां त्यानें मुख्य मुद्दा बरोबर ओळखला होता, व कामगारांत त्याचा प्रभाव इतका दांडगा होता कीं त्यामुळें फ्रान्समध्यें कॅबेट व जर्मनींत वाइटलिंग यांचा मनोराज्यमय कम्युनिझम उदयास आला. अशा रीतीनें १८४७ सालीं सोशालिझम ही एक मध्यमवर्गीय चळवळ होती, व कम्युनिझम ही एक कामगारवर्गीय चळवळ होती. निदान युरोपखंडांत तरी सोशालिझम 'शिष्टसंमत' समजण्यांत येत होता, पण कम्युनिझमची गोष्ट याच्या अगदीं उलट होती. आणि पहिल्यापासूनच आमचें मत "कामगारवर्गाची मुक्तता हें खुद्द कामगारवर्गाचेंच कार्य असलें पाहिजे" असें असल्यामुळें ह्या दोन नांवांपैकीं कोणतें नांव आम्ही घ्यावयाचें याविषयीं आमच्या मनांत संशयाला कांहीं जागा नव्हती. किंवा त्यानंतरच्या

काळांतही हें नांव टाकून देण्याचा विचारसुद्धां आमच्या मनाला कधीं शिवला नाहीं.

'कम्युनिस्ट जाहिरनामा' ही आमची संयुक्त कृति असल्यामुळें येथें एक गोष्ट सांगणें मी आपलें कर्तव्य समजतों, व ती ही कीं ह्या जाहिरनाम्याचा गाभा असलेला मूलभूत सिद्धांत मार्क्सचा आहे. तो सिद्धांत असा: प्रत्येक ऐतिहासिक युगांत आर्थिक उत्पादनाची व विनिमयाची प्रचलित पद्धत, व तिच्यांतून स्वाभाविकपणेंच अस्तित्वांत येणारी समाज-संघटना, यांच्या मूळ पायावरच त्या युगाचा राजकीय व बौद्धिक इतिहास रचला जातो; त्या इतिहासाची उपपत्ति ह्या पायाच्या आधारेंच लावतां येते. म्हणून मानवजातीचा समग्र इतिहास – (म्हणजे ज्यांत जमीन समाईक मालकीची होती अशा आदिकालीन गणसमाजाचें विसर्जन झाल्यापासूनचा इतिहास) – वर्गलढ्यांचाच इतिहास आहे; पिळणारे वर्ग व पिळले जाणारे वर्ग, राज्यकर्ते वर्ग व जुलुमाखालीं चिरडले जाणारे वर्ग, यांच्यामधील सामन्यांचाच तो इतिहास आहे. वर्गलढ्याच्या इतिहासानें आपल्या विकासांत आज हीं पायरी गाठली आहे की पिळल्या जाणाऱ्या शासित वर्ग – कामगारवर्ग – पिळवणूक करणाऱ्या शास्त्यांच्या टांचेखालून आपली मुक्तता केल्याबरोबरच सबंध समाजाची मुक्तता सर्व प्रकारच्या पिळवणु-कीपासून व जुलमापासून व त्याचबरोबर वर्गभेद व वर्गलढे यांपासूनही कायमची होईल.

डार्विनच्या सिद्धांतानें जीवशास्त्राच्या बाबतींत जें कार्य केलें आहे तेंच कार्य हा सिद्धांत इतिहासाच्या बाबतींत करील, असें माझें मत आहे. १८४५ च्या पूर्वीं कांहीं वर्षें आम्ही दोघेहि ह्या सिद्धांताकडे क्रमाक्रमानें येऊं लागलों होतों. हा सिद्धांत शोधून काढण्याच्या दिशेनें मी स्वतंत्रपणें कितपत प्रगति केली होती हें माझ्या 'इंग्लंडमधील कामगारवर्गाची परिस्थिति'* या पुस्तकावरून सर्वांत स्पष्ट दिसून येईल. पण १८४५ च्या

---

*'इंग्लंडमधील कामगारवर्गाची १८४४ मधील परिस्थिति', फ्रेडरिक एंगल्स, भाषांतरकर्त्री: फ्लॉरेंस के. विश्न्येवेत्स्की. प्रकाशक: लॉवेल, न्यू यॉर्क – डब्ल्यू रीवज्, लंडन. १८८८ – एंगल्सची नोट.

वसंतऋतूंत ब्रुसेल्स येथें मार्क्सची व माझी पुनः भेट झाली त्यावेळीं त्यानें त्याची सिद्धांताची मांडणी अगोदरच तयार करून ठेवली होती. मी येथें ज्या शब्दांत तो सिद्धांत मांडला आहे, जवळजवळ तितक्याच स्पष्ट शब्दांत त्यानें त्यावेळीं तो माझ्यापुढें मांडला.

१८७२ च्या जर्मन आवृत्तीला आम्ही लिहिलेल्या संयुक्त प्रस्तावनेंतून मी पुढील उतारा देत आहे :

"गेल्या पंचवीस वर्षांत परिस्थिति कितीहि बदलली असो, ह्या जाहिरनाम्यांत नमूद केलेलीं सर्वसाधारण तत्त्वें एकंदरीनें पाहतां आजसुद्धां पूर्वींइतकींच बरोबर आहेत. कदाचित् एखादा तपशीलाचा मुद्दा मधून मधून सुधारतां येईल. कोणत्याहि ठिकाणीं व कोणत्याहि काळीं हीं तत्त्वें प्रत्यक्ष व्यवहारांत कशीं लागू करावयाचीं, हें तत्कालीन ऐतिहासिक परिस्थितीवर अवलंबून राहील. खुद्द जाहिरनाम्यांतहि हेंच सांगितलें आहे. विभाग २ च्या शेवटीं जे क्रांतिकारक उपाय सुचविले आहेत त्यांना स्वयंपूर्ण मानण्याचें कांहींच कारण नाहीं. त्या भागाची मांडणी बऱ्याच बाबतींत आज अगदीं निराळी करावी लागेल. १८४८ नंतरच्या काळांत उद्योगधंद्यांची फारच प्रचंड प्रगति झाली आहे व त्याचबरोबर कामगारवर्गाच्या पक्ष संघटनेंचीही वाढ झाली आहे; या गोष्टीं लक्ष्यांत घेतां, तसेंच फेब्रुआरी क्रांतीमध्यें, व त्याहूनहि जास्त प्रमाणांत पॅरिस कम्यूनमध्यें, जो प्रत्यक्ष अनुभव आला तो लक्ष्यांत घेतां, ह्या कार्यक्रमांतील कांहीं तपशिलाचे मुद्दे आतां जुनाट ठरले आहेत. पॅरिस कम्यूनमध्यें कामगारवर्गाच्या हातांत दोन सबंध महिने राज्यसत्ता होती. कम्यूननें विशेषतः एक गोष्ट सिद्ध केली व ती म्हणजे : "कामगारवर्ग पूर्वीचें राज्यसत्तेचें यंत्र केवळ जसेंच्या तसें कबजांत घेऊन स्वतःच्या कामासाठीं वापरूं शकत नाहीं" (१८७१ सालीं लंडन येथें प्रसिद्ध झालेल्या 'फ्रान्समधील यादवी युद्ध, आंतरराष्ट्रीय कामगार संघाच्या जनरल कौन्सिलचें निवेदन' लंडन, त्र्यूलोव, पान १५, – यांत हा मुद्दा अधिक विस्तारपूर्वक मांडला आहे.) तसेंच जाहिरनाम्यांत समाजसत्तावादी वाङ्मयाचे जें परीक्षण केले आहे तें १८४७ सालापर्यंतचेच असल्यामुळें आजच्या दृष्टीनें अपुरें आहें, हें उघडच होय. निरनिराळ्या सरकारविरोधी पक्षांशीं कम्युनिस्टांचा संबंध

कोणता असतो ह्यासंबंधी विभाग ४ मध्यें जीं विधानें केलीं आहेत, तीं हीं तत्त्वतः अजून बरोबर असलीं तरी तपशीलांत आतां लागू नाहीत. कारण राजकीय परिस्थिति पूर्णपणें बदलली आहे व त्या भागांत उल्लेख केलेले बहुतेक राजकीय पक्ष इतिहासाच्या महापुरांत गडप झाले आहेत.

"पण हा 'जाहिरनामा' एक ऐतिहासिक लेख झाला असल्यामुळें त्याच्यांत कोणताहि फेरफार करण्याचा आम्हांला आतां हक्क पोंचत नाहीं."

प्रस्तुत भाषांतर मि. सॅम्युएल मूर यांनीं केलें आहे. मार्क्सच्या 'भांडवल' ग्रंथाच्या बहुतेक भागाचें भाषांतर त्यांनींच केलें. आम्ही दोघांनीं मिळून प्रस्तुत भाषांतर दुरुस्त केलें आहे, व मी ऐतिहासिक उल्लेखांचें स्पष्टीकरण करणाऱ्या कांहीं टीपा घातल्या आहेत

लंडन, फ्रेडरिक एंगल्स

ता. ३० जान्युआरी १८८८

# १८९० च्या जर्मन आवृत्तीची प्रस्तावना

वरील मजकूर* लिहून झाल्यानंतर आतां 'जाहिरनाम्या' ची नवी जर्मन आवृत्ति काढणें पुनः जरूरीचें झालें आहे. तसेंच 'जाहिरनाम्या' च्या बाबतींत पुष्कळ घडामोडीदेखील झाल्या आहेत व त्या येथें नमूद करणें योग्य होईल.

जाहिरनाम्याचें दुसरें रशियन भाषांतर – वेरा झसूलिच हिनें केलेलें – १८८२ सालीं जिनीव्हा येथें प्रसिद्ध झालें. त्या आवृत्तीची प्रस्तावना मार्क्स व मी दोघांनीं मिळून लिहिली होती. दुर्दैवानें मूळचें जर्मन हस्तलिखित गहाळ झालें आहे; म्हणून मला रशियनमधून त्याचें पुनः भाषांतर केले पाहिजे.** अर्थात् तें मूळच्या लिखाणापेक्षां जास्त चांगलें असणार नाहीं. ती प्रस्तावना पुढीलप्रमाणें आहे: –

'कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा' ह्या पुस्तकाची बकूनिन यानें भाषांतर केलेली रशियन आवृत्ति 'कोलोकोल' पत्राच्या छापखान्यानें १८६३ च्या सुमारास प्रसिद्ध केली. ही साहित्यक्षेत्रांतील एक कांहींशी

---

*म्हणजे १८८३ च्या जर्मन आवृत्तीची प्रस्तावना.

**जाहिरनाम्याच्या रशियन भाषांतरासाठीं मार्क्स व एंगल्स यांनीं जर्मन भाषेत लिहिलेल्या प्रस्तावनेचें हें गहाळ झालेलें मूळ हस्तलिखित मागाहून सांपडलें असून तें मॉस्को येथील सोवियत कम्युनिस्ट पार्टीच्या केंद्रीय समितीच्या मार्क्स-एंगल्स इन्स्टिटयूटच्या संग्रहालयांत ठेवलें आहे. त्या मूळ हस्तलिखितावरून ह्या प्रस्तावनेचें हें भाषांतर केलेलें आहे. – संपादक.

असाधारण घटना आहे, ह्या व्यतिरिक्त पश्चिम यूरोपमधील लोकांना ह्या रशियन आवृत्तीचें कोणतेंच महत्त्व दिसूं शकलें नाहीं. पण आज अशा दृष्टीनें पाहणें अशक्य होईल.

डिसेंबर १८४७ मध्यें कामगार चळवळीचा व्याप फारच मर्यादित होता, हें 'जाहिरनाम्या' च्या शेवटच्या विभागावरून अत्यंत स्पष्टपणें दिसून येतें. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या सरकारविरोधी पक्षांच्या बाबतींत कम्युनिस्टांची भूमिका काय आहे, ह्याचें विवेचन त्या विभागांत दिलें आहे. रशिया व अमेरिका (युनायटेड स्टेटस) या दोन देशांचा उल्लेख मात्र त्यांत नेमका नाहीं. त्या वेळीं रशिया हा यूरोपमधील सर्व प्रतिगाम्यांचा अखेरचा प्रचंड बालेकिल्ला होता. त्याच वेळीं, यूरोपमध्यें जरूरीपेक्षां जास्त संख्येंत असलेले कामगार देशांतर करून अमेरिकेंत जात होते व तेथें त्याची सोय होत होती. हे दोन्ही देश यूरोपला कच्चा माल पुरवीत, व त्याचवेळीं हे देश म्हणजे यूरोपच्या कारखान्यांतील माल विकण्याच्या बाजारपेठाही होत्या. म्हणून ह्या ना त्या परीनें हे दोन्ही देश यूरोपमधील विद्यमान समाजव्यवस्थेचे आधारस्तंभ होते.

परंतु आज किती निराळें दृश्य नजरेस पडतें! यूरोपमधील लोकांच्या आगमनामुळेंच उत्तर अमेरिका शेतीच्या उत्पादनांत अजस्र वाढ करण्यास लायक झाली, व त्याच्या चढाओढीच्या योगें यूरोपमधील छोटया व बडया जमीन-मालकीचा पायाच हादरून जात आहे. शिवाय यूरोपमधील लोकांच्या आगमनामुळेंच अमेरिकेला आपल्या अफाट नैसर्गिक साधन-सामुग्रीचा उपयोग इतक्या वेगानें व इतक्या मोठ्या प्रमाणावर करतां येत आहे, कीं त्याच्या योगें पश्चिम यूरोपची व विशेषतः इंग्लंडची आतांपर्यंतची औद्योगिक मक्तेदारी आतां लवकरच नष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं. खुद्द अमेरिकेंत ह्या दोन्ही गोष्टींची प्रतिक्रिया क्रांतिकारक रीतीनें झाली आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेचा पाया असलेला जो शेतकरी वर्ग, त्याची लहान व मध्यम प्रमाणांतील जमीन-मालकी अजस्र प्रमाणावरील शेतांच्या चढा-ओढीमुळें नामशेष होत आहे; त्याच वेळीं औद्योगिक टापूंत प्रथमच मोठ्या संख्येंतील कामगारवर्ग अस्तित्वांत येत आहे व भांडवलाचें केन्द्रीकरण कल्पनातीत प्रमाणांत घडून येत आहे.

आणि आतां रशिया! १८४८-४९ च्या क्रांतींत केवळ युरोपियन राजेरजवाड्यांनाच नव्हे, तर युरोपियन भांडवलदारांनासुद्धां, नुकत्याच जागृत होऊं लागलेल्या कामगारवर्गापासून स्वत:चा बचाव करण्याचा एकमेव मार्ग रशियानें हस्तक्षेप करणें हाच आहे असें आढळून आलें. झारला युरोपियन प्रतिगाम्यांचा अग्रणी म्हणून मान्यता मिळाली. आज तोच झार गात्चीनामध्यें क्रांतीचा युद्धकैदी बनला आहे, आणि रशिया देश यूरोपमधील क्रांतिकारक उठावाचें अग्रदल झाला आहे.

आधुनिक भांडवलदारी मालकी-पद्धतीचा अटळ व निकट विनाश जाहिर करणें, हा कम्युनिस्ट जाहिरनामा ह्या पुस्तकाचा उद्देश होता. पण रशियांत आपणांला दिसून येतें कीं भांडवलदारीची वाढ तुफानवेगानें होत असतांना व भांडवलदारी जमीन-मालकी नुकतीच अस्तित्वांत येऊं लागली असतांना, अर्ध्याहून अधिक जमीन शेतकऱ्यांच्या समाईक मालकीचीच राहिलेली आहे. या पुराणकालीन सामाईक जमीन धारणेचा — रशियन 'अबश्शीना'* चा पाया आतां जरी फार खिळखिळीत झाला असला तरी, प्रश्न असा उभा राहतो कीं, मूलतः समाज विकासाच्या पहिल्या पायरीवर उभ्या असलेल्या या पद्धतीचें रूपांतर सर्वांत विकसित कम्युनिस्ट जमीनधारणेंमध्यें एकदम होऊं शकतें काय? कीं पश्चिम यूरोपच्या इतिहासांत समाईक मालकी नामशेष होण्याचा क्रम जसा घडून आला तसाच तो रशियांतहि प्रथम घडून येणें आवश्यक आहे?

ह्या प्रश्नाला आज एकच उत्तर देतां येईल: जर रशियन क्रांतीच्या मागोमाग पश्चिम यूरोपमध्यें कामगार-क्रांतीचा उठाव होईल व अशा रीतीनें ह्या दोन्ही क्रांत्या एकमेकांना पूरक होतील, तर सध्यां रशियांत असलेल्या जमिनीच्या समाईक मालकींतून कम्युनिस्ट धर्तीची समाईक मालकी अस्तित्वांत येण्याचा संभव आहे.

लंडन, कार्ल मार्क्स
ता. २१ जान्युआरी १८८२ फ्रेडरिक एंगल्स

---

* 'अबश्शीना' — ग्रामसंस्था — संपादक

त्याच सुमारास एक नवें पोलिश भाषांतर जिनीव्हा येथें प्रसिद्ध झालें.

याखेरीज १८८५ सालीं कोपेनहेगन येथें 'सोशल डेमोक्रॅटिस्क बिब्लिओथेक' मध्यें एक नवें डॅनिश भाषांतर प्रसिद्ध झालें आहे. ते अगदीं संपूर्ण नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट होय; कांहीं महत्त्वाचे भाग गाळण्यांत आले आहेत, कारण तें भाषांतरकाराला कठीण वाटले असावेत, व शिवाय मधून मधून निष्काळजीपणाच्या खुणा दिसतात, व त्या विशेषच दुखःदायक वाटतात, कारण भाषांतरावरून असें दिसतें कीं जर भाषांतरकारानें थोडी जास्त मेहनत घेतली असती तर त्याच्या हातून उत्कृष्ट कृति बाहेर पडली असती.

१८८६ सालीं पॅरिसच्या 'ल सोशियलिस्त' पत्रांत एक नवें फ्रेंच भाषांतर प्रसिद्ध झालें. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या भाषांतरांत तें उत्कृष्ट आहे.

ह्या फ्रेंच भाषांतरावरून त्याच वर्षीं मॅड्रिडच्या 'एल् सोशियालिस्ता' पत्रांत एक स्पॅनिश भाषांतर प्रसिद्ध करण्यांत आलें व मागाहून तें पुस्तकरूपानें छापण्यांत आलें: "Manifiesto del Partido Communista", por Carlos Marx y F. Engels. Madrid. Administracion de "El Socialista". Hernan Cortés 8.

जिज्ञासु वाचकांच्या माहितीसाठीं येथें सांगण्यास हरकत नाहीं कीं एका आर्मीनियन भाषांतराचें हस्तलिखित कॉन्स्टॅंटिनोपल येथील एका प्रकाशकाला देऊं करण्यांत आलें होतें. पण त्या भल्या माणसाला मार्क्सचें नांव असलेलें कोणतेंही लिखाण प्रसिद्ध करण्याचें धैर्य होईना. त्यानें सुचविलें कीं भाषांतरकारानें लेखक म्हणून स्वतःचेंच नांव घालावें, पण ही गोष्ट भाषांतरकारानें कबूल केली नाहीं.

अमेरिकन भाषांतरें कमीजास्त प्रमाणांत चुकीचीं होतीं, व त्यांचीं एकामागून एक किती तरी पुनर्मुद्रणें इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झाल्यानंतर शेवटीं १८८८ सालीं विश्वसनीय भाषांतर प्रसिद्ध झालें. हें भाषांतर माझा मित्र सॅम्युएल मूर ह्यानें केलें होतें व तें छापण्यासाठीं पाठविण्यापूर्वीं आम्हीं दोघांनीं मिळून तें पुनः एकदा तपासलें. ह्या इंग्रजी भाषांतराचें नांव: "Manifesto of the Communist Party, by Karl Marx and Frederick Engels. Authorized English Translation, edited and annotated by Frederick Engels. 1888. London, William Reeves,

185 Fleet st. E. C." त्या आवृत्तींतील माझ्या कांहीं टीपा मी ह्या आवृत्तींत घातल्या आहेत.

'कम्युनिस्ट जाहिरनामा' ह्या पुस्तकाचा एक स्वतंत्र इतिहासच बनला आहे. तो प्रथम प्रसिद्ध झाला त्यावेळीं शास्त्रशुद्ध समाजसत्तावादाच्या चळवळीचें अग्रदल संख्येनें फार मोठें नव्हतें, पण जें होतें त्यानें उत्साहानें 'जाहिरनाम्या' चें स्वागत केलें. (पहिल्या प्रस्तावनेंत उल्लेख केलेल्या भाषांतरांवरून हें सिद्ध होतें.) त्यानंतर जून १८४८ मध्यें पॅरिसच्या कामगारांचा पराभव झाल्यानंतर प्रतिगाम्यांची सद्दी सुरू झाली व त्यामुळें 'जाहिरनामा' लवकरच मागें पडला, आणि अखेरीस नोव्हेंबर १८५२ मध्यें कलोन कम्युनिस्टांना दोषी ठरविण्यांत येऊन 'कायद्यानें' तो बहिष्कृत करण्यांत आला. फेब्रुआरी क्रांतीपासून सुरू झालेली कामगारांची चळवळ सार्वजनिक रीत्या नजरेस पडेनाशी झाल्यापासून 'जाहिरनामा' सुद्धां जनतेच्या नजरेआड झाला.

राज्यकर्त्या वर्गाच्या सत्तेविरुद्ध नवा हल्ला चढविण्याइतकी ताकत यूरोपच्या कामगारांत जेव्हां पुनः आली, तेव्हां 'इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन' (आंतरराष्ट्रीय कामगार संघ) ह्या संस्थेचा जन्म झाला. यूरोप व अमेरिकेंतील समग्र लढाऊ कामगारवर्गाला एकत्रित करून त्याची एकच एक प्रचंड सेना बनविणें, हा ह्या संस्थेचा उद्देश होता. म्हणून 'कम्युनिस्ट जाहिरनाम्यांत' नमूद केलेल्या तत्त्वांपासूनच आरंभ करणें तिला शक्य नव्हतें. इंग्लंडमधील ट्रेड युनियन्स, फ्रान्स, बेल्जयम, इटली व स्पेन ह्या देशांतील प्रूधाँचे अनुयायी, व जर्मनींतील लासालचे अनुयायी,* यांना मज्जाव होणार नाहीं असा आपला कार्यक्रम ठरविणें तिला भाग होतें. ह्या

---

*लासाल हा आमच्याशीं बोलतांना आपण मार्क्सचे शिष्य असल्याचें नेहमीं व्यक्तिशः कबूल करीत असे, व या नात्यानें त्याची भूमिका जाहिरनाम्यांतील तत्त्वास धरूनच होती. त्याच्या अनुयायांची गोष्ट साफ वेगळी होती. सरकारी कर्जाच्या मदतीनें उत्पादकांच्या सहकारी संस्था काढाव्यात या त्याच्या मागणीच्या पलीकडे हे अनुयायी गेले नाहींत. शिवाय समग्र कामगारवर्गाला ते सरकारी सहाय्याचे पुरस्कर्ते आणि आत्मसहाय्याचे पुरस्कर्ते यांत विभागून टाकीत.– (एंगल्सची टीप.)

कार्यक्रमाचा मसुदा स्वतः मार्क्सनें तयार केला, व तो इतक्या कौशल्यानें केला कीं बकूनीन व अराजकवादी ह्यांनींसुद्धां त्याची तारीफ केली. 'इंटरनॅशनल'च्या नियमांचा प्रास्ताविक विभाग या मसुद्यापासून बनला आहे. जाहिरनाम्यांत नमूद केलेल्या कल्पनांचा अखेर विजय होण्यासाठीं मार्क्सनें आपली सर्व भिस्त कामगारवर्गाच्या बौद्धिक विकासावरच ठेवली, कारण संयुक्त लढे व चर्चा यांच्या योगें कामगारवर्गाचा बौद्धिक विकास होणार हें निश्चित होतें. भांडवलशाहीविरोधी लढ्यांतील निरनिराळ्या घडामोडी व यशापयशाचे हेलकावे पाहून, व यशापेक्षांहीं अपयशाच्या अनुभवावरून, लढवय्या कामगारांना आपल्या पूर्वीच्या सकल दुःखहारक जडीबुट्टयांचा अपुरेपणा कळून येईल व कामगारवर्गाच्या दास्यमोचनासाठीं खरोखरीं काय केलें पाहिजे याचें पूर्ण ज्ञान करून घेण्यासाठीं त्यांच्या मनाची तयारी होईल अशी मार्क्सची खात्री होती. आणि मार्क्सचें हें मत बरोबर ठरलें. १८६४ सालीं 'इंटरनॅशनल' स्थापन झाली त्या वेळच्या कामगार-वर्गाहून १८७४ सालीं 'इंटरनॅशनल'चें विसर्जन झालें त्या वेळचा कामगारवर्ग अगदीं निराळा होता. लॅटिन देशांतील प्रूधाँचा पंथ व जर्मनींतील लासालचा विशिष्ट पंथ हे मरणाच्या वाटेस लागले होते व त्यावेळीं अगदीं पुराणप्रिय असलेल्या इंग्लिश ट्रेड युनियन्स सुद्धां क्रमाक्रमानें इतक्या थरापर्यंत येऊन पोंचत होत्या कीं १८८७ सालीं स्वानसी येथील त्यांच्या परिषदेंत त्यांच्या अध्यक्षाला "यूरोपखंडांतील समाजसत्तावादाचें आम्हांला भय वाटेनासें झालें आहे" असे उद्गार त्यांच्या वतीनें काढतां आले. पण १८८७ सालीं यूरोपखंडांतील समाजसत्तावाद म्हणजे 'कम्युनिस्ट जाहिरनाम्यां'त उद्घोषित केलेली तत्त्वप्रणालीच होती, तिच्या व्यतिरिक्त त्याच्यांत निराळें जवळ जवळ कांहींच नव्हतें. अशा रीतीनें 'कम्युनिस्ट जाहिरनाम्या'च्या इतिहासांत १८४८ नंतरच्या काळांतील आधुनिक कामगार चळवळीचा इतिहास बऱ्याच अंशीं प्रतिबिंबित झाला आहे. सध्यां त्याच्याइतका विस्तृत प्रसार असलेलें व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें दुसरें कोणतेंहि पुस्तक समग्र समाज-सत्तावादी वाङ्मयांत आढळणार नाहीं. आज हा 'कम्युनिस्ट जाहिरनामा' म्हणजे सैबेरियापासून कॅलिफोर्नियापर्यंत सर्व देशांतील करोडों कामगारांचा संयुक्त कार्यक्रमच होय.

तथापि तो जेव्हां प्रथम प्रसिद्ध झाला तेव्हां त्याला सोशालिस्ट जाहिरनामा असें नांव आम्हीं देऊं शकलों नसतों. १८४७ सालीं दोन प्रकारचे लोक सोशालिस्ट समजले जात. एक प्रकार म्हणजे निरनिराळ्या मनोराज्यमय समाजपद्धतींचें पुरस्कर्ते, विशेषत: इंग्लंडमधील ओवेनचे अनुयायी व फ्रान्समधील फूरियेचे अनुयायी. हे दोन्ही गट त्यावेळींच अगदीं रोडावून चिमुकले पंथ बनले होते व मरणाच्या वाटेला लागले होते. दुसरा प्रकार म्हणजे समाजाच्या रोगावर नाना प्रकारच्या जडीबुट्टया सुचविणारे वैदू. भांडवलाला आणि नफ्याला थोडासासुद्धां धक्का लागूं न देतां आपल्या पोतडींतील नाना प्रकारच्या रामबाण औषधांनीं व मलमपट्टयांनीं समाजांतील अन्यायाचीं व्रणें नाहींशीं करावयाचा या लोकांचा प्रयत्न होता. हे दोन्ही प्रकारचे समाजसत्तावादी म्हणजे कामगार चळवळीच्या बाहेर राहणारे व मुख्यत: 'सुशिक्षित' वर्गांकडून पाठिंबा मिळण्याची अपेक्षा करणारे लोक होते. त्याउलट, कामगारांचा जो विभाग केवळ राजकीय क्रांत्यांनीं भागणार नाहीं अशी खात्री झाल्यामुळ समाजाची आमूलाग्र पुनर्रचना करण्याची मागणी करीत होता, त्यानें त्यावेळीं कम्युनिस्ट हें नांव धारण केलें. त्याचा कम्युनिझम अजून ओबडधोबड व केवळ सहजप्रवृत्तींतून निर्माण झालेला होता, त्यांत रेखीवपणा व सफाई नव्हती. तरीसुद्धां त्याचा प्रभाव इतका वाढला कीं त्यांतून मनोराज्यमय कम्युनिझमच्या दोन पद्धति जन्मास आल्या: एक म्हणजे फ्रान्समध्यें कॅबेट याचा 'इकारियन कम्युनिझम' व दुसरी म्हणजे जर्मनींत वाइटलिंग याचा कम्युनिझम. १८४७ सालीं सोशियालिझम ही एक भांडवलदारी चळवळ होती, कम्युनिझम ही एक कामगारवर्गीय चळवळ होती. निदान यूरोपखंडांत तरी सोशियालिझम अगदीं शिष्टसंमत समजण्यांत येत होता, व कम्युनिझमची गोष्ट याच्या नेमकी उलट होती. आणि त्या काळांतसुद्धां आमचें मत "कामगाराचें दास्यविमोचन हें स्वत: कामगारवर्गाचेंच कार्य असलें पाहिजे" असें निश्चितपणें असल्यामुळें ह्या दोन नांवांपैकीं कोणतें पसंत करावयाचें याविषयीं आमच्यांत कोणताहि डळमळीतपणा येणें शक्य नव्हतें. आणि हें नांव टाकून देण्याचा विचारसुद्धां आमच्या मनाला कधीं शिवला नाहीं.

"सर्व देशांतील कामगारांनो, एक व्हा!" – पण ४२ वर्षांपूर्वी –

म्हणजे कामगारवर्ग आपल्या स्वतंत्र मागण्या मांडण्यासाठीं ज्या क्रांतींत पुढें आला त्या पहिल्या पॅरिस क्रांतीच्या वेधकाळीं — आम्ही जगाला ही हांक दिली तेव्हां फारच थोड्या लोकांकडून तिला साद मिळाली. परंतु ता. २८ सप्टेंबर १८६४ रोजीं पश्चिम यूरोपमधील बहुतेक देशांचे कामगार 'इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन' या संस्मरणीय संस्थेच्या झेंड्याखालीं एक झाले. ही 'इंटरनॅशनल' फक्त नऊ वर्षेंच टिकली हें खरें. पण तिनें निर्माण केलेलें सर्व देशांतील कामगारांचें अमर ऐक्य अजून जिवंत आहे व पूर्वीपेक्षांहि जास्त प्रभावी झालें आहे. त्याचा उत्तम पुरावा म्हणजे आजचा दिवस होय. कारण आज, मी हें लिहीत असतांनाच, यूरोप अमेरिकेचा कामगारवर्ग प्रथमच एकत्र आलेल्या आपल्या लढाऊ सेनेची पाहणी करीत आहेत. ही सेना एकाच झेंड्याखालीं व एकाच तात्कालिक उद्देशासाठीं एकात्मतेनें मैदानांत उतरली आहे. सर्वत्र आठ तासांचा कामाचा दिवस करण्याचा कायदा पास करण्यांत यावा, हा तिचा तात्कालिक उद्देश आहे. १८६६ सालीं जिनोव्हा येथें भरलेल्या 'इंटरनॅशनल'च्या परिषदेंत हा उद्देश जाहिर करण्यांत आला होता, व त्यानंतर १८८९ सालीं पॅरिस येथें भरलेल्या कामगारांच्या परिषदेंत तो पुनः जाहिर करण्यांत आला. आणि आजचें दृश्य पाहून सर्व देशांतील भांडवलदारांचे व जमीनदारांचे डोळे उघडतील व त्यांना दिसून येईल कीं सर्व देशांतील कामगार आज खरोखरींच एक झाले आहेत.

हें दृश्य आपल्या डोळ्यांनीं पाहण्यासाठीं आज मार्क्स माझ्या शेजारीं असावयाला हवा होता!

लंडन, फ्रेडरिक एंगल्स

ता. १ मे १८९०

# १८९२ च्या पोलिश आवृत्तीची प्रस्तावना

'कम्युनिस्ट जाहिरनामा' ह्या पुस्तकाची नवी पोलिश आवृत्ति काढणें आवश्यक झालें आहे, या गोष्टीवरून अनेक निरनिराळे विचार सुचतात.

पहिला म्हणजे, यूरोपखंडांत मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांचा विकास कितपत झाला आहे याचें जणूं काय 'कम्युनिस्ट जाहिरनामा' हें पुस्तक निदर्शकच बनलें आहे. कोणत्याही देशांत भारी उद्योगधंद्यांची वाढ होऊं लागली की, धनिकवर्गाच्या संबंधांत आपलें स्थान समाजांत काय आहे हें स्पष्टपणें जाणून घेण्याची इच्छा कामगारांत बळावू लागते; त्यांच्यांत समाजवादी चळवळीचा प्रसार होतो; व 'जाहिरनाम्या'ला मागणी वाढते. अशा रीतीनें तेथील भाषेमध्यें 'जाहिरनाम्या'च्या किती प्रती खपल्या ह्यावरून कोणत्याही देशांतील कामगार चळवळीनें कोणता टप्पा गांठला आहे ह्याचें, एवढेंच नव्हे, तर तेथें मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांचा विकास कितपत झाला आहे ह्याचें सुद्धां, बहुतांशीं बिनचूक मोजमाप करतां येतें.

अर्थात् ही नवी पोलिश आवृत्ति म्हणजे पोलंडमध्यें उद्योगधंद्यांची निश्चितपणें प्रगति झाल्याचेंच चिन्ह होय. यापूर्वीची आवृत्ति दहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली होती, त्यानंतरच्या काळांत पोलंडमधील उद्योगधंद्यांची खरोखरींच प्रगति झाली आहे याबद्दल मुळींच शंका घेतां येणार नाहीं. रशियन पोलंड – कॉंग्रेस पोलंड – हा रशियन साम्राज्याचा मोठा औद्योगिक टापू बनला आहे. खुद्द रशियाचे मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे वाटेल तसे

निरनिराळ्या टापूंत विखुरलेले आहेत — कांहीं फिनलंडच्या आखाताभोंवतीं आहेत, कांहीं मध्यटापूंत (मॉस्को व व्लादीमिर येथें) आहेत, कांहीं काळ्या समुद्राच्या व अझोव समुद्राच्या किनाऱ्यांवर आहेत, व कांहीं इतर ठिकाणीं आहेत —, परंतु पोलंडचे उद्योगधंदे तुलनात्मकदृष्टया लहान असलेल्या टापूंतच केंद्रित झाले आहेत, व त्याला ह्या केन्द्रीकरणाचे फायदे जसे मिळतात तसेंच तोटेंहि भोगावे लागत आहेत. पोलंडच्या कारखानदारांशीं स्पर्धा करणाऱ्या रशियन कारखानदारांनीं — पोलंडच्या लोकांचें रूसीकरण करण्याची त्यांची तीव्र इच्छा असतांनाहि — पोलंडविरुद्ध संरक्षक जकातींची मागणी केली, व अशा रीतीनें पोलंडमधील उद्योगधंद्यांच्या केन्द्रीकरणाचे फायदे कबूल केले. पोलंडच्या कामगारांत समाजसत्तावादी विचारांचा प्रसार वाढणें व 'कम्युनिस्ट जाहिरनामा' पुस्तकाची मागणी वाढत जाणें हें अर्थात — पोलिश कारखानदारांच्या व रशियन सरकारच्या दृष्टीनें — तेथील उद्योगधंद्यांच्या केन्द्रीकरणाचे तोटे आहेत.

परंतु पोलंडच्या उद्योगधंद्यांची झपाट्यानें वाढ होत आहे, व रशियाच्या उद्योगधंद्यांनाहि त्यांनीं मागें टाकलें आहे, हा सुद्धां पोलंडच्या जनतेच्या अनंत जीवनशक्तीचाच नवा पुरावा होय, व त्या जनतेचें राष्ट्रीय पुनरुज्जीवन लवकरच होणार ह्याची ही नवी हमीच होय. प्रबळ व स्वतंत्र पोलंड पुनः अस्तित्वांत येणें ही गोष्ट केवळ पोलंडच्या जनतेच्या दृष्टीनेंच नव्हे, तर, आपणां सर्वांच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. यूरोपमधील प्रत्येक राष्ट्राला जर स्वतःच्या घरांत पूर्ण स्वायत्तता असेल तरच या सर्वांचें प्रामाणिक आंतरराष्ट्रीय सहकार्य शक्य होईल. १८४८ ची क्रांति जरी कामगारवर्गाच्या झेंड्याखालीं झाली, तरी तिनें कामगारवर्गीय लढवय्यांना भांडवलदारवर्गाचें कार्य पार पाडण्यापुरताच वाव दिला; ह्या क्रांतीमुळें इटली, जर्मनी व हंगेरी हे देश स्वतंत्र झाले, व हें कार्य लुई बोनापार्ट व बिस्मार्क यांच्या हस्तें झालें. ह्या क्रांतीच्या मृत्यूनंतर जणूं काय तिच्या मृत्युपत्राची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ह्या दोघांवर होती. पण ह्या तीन देशांनीं मिळून क्रांतीसाठीं जेवढें कार्य पार पाडलें त्याच्यापेक्षां जास्त कार्य एकट्या पोलंडनें १७९२ नंतरच्या काळांत पार पाडलें होतें. तरीसुद्धां १८६३ सालीं आपल्यापेक्षां दसपटीहून मोठ्या रशियन

ताकतीपुढें पोलंडला शरणागति पत्करावी लागली व स्वतःचें कार्य कोणाच्याहि मदतीशिवाय पार पाडण्याची त्याच्यावर पाळी आली. उमरावबर्गाला पोलंडचें स्वातंत्र्य टिकवितां, किंवा मिळवितां आले नाहीं. आज हें स्वातंत्र्य भांडवलदारवर्गाला निदन फारसें महत्त्वाचें तरी वाटत नाहीं. तरीदेखील यूरोपच्या राष्ट्रांना गुण्यागोविंदानें सहकार्य करतां यावें ह्यासाठीं पोलंडचें स्वातंत्र्य आवश्यक आहे. पोलंडचा नवोदित कामगारवर्गच तें मिळवूं शकेल, व त्याच्या हातांत तें अबाधित राहील. कारण पोलंडचें स्वातंत्र्य खुद्द पोलिश कामगारांना जितकें जरूरीचें आहे तितकेंच बाकीच्या सान्या यूरोपमधील कामगारांनासुद्धां जरूरीचें आहे.

लंडन,

ता. १० फेब्रुआरी १८९२

फ्रेडरिक एंगल्स

# १८९३ च्या इटालियन आवृत्तीची प्रस्तावना

## इटालियन वाचकास –

'कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा' ह्या पुस्तकाचें प्रकाशन, व मिलान आणि बर्लिन ह्या शहरांत ता. १८ मार्च १८४८ रोजीं झालेल्या क्रांत्या, ह्या घटना जवळजवळ एकाच दिवशीं झाल्या. ह्या क्रांत्या म्हणजे यूरोपखंडाच्या मध्यभागीं असलेलें एक राष्ट्र व भूमध्यसमुद्राच्या टापूच्या मध्यभागीं असलेलें दुसरे राष्ट्र अशा दोन राष्ट्रांचे सशस्त्र उठाव होते. त्या दिवसापर्यंत हीं दोन राष्ट्रें, त्यांचे अनेक तुकडे पडलेले असल्यामुळें व अंतर्गत कलहामुळें, दुर्बळ बनलीं होतीं व परकीयांच्या सत्तेखालीं गेलेलीं होतीं. इटली देशावर ऑस्ट्रियाच्या बादशहाची हुकमत होती, तर जर्मनीच्या मानेवर – जास्त अप्रत्यक्षपणें कां होईना, पण तितक्याच परिणामकारक रीतीनें – रशियाच्या झारचें जोखड होतें. १८ मार्च १८४८ च्या घडामोडींचा परिणाम असा झाला कीं इटली व जर्मनी हे दोन्हीं देश ह्या लाजिरवाण्या स्थितींतून मुक्त झाले. १८४८ पासून १८७१ पर्यंत ह्या दोन थोर राष्ट्रांची पुनर्घटना झाली व त्यांना स्वतंत्रपणें नांदण्यास कांहीं अंशीं वाव मिळाला याचें कारण – मार्क्सच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे – हेंच कीं, १८४८ ची क्रांति ज्या लोकांनीं चिरडून टाकली त्याच लोकांना त्या क्रांतीचे उद्देश मात्र तडीस नेणें स्वतःच्या इच्छेविरुद्ध भाग पडलें, ह्या क्रांतीच्या मारेकऱ्यांनाच तिच्या मृत्युपत्राची अंमलबजावणी करावी लागली.

सगळीकडे ती क्रांति कामगारवर्गानेंच घडवून आणली होती: त्या वर्गानेंच बॅरिकेड रचले व क्रांतीसाठीं आपलें रक्त वेंचलें. पण फक्त पॅरिसच्याच कामगारांनीं सरकार उलथून पाडतांना आपणांपुढें भांडवलदारी राजवट उलथून पाडण्याचा निश्चित उद्देश ठेवला होता. पण स्वत:चा वर्ग व भांडवलदारीवर्ग ह्या दोहोंमधील प्राणांतिक विरोधाची त्यांना जरी तीव्र जाणीव झाली होती, तरी समाजाची पुनर्रचना ज्यामुळें शक्य झाली असती अशा पायरीपर्यंत फ्रान्सची आर्थिक प्रगति झालेली नव्हती व फ्रेंच कामगारांच्या बहुसंख्येचा बौद्धिक विकासही झालेला नव्हता. म्हणून अंतिम दृष्टया क्रांतीचें फळ भांडवलदार वर्गाच्याच पदरांत पडलें. इतर देशांत, म्हणजे इटली, जर्मनी व ऑस्ट्रिया या देशांत, आरंभापासूनच कामगारांनीं भांडवलदारवर्गाला सत्तारूढ करण्यापलिकडे दुसरें कांहीं केलें नाहीं. परंतु कोणत्याहि देशांत राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय भांडवलदारवर्गाची हुकमत स्थापन होऊं शकत नाहीं. म्हणून इटली, जर्मनी, हंगेरी, ह्या देशांत जी एकी व स्वायत्तता पूर्वीं नव्हती ती १८४८ च्या क्रांतीच्या मागोमाग अस्तित्वांत येणें क्रमप्राप्तच झालें. वेळ येतांच पोलंडमध्येंही हेंच घडून येईल.

अशा रीतीनें १८४८ ची क्रांति ही जरी समाजसत्तावादी क्रांति नव्हती, तरी तिनें त्या क्रांतीचा रस्ता मात्र तयार केला, तिची भूमिका तयार केली. सर्व देशांत मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांना जोराची चालना मिळाल्यामुळें गेल्या ४५ वर्षांत भांडवलदारी राजवटीनें मोठ्या संख्येचा प्रबळ व संघटित कामगारवर्ग सर्व ठिकाणीं निर्माण केला आहे. 'जाहिरनाम्या' च्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, भांडवलदारवर्गानें आपणांस मूठमाती देणारा वर्ग अशा रीतीनें अस्तित्वांत आणला आहे. प्रत्येक राष्ट्रांत जर एकी व स्वायत्तता पुन: स्थापन झाली नसती, तर कामगारवर्गाचें आंतर-राष्ट्रीय ऐक्य घडवून आणणें अशक्य झालें असतें व सर्वांच्या सारख्याच उद्देशांसाठीं ह्या राष्ट्रांचें शांततामय व सुबुद्ध सहकार्य घडून येणेंहि अशक्य झालें असतें. १८४८ च्या पूर्वींच्या काळांतील राजकीय परिस्थितींत इटली, हंगेरी, जर्मनी, पोलंड, व रशिया, ह्या देशांतील कामगारांनीं संयुक्त आंतरराष्ट्रीय लढा करणें ही कल्पनाच हास्यास्पद होती.

यावरून दिसून येतें कीं १८४८ सालांतील लढाया निरर्थक नव्हत्या. त्या क्रांतिकारक युगाला आज ४५ वर्षें लोटलीं आहेत, पण हीं वर्षें हीं कांहीं वायां गेलीं नाहींत. फळ पिकूं लागलें आहे. माझी इच्छा एवढीच आहे कीं मूळच्या 'जाहिरनाम्या' चें प्रकाशन आंतर-राष्ट्रीय क्रांतीच्या दृष्टीनें जसें शुभ ठरलें तसेंच ह्या इटालियन अनुवादाचें प्रकाशन ही इटालियन कामगारवर्गाच्या विजयाच्या दृष्टीनें शुभ ठरो.

भांडवलशाहीनें भूतकाळांत केलेली क्रांतिकारक कामगिरी 'जाहिरनाम्या' मध्यें पूर्णपणें लक्ष्यांत घेतलेली आहे. पहिलें भांडवलदारी राष्ट्र इटली हेंच होतें. सरंजामदारी मध्ययुगाच्या अस्तकालीं, आधुनिक भांडवलदारी युगाच्या उंबरठ्यावर, एक विराट पुरुष नजरेस पडतो. तो इटालियन होता. त्याचें नांव दान्ते. तो मध्ययुगाचा शेवटचा कवि होता व त्याच वेळीं आधुनिक युगाचा पहिला कवि होता. इ. स. १३०० प्रमाणें आजहि एक नवें ऐतिहासिक युग उदयास येत आहे. ह्या नव्या कामगार-युगाच्या जन्म-घटिकेचें गाणें गाणारा दान्ते इटली निर्माण करील का?

लंडन, फ्रेडरिक एंगल्स

ता. १ फेब्रुआरी १८९३.

# Manifest

der

# Kommunistischen Partei.

Veröffentlicht im Februar 1848.

Proletarier aller Länder vereinigt euch.

London.

Gedruckt in der Office der „Bildungs-Gesellschaft für Arbeiter"

von J. E. Burghard.

46, Liverpool Street, Bishopsgate.

# कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा

एक भूत यूरोपखंडांला भंडावून सोडीत आहे – ह्या भुताचें नांव कम्युनिझम. जुन्या यूरोपचे सारे सत्ताधारी – पोप व झार, मेतरनिच व गीझो, फ्रेंच जहाल लेखक व जर्मन गुप्त पोलिस, – ह्या भुताला गाडण्यासाठीं एक झाले आहेत.

असा कोणता विरोधी पक्ष आहे, कीं ज्याची अधिकारारूढ पक्षानें कम्युनिस्ट म्हणून नालस्ती केली नाहीं? असा कोणता सरकारविरोधी पक्ष आहे, कीं ज्यानें तोच कम्युनिझमचा भयंकर आरोप विरोधीगटांतील अधिक पुरोगामी पक्षांवर व आपल्या प्रतिगामी प्रतिपक्ष्यांवर सुद्धां उलट केला नाहीं?

ह्यावरून दोन गोष्टी सिद्ध होतात.

(१) कम्युनिझम ही एक बलिष्ठ शक्ति आहे हें यूरोपच्या सर्व सत्ताधाऱ्यांना आतां मान्य होऊन चुकलें आहे.

(२) कम्युनिस्टांनीं आतां मुळींच विलंब न लावतां आपलीं मतें, आपले उद्देश, आपल्या प्रवृत्ती, दुनियेंतील कोणाचीहि भीडमुर्वत न ठेवतां उघडपणें प्रसिद्ध केल्या पाहिजेत व आपल्या पार्टीचा जाहिरनामा काढून कम्युनिझमच्या भुतासंबंधींच्या ह्या बालिश दंतकथेला उत्तर दिलें पाहिजे.

ह्या हेतूनें निरनिराळ्या राष्ट्रांचे कम्युनिस्ट लंडन येथें जमा झाले व त्यांनीं पुढील जाहिरनामा तयार केला जो आतां इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, इटॅलियन, फ्लेमिश, व डॅनिश, या भाषांतून प्रसिद्ध होत आहे.

[१]

# भांडवलदार व कामगार*

आतांपर्यंतच्या सगळ्या समाजांचा इतिहास** म्हणजे वर्गलढ्यांचाच इतिहास होय.

---

*भांडवलदारवर्ग (बूर्झ्वाझी) याचा अर्थ आधुनिक भांडवलवाल्यांचा वर्ग, जे सामाजिक उत्पादनाच्या साधनांचे मालक असतात व मोल-मजूरी करणाऱ्या कामगारांना कामावर ठेवतात अशा लोकांचा वर्ग. कामगारवर्ग (प्रॉलेटॅरिअट) याचा अर्थ मोल-मजूरी करणाऱ्या आधुनिक कामगारांचा वर्ग, ज्यांची स्वतःच्या मालकीचीं उत्पादन-साधनें नसतात व ज्यांना जगण्यासाठीं आपली श्रमशक्ति विकावी लागते अशा लोकांचा वर्ग. (एंगल्स, १८८८ च्या इंग्लिश आवृत्तींतील टीप.)

** म्हणजे समग्र लेखी इतिहास. प्राथमिक काळांतील समाजाच्या इतिहासाविषयीं, इतिहास लिहिण्यास सुरवात होण्यापूर्वीच्या काळांतील समाज-रचनेविषयीं, १८४७ सालीं बहुतेक कांहींच माहिती उपलब्ध नव्हती. त्यानंतर हॅक्सथाउसेन यानें शोध लावला कीं रशियांमध्यें जमीन समाईक मालकीची होती, माउरर यानें सिद्ध केलें कीं सर्व टयूटॉनिक वंशांचा इतिहास सुरू होण्याच्या वेळीं त्यांच्या समाजाचा पाया जमिनीची समाईक मालकी हाच होता, व क्रमाक्रमानें असें आढळून आलें कीं हिंदुस्थानपासून आयर्लंडपर्यंत

स्वतंत्र नागरिक व गुलाम, पॅट्रिशियन व प्लीबियन, सरंजामदार व भूदास, हुन्नर-संघांतील कारागीर* व त्यांच्या पदरचे मजूर – थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जुलुम करणारे व जुलुमानें गांजलेले, ह्यांचा एकमेकांशीं सतत विरोध असे, त्यांच्यांत कधीं प्रच्छन्न तर कधीं प्रकट रीतीनें अव्याहत लढा चालू असे, व प्रत्येक वेळीं त्या लढ्याचें पर्यवसान एकंदर समाज-रचनेंत क्रांतिकारक परिवर्तन होणें किंवा लढणाऱ्या वर्गांचा सारखाच नाश होणें हेंच होत असे.

इतिहासाच्या गतकालीन युगांत जवळजवळ सर्वत्र आपणास वेगवेगळ्या वर्गांमध्यें विभागलेला समाज दिसतो. वेगवेगळ्या सामाजिक थरांच्या पायऱ्यांची एक सबंध शिडीच आपणास सांपडते. प्राचीन रोममध्यें पॅट्रिशियन, शिलेदार, प्लीबियन व गुलाम, असे वर्ग होते; मध्ययुगांत सरंजामी सरदार, त्यांचीं कुळें, हुन्नर-संघांतील कारागीर, त्यांच्या पदरचे मजूर व उमेदवार, भूदास, असे वर्ग होते; शिवाय ह्यापैकीं बहुतेक प्रत्येक वर्गांत सुद्धां उच्चनीच पायऱ्या होत्या.

सरंजामदारी समाजाच्या भग्न अवशेषांतून आधुनिक भांडवलदारी समाज उदयास आला आहे, पण त्यामुळें वर्ग-विरोध मात्र नष्ट झाले नाहींत. फरक एवढाच झाला, कीं जुने वर्ग, गांजणुकीची जुनी परिस्थिति, व लढ्याचे

---

सगळीकडे समाजरचनेचें प्राथमिक स्वरूप ग्राम-समाज हेंच असतें, किंवा होतें. 'गण' (gens) ह्या संस्थेचें खरें स्वरूप काय, व 'कुल' (tribe) ह्या संस्थेशीं त्याचा संबंध काय असतो, हें मॉर्गन ह्यानें शोधून काढलें, व त्याच्या ह्या अत्यंत महत्त्वाच्या शोधामुळें ह्या प्राथमिक कम्युनिस्ट धर्तीच्या समाजाच्या अंतर्गत संघटनेचें विशिष्ट स्वरूप उघड झालें. हे प्राथमिक समाज विसर्जन पावतांच समाजाची विभागणी होऊन त्यांत निरनिराळे व अखेरीस एक-मेकांशीं विरोध असलेले वर्ग अस्तित्वांत येतात. 'कुटुंबसंस्था, खासगी मालकी, व राज्यसत्ता यांचा उगम' या पुस्तकांत मी या विसर्जन-क्रियेचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. (एंगल्स : १८८८ च्या इंग्लिश आवृत्तींतील टीप.)[4].

*कारागीर-संघाचा पूर्ण हक्क असलेला सभासद. संघाचा मुख्य नव्हे. – (एंगल्स : १८८८ च्या इंग्लिश आवृत्तींतील टीप.)

जुने प्रकार जाऊन त्यांऐवजीं नवे वर्ग, गांजणुकीची नवी परिस्थिति, व लढ्याचे नवे प्रकार अस्तित्वांत आले आहेत.

तथापि आपल्या युगाचें – म्हणजे भांडवलदारवर्गाच्या युगाचें – एक खास वैशिष्ट्य आहे व तें हें, कीं आतां वर्ग-विरोधांना साधें व सरळ रूप आलें आहे. एकंदर समाजाची दोन प्रचंड परस्पर-विरोधी छावण्यांत – एकमेकांसमोर सरळ उभे ठाकलेल्या दोन प्रचंड वर्गांत – विभागणी होण्याची क्रिया जास्त जास्त प्रमाणांत घडून येत आहे; हे वर्ग म्हणजे भांडवलदारवर्ग व कामगारवर्ग.

मध्ययुगांतील भूदासांतून अगदीं आरंभींच्या शहरांचे सनदी नागरिक उदयास आले. ह्या नागरिकांतून भांडवलदारवर्गाचे पहिले अंकुर वाढीस लागले.

अमेरिकेचा शोध, दक्षिण आफ्रिकेला वळसा देऊन पूर्वेकडे जाण्याच्या जलमार्गाचा शोध, ह्यामुळें उदयोन्मुख भांडवलदारवर्गाला नवें क्षेत्र खुलें झालें. हिंदुस्थान व चीनच्या बाजारपेठा, अमेरिकेंत वसाहतींची स्थापना, वसाहतींशीं व्यापार, देवघेवीच्या साधनांची व एकंदरीनें क्रयवस्तूंची वाढ, ह्यामुळें व्यापाराला, नौकानयनाला, उद्योगधंद्यांना, अपूर्व चालना मिळाली, व त्यायोगें मरणोन्मुख सरंजामदारी समाजांतील क्रांतिकारक घटकांचा वेगानें विकास झाला.

उद्योगधंद्यांच्या सरंजामदारी पद्धतींत औद्योगिक उत्पादनाची संपूर्ण मक्तेदारी हुन्नर-संघांच्या हातीं असे व ह्या हुन्नर-संघांत प्रवेश करण्यास सर्वांना मोकळीक नसे. ही पद्धत आतां नव्या बाजारपेठांच्या वाढत्या गरजा भागविण्यास अपुरी पडूं लागली. तिच्या ऐवजीं हात-कारखान्यांची पद्धत अस्तित्वांत आली. हुन्नर-संघांच्या कारागिरांना मागें ढकलून हात-कारखानेवाला मध्यम-वर्ग पुढें सरसावला; एकाच कारखान्यांत निरनिराळ्या प्रकारचीं कामें निरनिराळ्या कामगारांनीं करावयाचीं अशी नवी श्रमविभागणीची पद्धत अस्तित्वांत आली व त्यामुळें निरनिराळ्या प्रकारचीं कामें निरनिराळ्या हुन्नर-संघांनीं करावयाचीं ही जुनी श्रमविभागणीची पद्धत लुप्त झाली.

मध्यंतरीं बाजारपेठा सतत विस्तार पावत होत्या, मालाची मागणी सारखी वाढत होती. आतां हात-कारखान्यांची पद्धतसुद्धां अपुरी पडूं लागली. त्यानंतर वाफेची शक्ति व यंत्रें यांमुळें औद्योगिक उत्पादनांत क्रांति घडून

आली. हात-कारखाने जाऊन त्यांच्या ऐवजीं अजस्र प्रमाणावरील आधुनिक उद्योगधंदे अस्तित्वांत आले; औद्योगिक मध्यम-वर्ग जाऊन त्याच्या जागीं लक्षाधीश उद्योगपती, प्रचंड औद्योगिक फौजांचें नायक, म्हणजे आधुनिक भांडवलदार, उदयास आले.

अमेरिकेचा शोध लागल्यामुळें जागतिक बाजारपेठ अस्तित्वांत येण्याचा मार्ग खुला झाला, व आधुनिक उद्योगधंद्यांमुळें ती अस्तित्वांत आली. ह्या बाजारपेठेमुळें व्यापार, नौकानयन व जमिनीच्या मार्गानें दळणवळण, यांचा अमर्याद विकास झाला आहे. उलटपक्षीं या विकासामुळें उद्योगधंद्यांवर परिणाम होऊन त्यांचा विस्तार वाढला आहे; आणि उद्योगधंदे, व्यापार, नौकानयन, रेल्वे, यांचा विस्तार ज्या प्रमाणांत वाढला, त्याच प्रमाणांत भांडवलदार-वर्गाचा विकास झाला, त्यानें आपलें भांडवल वाढविलें, व मध्ययुगाचे अवशेष असलेल्या सर्व वर्गांना त्यानें मागें ढकललें.

ह्यावरून आपणांला दिसून येतें कीं आधुनिक भांडवलदारवर्ग हा स्वतःच एका दीर्घ विकास-क्रमाचें पर्यवसान रूप आहे; उत्पादनाच्या व विनिमयाच्या पद्धतींत झालेल्या अनेक क्रांत्यांतून तो जन्मास आला आहे.

जसजसा भांडवलदारवर्गाचा विकास होत गेला तसतसें त्या त्या विकासावस्थेस अनुसरून त्या वर्गाच्या राजकीय प्रगतीचें पाऊलही पुढें पडत गेलें. आरंभीं सरंजामदारी उमरावांच्या सत्तेखालीं तो गांजला जाणारा वर्ग म्हणून होता; पुढें मध्ययुगीन 'कम्यून'* मध्यें शस्त्रधारी व स्वयंशासित

---

* फ्रान्समध्यें उदयोन्मुख शहरांनीं आपल्या सरंजामदारी धन्यांकडून व उमरावांकडून स्थानिक स्वराज्य व 'तिसरी श्रेणी' या नात्यानें राजकीय हक्क जिंकून घेण्यापूर्वीच 'कम्यून' हें नांव धारण केले होतें. भांडवलदारवर्गाच्या आर्थिक विकासाचा विचार करतांना इंग्लंडचा नमुना व राजकीय विकासाचा विचार करतांना फ्रान्सचा नमुना येथें सर्वसाधारणपणें नजरेपुढें ठेवला आहे. (एंगल्स: १८८८ च्या इंग्लिश आवृत्तींतील टीप.)

इटली व फ्रान्स या देशांतील शहरवासीयांनीं आपल्या सरंजामदारी उमरावांकडून स्वराज्याचे प्राथमिक हक्क विकत किंवा जिंकून घेतल्यानंतर आपल्या नगरसमाजांना ('कम्यून') हें नांव दिलें. (एंगल्स: १८९० च्या जर्मन आवृत्तींतील टीप.)

समाज म्हणून तो मांडूं लागला; कोठें त्यानें आपलें स्वतंत्र प्रजासत्ताक शहर-राज्य बनविलें (उदाहरणार्थ इटली व जर्मनी या देशांत), तर कुठें तो कर भरण्यास पात्र अशी राजेशाहींतील 'तिसरी श्रेणी' झाला (उदाहरणार्थ फ्रान्स देशांत). त्यानंतर हात-कारखान्यांच्या काळांत त्यानें उमरावांना आळा घालण्याचें साधन या नात्यानें अर्ध-सरंजामदारी राजेशाहीची किंवा अनियंत्रित राजेशाहीची सेवा बजावली, व वस्तुतः तो सर्वसाधारणपणें बड्या राजेशाह्यांचा आधारस्तंभच झाला; आणि अखेरीस त्यानें आधुनिक उद्योगधंदे व जागतिक बाजारपेठ अस्तित्वांत आल्यापासून आधुनिक प्रातिनिधिक राज्यसंस्थेंत स्वतःचें एकमेव राजकीय वर्चस्व प्रस्थापित केलें आहे. आधुनिक राज्यसंस्थेचें कारभारीमंडळ म्हणजे समग्र भांडवलदारवर्गाचे संयुक्त व्यवहार चालविण्यासाठीं नेमलेली कमिटीच होय.

ऐतिहासिक-दृष्ट्या भांडवलदारवर्गानें अत्यंत क्रांतिकारक भूमिका पार पाडली आहे.

भांडवलदारवर्गानें जेथें जेथें वर्चस्व मिळविलें तेथें तेथें त्यानें सरंजामदारी पद्धतीचीं, शिष्टशासित समाजाच्या पद्धतीचीं, काव्यरम्य, अशीं सर्व नातीं नष्ट केलीं आहेत. माणसाला त्याच्याहून 'स्वाभाविकपणेंच श्रेष्ठ' असलेल्या लोकांच्या दावणीला बांधून टाकणारीं नाना प्रकारचीं सरंजामदारी बंधनें त्यानें निर्दयपणें तोडून टाकलीं आहेत, व नागडा स्वार्थ, हृदयशून्य 'रोख व्यवहार,' याखेरीज दुसरा कोणताहि दुवा माणसामाणसांत राहूं दिलेला नाहीं. धार्मिक उत्साह, शिलेदारी वीरश्री, भाबडी भावनावशता, यांचा सर्वांचा स्वर्गीय उन्माद त्यानें स्वार्थी हिशेबाच्या थंडगार पाण्यांत बुडवून टाकला आहे. त्यानें वैयक्तिक गुण ही क्रयवस्तु बनविली आहे, व कधींहि हिरावून घेतां न येणारीं अशीं जीं असंख्य स्वातंत्र्यें पूर्वीच्या सनदांत नमूद केलीं होतीं त्यांच्याऐवजीं त्यानें न्याय-अन्यायाची पर्वा न करणारें एकच स्वातंत्र्य प्रस्थापित केलें आहे व तें म्हणजे – व्यापार-स्वातंत्र्य. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, धार्मिक व राजकीय भ्रमांच्या साहाय्यानें झांकून ठेवण्यांत येणाऱ्या पिळणुकीच्या पद्धतीऐवजीं त्यानें नंगेपणानें, निर्लज्जपणानें, प्रत्यक्ष रीतीनें करण्यांत येणाऱ्या पाशवी पिळवणुकीची पद्धत अमलांत आणली आहे.

आजपर्यंत ज्या ज्या धंद्यांविषयीं लोकांना आदर व दरारा वाटत असे त्या सर्वांचा मान भांडवलदारवर्गानें नाहींसा करून टाकला आहे. डॉक्टर, वकील, धर्मगुरू, कवी, शास्त्रज्ञ, यांना भांडवलदारवर्गानें आपले पगारी मजूर बनविलें आहे.

भांडवलदारवर्गानें कुटुंब-संस्थेचा भावनामय बुरखा फाडून टाकला आहे व कौटुंबिक नात्याला केवळ पैशावर आधारलेलें नातें बनविलें आहे.

भांडवलदारवर्गानें दाखवून दिलें आहे कीं प्रतिगामी लोक मध्य-युगांतील ज्या शरीर-सामर्थ्याच्या पाशवी निदर्शनाचे इतके गोडवे गात असतात, त्याच्याच जोडीला पराकाष्ठेच्या आळसाचें व खुशालचेंडूपणाचें राज्यहि त्यावेळीं स्वाभाविक-पणेंच अस्तित्वांत होतें. माणूस केवढीं प्रचंड कामें करूं शकतो हें प्रथम भांडवलदारवर्गानेंच दाखवून दिलें आहे. ईजिप्तमधील पिरामिड, रोमन कालवे, व गॉथिक पद्धतीचीं मंदिरें, यांच्यापेक्षां कितीतरी आश्चर्यकारक बांधकामें त्यानें पार पाडलीं आहेत; त्यानें केलेल्या मोहिमांपुढें पूर्वीच्या काळांतील निरनिराळ्या राष्ट्रांचीं देशांतरें व क्रूसयात्रा सर्व फिक्या पडतात.

उत्पादन-साधनांत सतत क्रांतिकारक बदल केल्याशिवाय, आणि अशा रीतीनें उत्पादन-संबंधांत व त्यांच्याबरोबर समाजांतील समग्र परस्पर-संबंधांत सतत क्रांतिकारक बदल केल्याशिवाय, भांडवलदारवर्ग अस्तित्वांतच राहूं शकत नाहीं. उलटपक्षीं जुन्या उत्पादन-पद्धती न बदलतां जशाच्या तशा टिकवून धरणें पूर्वीच्या काळांतील सर्व औद्योगिक वर्गांच्या अस्तित्वासाठीं सर्वांत जास्त आवश्यक होतें. उत्पादनांत सतत क्रांतिकारक बदल, सर्व सामाजिक परिस्थितींत अव्याहत उलथापालथ, कायमचा अस्थिरपणा व प्रक्षोभ, हें पूर्वीच्या कोणत्याहि युगांत दिसून न येणारें वैशिष्ट्य भांडवलदारी युगाचें आहे. सर्व स्थायी व गंजलेले परस्पर-संबंध, व त्यांना जोडून अस्तित्वांत असलेले प्राचीन काळापासूनचे पूज्य दुराग्रह व मतें, कचऱ्यांप्रमाणें झाडून टाकण्यांत येतात, आणि नव्यानें अस्तित्वांत येणाऱ्या परस्पर-संबंधांना अचल बनण्यास संधी मिळण्यापूर्वींच ते जुनाट समजण्यांत येऊं लागतात. जें जें घट्ट व भक्कम आहे तें सर्व वितळून हवेंत उडून जातें, जें जें पवित्र आहे तें सर्व भ्रष्ट करण्यांत येतें आणि आपल्या जीवनाच्या खऱ्या परिस्थितीला

व इतर लोकांशीं असलेल्या आपल्या संबंधांना उघड्या डोळ्यांनीं तोंड देणें माणसाला अखेरीस भाग पडतें.

भांडवलदारवर्गाला आपला माल खपविण्यासाठीं सतत वाढत जाणारी बाजारपेठ आवश्यक असल्यामुळें त्याला सबंध पृथ्वी पालथी घालावी लागते. त्याला प्रत्येक ठिकाणीं ठाण मांडावें लागतें, प्रत्येक ठिकाणीं वसाहत करावी लागते, प्रत्येक ठिकाणीं संबंध जोडावे लागतात.

भांडवलदारवर्ग आपल्या व्यवहारासाठीं जागतिक बाजारपेठेचा उपयोग करीत असतो व त्यायोगें त्यानें प्रत्येक देशांतील उत्पादनाला व खपाला विश्वव्यापी स्वरूप आणलें आहे. प्रतिग्राम्यांना विशेष मनःस्ताप देणारी गोष्ट म्हणजे पूर्वी उद्योगधंदे ज्या राष्ट्रीय पायावर उभारलेले होते तो भांडवलदारवर्गानें उखडून टाकला आहे. जुन्या काळापासून प्रस्थापित झालेले सगळे राष्ट्रीय उद्योगधंदे नष्ट करण्यांत आले आहेत, किंवा दररोज नष्ट करण्यांत येत आहेत. त्यांची हकालपट्टी करून त्यांच्या जागीं नवे उद्योगधंदे अस्तित्वांत येत आहेत. हे नवे उद्योगधंदे सुरू करणें हा सर्व सुसंस्कृत राष्ट्रांना जीवनमरणाचाच प्रश्न होऊन बसला आहे. ह्या नव्या उद्योगधंद्यांत स्वतःच्या देशामध्यें उत्पन्न होणारा कच्चा माल आतां वापरण्यांत येत नाहीं, तर अत्यंत दूरच्या प्रदेशांतून आणलेला कच्चा माल वापरण्यांत येतो. ह्या नव्या उद्योगधंद्यांत तयार होणारा माल फक्त स्वदेशांतच नव्हे, तर पृथ्वीच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यांत, खपतो. स्वदेशांतील उत्पादनावर भागणाऱ्या जुन्या गरजा जाऊन त्यांच्या ऐवजीं नव्या गरजा अस्तित्वांत आलेल्या आपणांला आढळतात, व ह्या नव्या गरजा भागविण्यासाठीं दूरदूरच्या देशांतील माल लागतो. जुनी स्थानिक व राष्ट्रीय अलिप्तता व स्वयंपूर्णता जाऊन चोहोंकडे दळणवळण सुरू होतें व सर्व राष्ट्रें प्रत्येक बाबतींत परस्परावलंबी बनतात. आणि भौतिक उत्पादनाच्या क्षेत्रांत जें झालें तेंच बौद्धिक उत्पादनाच्या क्षेत्रांत घडून येतें. निरनिराळ्या राष्ट्रांनीं बौद्धिक क्षेत्रांत निर्माण केलेल्या गोष्टी सर्वांच्या मालकीच्या होतात. राष्ट्रीय एकांगीपणा व संकुचित दृष्टिकोन अधिकाधिक अशक्य होतो, व निरनिराळ्या राष्ट्रीय व स्थानिक वाङ्मयांतून जागतिक वाङ्मय उदयास येतें.

सर्व उत्पादन – साधनांत झपाट्यानें सुधारणा करून व दळणवळणाचीं साधनें अत्यंत सोपीं करून, भांडवलदारवर्ग सर्व राष्ट्रांना – अत्यंत रानटी राष्ट्रांनासुद्धां – संस्कृतीच्या कक्षेंत ओढून घेतो. त्याच्या मालाचा स्वस्तपणा हा जणू काय भयंकर तोफखानाच असतो, व त्याचा भडिमार करून तो सर्व चिनी भिंती जमीनदोस्त करतो व असंस्कृत समाजांतील लोकांना परकीयांविषयीं त्यांच्या मनांत दृढमूल झालेली द्वेषभावना दाबून टाकण्यास लावतो. तो सर्व राष्ट्रांना भांडवलदारी उत्पादन-पद्धतीचा स्वीकार करण्यास भाग पाडतो, कारण त्यांनीं तसें केलें नाहीं तर त्यांचा सर्वनाश ठरलेला असतो ; तो ज्याला 'संस्कृति' हें नांव देतो त्याचा अंगीकार करण्यास तो सर्व राष्ट्रांना भाग पाडतो, – म्हणजे तो त्यांना स्वतः भांडवलदारी राष्ट्रें बनण्यास लावतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, भांडवलदारवर्ग सारें जग आपल्यासारखें करून टाकतो.

भांडवलदारवर्गानें खेड्यापाड्यांना शहरांच्या हुकमतीखालीं आणलें आहे. त्यानें प्रचंड शहरें निर्माण केलीं आहेत, खेड्यांच्या मानानें शहरांच्या लोकसंख्येंत फारच वाढ केली आहे, आणि अशा रीतीनें लोकसंख्येचा बराच मोठा भाग ग्रामीण जीवनाच्या खुळचटपणांतून सोडविला आहे. त्यानें जसें खेड्यापाड्यांना शहरांवर अवलंबून राहावयास लावलें आहे, तसेंच असंस्कृत व अर्ध-संस्कृत देशांना सुसंस्कृत देशांवर, शेतीप्रधान देशांना भांडवलदारी देशांवर आणि पौर्वात्य देशांना पाश्चिमात्य देशांवर, अवलंबून राहावयास लावलें आहे.

लोकसंख्या, उत्पादन-साधनें, व मालमत्ता, या गोष्टी विखुरलेल्या असणें, ही स्थिति भांडवलदारवर्ग जास्त जास्त प्रमाणांत नाहींशी करीत असतो. त्यानें लोकवस्ती दाट केली आहे, उत्पादन-साधनें केन्द्रित केलीं आहेत, व मूठभर लोकांच्या हातांत मालमत्ता एकवटली आहे. ह्याचा क्रमप्राप्त परिणाम राजकीय केन्द्रीकरण हा झाला. ज्यांचे हितसंबंध; कायदे, सरकारें, कराच्या पद्धती, निरनिराळ्या होत्या अशा स्वतंत्र, किंवा शिथिल बंधनांनीं जोडलेल्या, प्रांतांना एकत्रित करून त्यांचें एकच सरकार, एकच कायदा, एकच राष्ट्रीय वर्गहित, एकच सरहद्द, व एकच जकातीचे दर असलेलें एक राष्ट्र बनविण्यांत आलें.

भांडवलदारवर्गानें आपल्या जेमतेम शंभर वर्षांच्या राजवटींत ज्या उत्पादन-शक्ती निर्माण केल्या आहेत त्या पूर्वीच्या सर्व पिढ्यांनीं मिळून निर्माण केलेल्या उत्पादन-शक्तींपेक्षांहि जास्त अवाढव्य व अजस्र आहेत. निसर्गाच्या शक्तींवरील माणसाचा ताबा, यंत्रें, उद्योगधंद्यांत व शेतींत रसायन-शास्त्राचा उपयोग, वाफेच्या आगबोटी, रेल्वे, तारायंत्र, समग्र खंड-प्रदेशांतील जंगलें तोडून तेथें लागवडीची सुरवात, नद्यांचे जलमार्गांत रूपांतर, जणूं काय जमिनींतून उगवल्याप्रमाणें ठिकठिकाणीं प्रचंड लोकवस्तीची वाढ, — अशा प्रकारच्या उत्पादन-शक्ती सामाजिक श्रमाच्या उदरांत सुप्त असतील अशी कल्पनासुद्धां पूर्वीच्या कोणत्या शतकांतील माणसांना सुचली होती ?

यावरून आपणांला पुढील गोष्ट दिसून येतेः ज्या उत्पादन-साधनांच्या व विनिमय-साधनांच्या पायावर भांडवलदारवर्गानें स्वतःची उभारणी केली, तीं साधनें सरंजामदारी समाजांत निर्माण झालीं होतीं. या उत्पादन-साधनांचा व विनिमय-साधनांचा विकास होत असतां अशी अवस्था येऊन पोंचली कीं, सरंजामदारी समाजांतील उत्पादन व विनिमय या क्रिया ज्या परिस्थितींत चालत होत्या ती परिस्थिति, म्हणजे शेतीची व उद्योगधंद्यांची सरंजामदारी संघटना, — थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, मालकीहक्काच्या बाबतींतले सरंजामदारी परस्पर-संबंध, — यापूर्वींच विकास पावलेल्या उत्पादनशक्तींना मानवेनासे झाले, पायांतल्या बेड्यांप्रमाणें त्यांचा अडथळा होऊं लागला. ह्या बेड्या तोडून टाकणें भाग होतें; व त्या तोडण्यांत आल्या.

त्यांच्याऐवजीं अनिर्बंध चढाओढ सुरू झाली, व तिला सोईची असणारी सामाजिक व राजकीय घटना त्याचवेळीं अस्तित्वांत आली, व भांडवलदारवर्गाची आर्थिक व राजकीय हुकमतहि त्याचवेळीं स्थापन झाली.

अशाच प्रकारचे आंदोलन आज आपल्या डोळ्यांदेखत होत आहे. आधुनिक भांडवलदारी समाजांत उत्पादन, विनिमय, व मालकीहक्क, यांच्या बाबतींत विशिष्ट प्रकारचे परस्पर-संबंध अस्तित्वांत आलेले आहेत, व ह्या समाजानें उत्पादनाचीं आणि विनिमयाचीं अजस्र साधनें निर्माण केलीं आहेत, परंतु एकाद्या जादूगारानें आपल्या मंत्रतंत्राच्या जोरावर भुताखेतांना बोलवावें व मग त्यांना काबूंत ठेवणें त्याला अशक्य व्हावें तशीच ह्या भांडवलदारी

समाजाची स्थिति झाली आहे. गेल्या कित्येक दशकांतील उद्योगधंद्यांचा व व्यापाराचा इतिहास म्हणजे आधुनिक उत्पादनाच्या परिस्थितीविरुद्ध, भांडवलदारवर्ग व त्याची राजवट यांच्या अस्तित्वासाठीं आवश्यक असलेल्या मालकीसंबंधांविरुद्ध, आधुनिक उत्पादन-शक्तींनीं केलेल्या बंडाचाच इतिहास होय. याचें उदाहरण म्हणून व्यापारी अरिष्टांचा उल्लेख केला तरी पुरें होईल. हीं अरिष्टें ठराविक मुदतीनें पुनः पुनः उद्भवतात व समग्र भांडवलदारी समाजाचें अस्तित्वच कितपत समर्थनीय आहे असा प्रश्न — प्रत्येक वेळीं पुर्वीच्या पेक्षांहि जास्त भीतिदायक स्वरूपांत — उपस्थित करतात. ह्या प्रत्येक अरिष्टाच्या प्रसंगीं समाजांत असलेल्या मालापैकीं बराचसा भाग नष्ट होतो, एवढेंच नव्हे तर पूर्वी तयार केलेल्या उत्पादन-शक्तींचाहि बराच भाग नष्ट होतो. ह्या अरिष्टांच्या वेळीं जणूं काय एका रोगाची सांथ सुरू होते — त्याचें नांव अत्युत्पादन. पूर्वीच्या कोणत्याहि युगांतील लोकांना हें अशक्यच वाटलें असतें. समाजाला एकाएकीं आढळून येतें कीं आपण क्षणभर पुनः रानटी अवस्थेला येऊन पोंचलों आहोंत; असा भास होतो कीं जणूं काय दुष्काळ पडल्यामुळें किंवा जगभर अत्यंत संहारक युद्ध सुरू झाल्यामुळें प्रत्येक जीवनावश्यक वस्तूचा पुरवठाच बंद पडला आहे; उद्योगधंदे व व्यापार नष्ट झाल्यासारखे वाटतात. आणि याचें कारण काय? कारण हेंच कीं जगांत संस्कृतीचा प्रसार वाजवीपेक्षां जास्त झाला, जीवनावश्यक वस्तूचा सांठा वाजवीपेक्षां जास्त झाला, उद्योगधंद्याचा विस्तार वाजवीपेक्षां जास्त झाला, व्यापार वाजवीपेक्षां जास्त वाढला. भांडवलदारी मालकी — हक्काच्या अस्तित्वासाठीं आवश्यक असलेल्या परिस्थितीच्या विकासाला, समाजांत उपलब्ध असलेल्या उत्पादन-शक्तींकडून इतःपर चालना मिळत नाहीं; उलट बंधनरूप झालेल्या या परिस्थितीस त्या उत्पादन-शक्ती अनावर होतात आणि हीं बंधनें त्यांनीं तोडून टाकतांच समग्र भांडवलदारी समाजांत अव्यवस्था माजते व भांडवलदारी मालकी हक्काचें अस्तित्वच धोक्यांत येतें. त्या शक्तीनीं निर्माण केलेली संपत्ति भांडवलदारी समाज-परिस्थितीच्या अरुंद चौकटींत सामावूं शकत नाहीं. ह्या अरिष्टांचें निवारण भांडवलदारवर्ग कसें करतो? एक उपाय म्हणजे उत्पादन-शक्तींचा मोठा भाग सक्तीनें नष्ट करणें, व दुसरा उपाय म्हणजे नव्या बाजारपेठा जिंकून

घेणें व जुन्या बाजारपेठांना पूर्वीपेक्षांहि जास्त जोरानें पिळून काढणें. पण याचाच अर्थ जास्त विस्तृत व जास्त विध्वंसक अशा नव्या अरिष्टांचा माग मोकळा करणें व अरिष्टें टाळण्याचीं साधनें कमी करणें हा होतो.

ज्या शस्त्रास्त्रांच्या जोरावर भांडवलदारवर्गानें सरंजामशाहीला धुळीस मिळविलें, तींच आज खुद्द भांडवलदारवर्गाविरुद्ध उलटलीं आहेत.

पण भांडवलदारवर्गानें स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत होणारीं शस्त्रास्त्रेंच तेवढीं निर्माण केलीं असें नव्हे, तर ह्या शस्त्रास्त्रांचा जे उपयोग करणार असे लोकसुद्धां त्यानें अस्तित्वांत आणले आहेत, व ते म्हणजे – आधुनिक कामगारवर्ग.

ज्या प्रमाणांत भांडवलदारवर्गाचा – म्हणजेच भांडवलाचा – विकास होतो, त्याच प्रमाणांत कामगारवर्गाचाहि विकास होतो. हे आधुनिक कामगार अशा प्रकारचे कामगार आहेत कीं त्यांना जोंपर्यंत काम मिळतें तोंपर्यंतच जगतां येतें, व त्यांच्या श्रमानें जोंपर्यंत भांडवल वाढतें तोंपर्यंतच त्यांना काम मिळतें. ह्या श्रम करणाऱ्या लोकांना स्वतः चीच खंडशः विक्री करावी लागते, इतर सर्व बाजारी चिजांप्रमाणेंच ते क्रयवस्तु असतात, व म्हणून चढाओढीचे हेलकावे आणि बाजारभावांचे चढउतार यांचे सर्व दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतात.

यंत्रांचा उपयोग वाढल्यामुळें व श्रम-विभागणीमुळें कामगारांच्या कामास वेगळें वैशिष्ठ्य असें मुळींच उरलेलें नाहीं, व म्हणून त्या कामांत कामगाराला कांहीं गोडी वाटेनाशी झाली आहे. तो यंत्राला जोडलेला एक भाग बनतो व त्याच्याकडून अत्यंत साध्या, अत्यंत कंटाळवाण्या, व अगदीं सहज शिकतां येण्यासारख्या कामाचीच अपेक्षा केली जाते. म्हणून कामगाराचा उत्पादन-खर्च जवळजवळ पूर्णपणें त्याच्या उदरनिर्वाहासाठीं व प्रजोत्पादनासाठीं आवश्यक असलेल्या वस्तूंपुरताच मर्यादित असतो. पण क्रयवस्तूची किंमत – व म्हणून श्रमाची किंमत[5] – तिच्या उत्पादन खर्चाइतकी असते. म्हणून ज्या प्रमाणांत कामाचा किळसवाणेपणा वाढतो, त्या प्रमाणांत मजुरी कमी होते. एवढेंच नव्हे तर, ज्या प्रमाणांत यंत्रांचा उपयोग व श्रमविभागणी यांची वाढ होते, त्याच

प्रमाणांत श्रमाचा बोजासुद्धां वाढतो, कारण एक तर कामाचे तास वाढविण्यांत येतात, किंवा विशिष्ट वेळांत जास्त काम पुरें करून घेण्यांत येतें, किंवा यंत्रांची गति वाढविण्यांत येते, किंवा अशाच दुसऱ्या युक्त्या योजण्यांत येतात.

आधुनिक उद्योगधंद्यांमुळें जुन्या काळांतील आपापल्या कुटुंबाचा स्वतंत्र धंदा चालविणाऱ्या कारागिरांचीं चिमुकलीं दुकानें जाऊन औद्योगिक भांडवलदारांचे प्रचंड कारखाने अस्तित्वांत आले आहेत. कारखान्यांत कोंबण्यांत येणाऱ्या शेकडों कामगारांकडून लष्करी शिपायांच्या शिस्तीनें काम करून घेण्यांत येतें. औद्योगिक फौजेंतील साधे शिपाई या नात्यानें त्यांना अधिकाऱ्यांच्या हुकमतीखालीं ठेवण्यांत येतें व फौजेच्या धर्तीवर या अधिकाऱ्यांचेहि खालपासून वरपर्यंत निरनिराळे हुद्दे असतात. हे कामगार भांडवलदारवर्गाचे व भांडवलदारी राज्यसत्तेचे गुलाम असतातच, पण त्याखेरीज त्यांना दररोज व दर घटकेला यंत्राकडून, मुकादमाकडून, व विशेषतः त्या त्या कारखान्याचा मालक असलेल्या भांडवलदारी व्यक्तीकडून गुलामाप्रमाणें राबविण्यांत येतें. नफा कमविणें हाच आपला उद्देश आहे असें जितक्या जास्त उघडपणानें ही जुलुमशाही जाहिर करते, तितकी ती जास्त क्षुद्रपणाची, तिरस्करणीय, व चीड आणणारी बनते.

शारीरिक श्रमांतील कुशलतेची व ताकतीची आवश्यकता जसजशी कमी होते, म्हणजे आधुनिक उद्योगधंद्यांचा विकास जसजसा जास्त होतो, तसतसा पुरुषांच्या श्रमाऐवजीं स्त्रियांच्या व बालकांच्या श्रमाचा जास्त जास्त उपयोग करण्यांत येतो. कामगारवर्गाच्या बाबतींत वय व लिंग यांची भिन्नता सामाजिकदृष्ट्या आतां लक्ष्यांत घेतली जात नाहीं. सर्वजण श्रमाचीं साधनेंच समजले जातात, फरक इतकाच कीं वयोमानाप्रमाणें किंवा लिंगभेदाप्रमाणें त्यांना कमीजास्त किंमत पडते.

कामगार आपला रोख पगार घेऊन कारखानदाराच्या पिळणुकीच्या चरकांतून बाहेर पडतो न पडतो, तोंच घरमालक, दुकानदार, सावकार, वगैरे भांडवलदारवर्गाचे इतर घटक त्याच्यावर तुटून पडतात.

मध्यम वर्गांतील खालचे थर — म्हणजे लहानसहान धंदे करणारे लोक, दुकानदार, व एकंदरीनें आपल्या धंद्यांतून निवृत्त झालेले लोक, तसेंच

हातकारागिर व शेतकरी, – हे सर्व खालावत जाऊन क्रमाक्रमानें कामगारवर्गांत दाखल होतात. याचें एक कारण म्हणजे, आधुनिक उद्योगधंदे जितक्या मोठ्या प्रमाणावर चालतात तितक्या प्रमाणावर आपला धंदा चालविण्यास त्यांचें तुटपुंजें भांडवल पुरें पडत नाहीं, व मोठ्या भांडवलदारांशीं चढाओढ करतांना त्यांचा धुव्वा उडतो. दुसरें कारण म्हणजे, त्यांचें विशिष्ट धंद्यांतील कौशल्य नव्या उत्पादन-पद्धतींमुळें कुचकामाचें ठरतें. अशा रीतीनें जनतेच्या सर्व वर्गांतून कामगारवर्गाच्या संख्येंत भर पडत असते.

कामगारवर्ग विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांतून जातो. त्याच्या जन्मापासूनच भांडवलदारवर्गाविरुद्ध त्याचा लढा सुरू होतो. आरंभीं एकेक कामगार व्यक्तिशः झगडतो, पुढें एकेका कारखान्यांतील सर्व कामगार एक होऊन लढतात, व त्यानंतर एकेका ठिकाणचे एकेका धंद्यांतले सर्व कामगार लढा चालवितात, व हा लढा त्यांची प्रत्यक्ष पिळणूक करणाऱ्या विशिष्ट भांडवलदाराविरुद्ध व्यक्तिशः असतो. त्यांच्या हल्ल्यांचा रोख उत्पादनाच्या भांडवलदारी परिस्थितीविरुद्ध नसतो, तर उत्पादन-साधनांविरुद्ध असतो; आपल्या श्रमाशीं चढाओढ करणारा परदेशांतून आयात झालेला माल ते नष्ट करतात; यंत्रांचा चक्काचूर करतात, कारखान्यांना आगी लावतात, मध्ययुगांत कामगारांचा जो दर्जा होता, व जो आतां नाहींसा झाला आहे, तो ते बळजबरीनें प्रस्थापित करूं पाहतात.

ह्या अवस्थेंत असतांना कामगारांत अजून एकजूट झालेली नसते, ते सबंध देशभर विखुरलेले असतात, व आपापसांतील चढाओढीमुळें त्यांच्यांत फूट असते. जर एखाद्या ठिकाणीं त्यांनीं एकजूट करून स्वतःला अधिक संघटित समूह बनविलें, तर तो त्यांच्या स्वतःच्या बुद्धिपुरःसर ऐक्याचा परिणाम नसतो, तो भांडवलदारवर्गाच्या ऐक्याचाच परिणाम असतो. भांडवलदारवर्गाला स्वतःचे राजकीय उद्देश साधण्यासाठीं सबंध कामगारवर्गास चालना देणें भाग पडतें, व विशेष गोष्ट म्हणजे या अवस्थेपर्यंत त्याला हें तात्पुरतें शक्य होतें. म्हणून ह्या अवस्थेंत कामगार स्वतःच्या शत्रूंविरुद्ध लढत नाहींत, तर आपल्या शत्रूंच्या शत्रूंविरुद्ध – म्हणजे अनियंत्रित राजेशाहीचे अवशेष, जमीनदार, उद्योगधंद्यांत न गुंतलेले भांडवलदार, छोटे

भांडवलदार, यांच्याविरुद्ध – ते लढतात. अशा रीतीनें ऐतिहासिक हालचालीचीं सर्व सूत्रें भांडवलदारवर्गाच्या हातीं एकवटलेलीं असतात ; या प्रकारें मिळविलेला प्रत्येक विजय हा भांडवलदारवर्गाचाच विजय असतो.

पण उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर कामगारवर्गाचें संख्याबल वाढतें, इतकेंच नव्हे तर तो अधिक मोठ्या संख्येंत केन्द्रित होतो, त्याचें सामर्थ्य वाढतें, व त्याला ह्या सामर्थ्याची अधिक जाणीव होते. यंत्रांमुळें श्रमाचे सर्व भेद जसजसे लोप पावतात व बहुतेक सर्वत्र मजुरीचे दर एकाच खालच्या पातळीवर येतात, तसतसे कामगारवर्गाच्या गोटांत जे निरनिराळे हितसंबंध असतात व जीवनाची जी निरनिराळी परिस्थिति असते त्या सर्वांना बरोबरीच्या दर्जाचें स्वरूप येत जातें. भांडवलदारांची आपापसांतील चढाओढ वाढत गेल्यामुळें, व त्याचा परिणाम म्हणून व्यापारी अरिष्टें उद्भवल्यामुळें, कामगारांच्या मजुरींत जास्तच अस्थिरता येते. यंत्रांत अव्याहतपणें व वाढत्या वेगानें सुधारणा होत असल्यामुळें कामगारांच्या उदरनिर्वाहाचा अनिश्चितपणा वाढत जातो ; एकेक कामगार व भांडवलदार यांच्यामधील झगड्यांना दोन वर्गांमधील झगड्याचें स्वरूप जास्त जास्त येऊं लागतें. त्यानंतर भांडवलदारांविरुद्ध कामगार आपले संघ स्थापन करण्यास सुरवात करतात. पगारकाट टाळण्यासाठीं ते आपलीं मंडळें अस्तित्वांत आणतात ; मधूनमधून कराव्या लागणाऱ्या या बंडांची आगाऊ तयारी करण्यासाठीं ते कायम स्वरूपाच्या संस्था स्थापन करतात. कांहीं ठिकाणीं ह्या झगड्याला उघड बंडाचें स्वरूप येतें.

कधीं कधीं कामगारांचा विजय होतो, पण तो तात्पुरताच असतो. त्यांच्या लढ्यांपासून मिळणारा खरा फायदा तात्कालिक विजय हा नसून कामगारांची सतत वाढत जाणारी एकी हाच असतो. आधुनिक उद्योगधंद्यांमुळें जीं सुधारलेलीं दळणवळणाचीं साधनें निर्माण होतात, त्यायोगें ह्या एकीची वाढ होण्यास मदत होते, कारण त्यांच्यायोगें निरनिराळ्या ठिकाणच्या कामगारांचा एकमेकांशीं संबंध जडतो. निरनिराळ्या ठिकाणचे स्थानिक लढे एकाच स्वरूपाचे असतात, व ते अनेक लढे केन्द्रित करून वर्गावर्गांतला एकच राष्ट्रव्यापी लढा उभारण्यासाठीं ह्या परस्परसंबंधांचीच काय ती जरूरी असते. पण प्रत्येक वर्ग-लढा राजकीय लढा असतो.

मध्ययुगांत रस्त्यांची सोय अगदीं गचाळ असल्यामुळें त्या वेळच्या नागरिकांना जी एकी करण्यास कैक शतकें लागलीं, तीच एकी आधुनिक कामगार रेल्वेच्या साहाय्यानें थोड्याच वर्षांत घडवून आणतात.

कामगारांची संघटना करून त्यांचें वर्ग-ऐक्य घडवून आणण्याच्या व त्यायोगें त्यांचा राजकीय पक्ष अस्तित्वांत आणण्याच्या ह्या कार्यांत खुद्द कामगारांच्या आपापसांतील चढाओढीमुळें पुनः पुनः बिघाड होत असतो. पण ही संघटना नेहमीं पुनः डोकें वर काढते, व पूर्वीपेक्षांहि जास्त जोरदार, खंबीर, व प्रभावी बनते. खुद्द भांडवलदार वर्गांतील फुटीचा फायदा घेऊन ह्या संघटनेच्या योगें कामगारांच्या विशिष्ट हिताचे कायदे पास करण्यास भाग पाडण्यांत येतें. याच प्रकारें इंग्लंडमध्यें दहा तासांचा कायदा पास करण्यांत आला.

एकंदरीनें पाहतां जुन्या समाजव्यवस्थेंतील निरनिराळ्या वर्गांच्या आपापसांतील संघर्षामुळें कामगारवर्गाच्या विकासाला अनेक परींनीं चालनाच मिळते. भांडवलदारवर्गावर सतत लढा करण्याचा प्रसंग आलेला असतो. प्रथम त्याला उमराववर्गाविरुद्ध लढावें लागतें; त्यानंतर त्याला खुद्द भांडवलदारवर्गाच्याच कांहीं विभागांविरुद्ध लढावें लागतें, कारण त्यांचे हितसंबंध उद्योगधंद्यांच्या वाढीला बाधक बनलेले असतात; आणि परदेशांतील भांडवलदारवर्गाविरुद्ध तर त्याला नेहमींच लढावें लागतें. ह्या सर्व लढ्यांत कामगारवर्गाची मनधरणी करणें, त्याची मदत मागणें, व अशा रीतीनें त्याला राजकारणाच्या आखाड्यांत ओढणें, भांडवलदारवर्गाला भाग पडतें. म्हणून खुद्द भांडवलदारवर्गाकडूनच कामगारवर्गाला त्याच्या राजकीय व सर्वसाधारण शिक्षणाचे प्राथमिक पाठ मिळतात. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, भांडवलदारवर्गाविरुद्ध लढण्यासाठीं लागणारीं शस्त्रें भांडवलदारवर्गच कामगारांच्या हातीं देतो.

शिवाय आपण वर पाहिलेंच आहे कीं राज्यकर्त्या वर्गाचे अनेक विभाग उद्योगधंद्यांच्या प्रगतीमुळें कामगारवर्गाच्या अवस्थेंत ढकलेले जातात, किंवा निदान त्यांना आपली जीवन-परिस्थिति कायम ठेवणें लवकरच अशक्य होण्याचा धोका उत्पन्न होतो. या लोकांमुळेंसुद्धां कामगारवर्गाच्या शिक्षणांत व प्रगतींत आणखी भर पडते.

शेवटीं वर्गलढा जेव्हां निर्वाणीच्या अवस्थेला पोचूं लागतो, अशा वेळीं राज्यकर्त्या वर्गांत – किंबहुना समग्र जुन्या समाजांत – चालू असलेली विघटनात्मक प्रवृत्ति इतकें भडक व स्फोटक स्वरूप धारण करते कीं, राज्यकर्त्या वर्गाचा एक लहानसा विभाग फुटून निघतो व क्रांतिकारक वर्गास – म्हणजे भवितव्याची किल्ली ज्याच्या हातांत असते अशा वर्गास – येऊन मिळतो. म्हणून पूर्वीच्या काळांत ज्याप्रमाणें उमराववर्गाचा एक विभाग भांडवलदारवर्गाला येऊन मिळाला, त्याचप्रमाणें आतां भांडवलदारवर्गाचा एक विभाग कामगारवर्गाला येऊन मिळतो; ज्यांनीं समग्र ऐतिहासिक हालचालींचें तात्त्विकदृष्ट्या आकलन करण्यापर्यंत स्वतःची प्रगति केली आहे असे कांहीं भांडवलदारी तत्त्वविशारद कामगारवर्गाच्या बाजूला येतात.

आज भांडवलदारवर्गासमोर उभे ठाकलेल्या सर्व वर्गांत फक्त कामगारवर्गच खराखुरा क्रांतिकारक वर्ग आहे. बाकीचे सर्व वर्ग आधुनिक उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर ऱ्हास पावतात व नष्ट होतात; उलट कामगारवर्ग म्हणजे आधुनिक उद्योगधंद्यांचे स्वतःचे बाळ आहे.

मध्यमवर्ग – म्हणजे छोटे कारखानदार, दुकानदार, कारागीर, शेतकरी, – हे सर्वजण भांडवलदारवर्गाविरुद्ध लढतात, तेव्हां त्यांचा उद्देश मध्यमवर्गाचे विभाग या नात्यानें आपलें अस्तित्व नष्ट होऊं न देणें हाच असतो. म्हणून ते क्रांतिकारक नसतात, तर ते सद्यःस्थिति कायम ठेवूं इच्छिणारेच असतात. किंबहुना ते प्रतिगामी असतात, कारण ते इतिहासाचा गाडा मागें ढकलण्याचीच धडपड करतात. जर ते क्रांतिकारक बनण्याचा योग आलाच, तर त्याचें कारण हें कीं आपण लवकरच कामगारवर्गाच्या अवस्थेंत ढकलले जाणार याची त्यांना जाणीव झालेली असते; म्हणजे ते स्वतःच्या आजच्या हितांचा नव्हे, तर उद्यांच्या हितांचा बचाव करतात; ते स्वतःच्या वर्गाचा दृष्टिकोन सोडून देतात व कामगारवर्गाचा दृष्टिकोन स्वीकारतात.

'धोक्याचा' समजण्यांत येणारा व समाजांतील घाण असलेला जो मवाली वर्ग – म्हणजे जुन्या समाजाच्या अगदीं खालच्या थरांतून बाहेर फेंकला गेलेला व डबक्यांतील घाणीप्रमाणें कुजत राहणारा वर्ग – तो क्वचित प्रसंगीं कामगारक्रांतीमुळें चळवळींत ओढला जाण्याचा संभव असतो; तथापि

प्रतिगाम्यांच्या कारस्थानाला हातभार लावणारे भाडोत्री हस्तक हीच भूमिका घेण्यास त्याची जीवन-परिस्थिति त्याला जास्त लायक बनविते.

जुन्या समाजामध्यें सर्वसाधारणपणें अस्तित्वांत असलेल्या गोष्टींपैकीं जवळजवळ कोणतीच गोष्ट कामगारवर्गाच्या परिस्थितींत आढळत नाहीं. कामगाराची स्वतःची मालमत्ता नसते; त्याचें आपल्या बायकामुलांशीं असलेलें नातें भांडवलदारी कुटुंबांतील नात्यांहून अगदीं वेगळ्या प्रकारचें असतें; आधुनिक उद्योगधंद्यांतील श्रमाची पद्धत, आधुनिक भांडवलदारी गुलामी, जशी फ्रान्समध्यें असते तशीच इंग्लंडमध्यें असते, जशी जर्मनींत असते तशीच अमेरिकेंत असते, व त्यामुळें कामगारांच्या राष्ट्रीय वैशिष्ठ्याचा मागमूससुद्धां शिल्लक उरत नाहीं. कामगाराच्या दृष्टीनें कायदा, नीति, धर्म हीं सर्व भांडवलदारी थोतांडें आहेत, व त्यांचा उपयोग केवळ भांडवलदारी स्वार्थ झाकणें एवढाच असतो.

पूर्वी ज्या ज्या वर्गांनीं सत्ता मिळविली त्यांनीं त्यांनीं आपल्या विशिष्ट द्रव्यार्जन-पद्धतीचा पगडा सबंध समाजावर बसविला व आपणांला अगोदरच प्राप्त झालेलें स्थान भक्कम करण्याचा त्यांनीं अशा रीतीनें प्रयत्न केला. उलट कामगारांना आपली पूर्वीची द्रव्यार्जन-पद्धति रद्द केल्याशिवाय व त्यायोगें पूर्वीच्या सगळ्या द्रव्यार्जन-पद्धतीसुद्धां रद्द केल्याशिवाय स्वतः समाजांतील उत्पादनशक्तींवर ताबा मिळवितां येत नाहीं. त्यांच्याजवळ स्वतःचें असें कांहींसुद्धां नसतें कीं जें त्यांनी सुरक्षित ठेवावें व भक्कम करावें; वैयक्तिक मालकी-हक्क कायम व सुरक्षित ठेवण्यासाठीं जी जी तरतूद करण्यांत आलेली असते ती सगळी नष्ट करणें, हेंच त्यांचें जीवित-कार्य असतें.

ह्यापूर्वीच्या सर्व ऐतिहासिक चळवळी अल्पसंख्याकांच्या चळवळी होत्या किंवा अल्पसंख्याकांच्या हितासाठीं होत्या. कामगार चळवळ प्रचंड बहुसंख्येची आणि प्रचंड बहुसंख्येच्या हिताची स्वतंत्र चळवळ असते, व तिला स्वतःला या गोष्टीची जाणीव असते. कामगारवर्ग – म्हणजे आपल्या सध्यांच्या समाजांतील सर्वांत खालचा थर – अधिकृत समाजव्यवस्थेंतील वरच्या सर्व थरांना हवेंत भिरकावून दिल्याशिवाय स्वतःचा उद्धार करूं शकत नाहीं.

कामगारवर्गाचा भांडवलशाही-विरोधी लढा अंतरंगाच्या दृष्टीनें जरी नव्हे तरी बाह्यांगाच्या दृष्टीनें मात्र आरंभीं राष्ट्रीय लढा असतो. प्रत्येक देशांतील कामगारवर्गाला प्रथम अर्थात्‌च स्वत:च्या भांडवलदारवर्गाचाच समाचार घ्यावा लागतो.

कामगारवर्गाच्या विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांचें चित्रण करतांना स्थूलमानानें सध्यांच्या समाजांत कमी-अधिक प्रच्छन्न रीतीनें चालू असलेल्या यादवी युद्धाचा आपण आढावा घेतला व शेवटीं अशा टप्प्यापर्यंत येऊन पोचलों कीं, जेव्हां ह्या युद्धाला उघड क्रांतीचें स्वरूप येतें व भांडवलदारवर्गाचें जबरदस्तीनें उच्चाटन होऊन कामगारवर्गाच्या हुकमतीचा पाया रचला जातो.

आपण पाहिलेंच आहे कीं आतांपर्यंतची प्रत्येक समाज-पद्धति जुलुम करणारे व जुलमानें गांजलेले यांच्या परस्परविरोधावर आधारलेली होती. परंतु एखाद्या वर्गावर जुलुम करावयाचा असेल तर त्याला गुलाम म्हणून निदान जिवंत तरी राहतां येण्यासाठीं कांहीं विशिष्ट गोष्टींची त्याला हमी दिली पाहिजे. भूदास-पद्धतीच्या काळांत भूदास स्वत:चा दर्जा वाढवून कम्यूनचा सदस्य बनत असे, व सरंजामदारी एकतंत्री सत्तेच्या जोखडाखालीं छोटे भांडवलदार कोणत्या तरी रीतीनें स्वत:ची उन्नति करून भांडवलदार बनत असत. उलटपक्षीं उद्योगधंद्यांच्या प्रगतीबरोबर आधुनिक कामगार वर चढण्याऐवजीं जास्त जास्त खोल बुडत जातो, व त्याच्या स्वत:च्या वर्गाच्या जीवन-परिस्थितीपेक्षांहि अधिक हीन अशा अवस्थेपर्यंत तो जाऊन पोंचतो. तो कंगाल बनतो, व लोकसंख्येच्या आणि संपत्तीच्या मानानें कंगालपणाची वाढ जास्त वेगानें होते. यावरून स्पष्टपणें दिसून येतें कीं भांडवलदारवर्ग समाजांतील सत्ताधारी वर्ग म्हणून राहण्यास व स्वत:च्या अस्तित्वास आवश्यक असलेली परिस्थिति एक घटनात्मक कायदा म्हणून समाजावर सक्तीनें लादण्यास आतां नालायक झाला आहे. तो राज्य करण्यास नालायक आहे, कारण स्वत:च्या गुलामाला गुलामगिरीच्या अवस्थेंत कां होईना निदान जिवंत राहतां येईल इतकीसुद्धां हमी तो देऊं शकत नाहीं, व त्या गुलामाकडून आपण पोसले जाण्याऐवजीं आपणांवरच त्याला पोसण्याची पाळी यावी इतक्या अवस्थेपर्यंत तो खालावत जात

असतांना देखील भांडवलदारवर्ग कांहीं उपाय करूं शकत नाहीं. ह्या भांडवलदारवर्गाच्या अमलाखालीं जगणें समाजाला यापुढें अशक्य झालें आहे, म्हणजे या वर्गाचे अस्तित्व यापुढें समाज-धारणेशीं विसंगत झाले आहे.

भांडवलदारवर्गाच्या अस्तित्वासाठीं व वर्चस्वासाठीं आवश्यक असलेली मुख्य गोष्ट भांडवल अस्तित्वांत येणें व वाढत जाणें ही असते; व भांडवल अस्तित्वांत येण्यासाठीं आवश्यक असलेली मुख्य गोष्ट मोल-मजुरी ही असते. मोल-मजुरी कामगारांच्या आपापसांतल्या चढाओढीवरच अवलंबून असते. उद्योग-धंद्यांची प्रगति होण्यास भांडवलदारवर्ग नकळत चालना देतो, व त्याचा परिणाम असा होतो कीं चढाओढीमुळें निर्माण झालेला कामगारांचा विस्कळितपणा नाहींसा होऊन सहकार्यामुळें निर्माण झालेली कामगारांची क्रांतिकारक एकजूट अस्तित्वांत येते. अशा रीतीनें आधुनिक उद्योगधंद्यांच्या विकासामुळें भांडवलदारवर्गाच्या उत्पादनाचा व द्रव्यार्जनाचा पायाच उखडला जातो. याचा अर्थ असा कीं भांडवलदारवर्ग सर्वांत महत्त्वाची जी चीज उत्पन्न करतो ती म्हणजे त्याला स्वतःलाच मूठमाती देणारा वर्ग ही होय. भांडवलदारवर्गाचा पाडाव व कामगारवर्गाचा विजय ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच अटळ आहेत.

## [२]

# कामगार व कम्युनिस्ट

कम्युनिस्टांचा एकंदर कामगारांशीं कोणता संबंध असतो ?

कम्युनिस्ट पक्ष म्हणजे इतर कामगारवर्गीय पक्षांच्या विरुद्ध असलेला एक निराळा पक्ष नव्हे.

एकंदर कामगारवर्गाच्या हितसंबंधांहून निराळे व अलग असे कम्युनिस्टांचे कोणतेहि हितसंबंध नसतात.

कामगार चळवळीला विशिष्ट वळण देण्यासाठीं पंथाभिनिवेशानें प्रेरित झालेलीं स्वतःचीं कोणतींहि खास तत्त्वें कम्युनिस्ट मांडीत नाहींत.

इतर कामगार-वर्गीय पक्षांपेक्षां कम्युनिस्टांत जें विशेष असतें तें एवढेंच : (१) निरनिराळ्या देशांतील कामगारांच्या राष्ट्रीय लढ्यांत कम्युनिस्ट असें दाखवून देतात व प्रामुख्यानें सांगतात कीं समग्र कामगारवर्गाचे हितसंबंध एकच आहेत, मग ते कामगार कोणत्याहि राष्ट्रांचे असोत. (२) कामगारवर्गाच्या भांडवलशाहीविरोधी लढ्याला विकासाच्या ज्या निरनिराळ्या अवस्थांतून जावें लागतें, त्या प्रत्येक अवस्थेंत कम्युनिस्ट सदैव व सर्वत्र एकंदर चळवळीच्याच हिताचा पुरस्कार करतात.

म्हणून एकीकडे व्यावहारिक दृष्ट्या कम्युनिस्ट पक्ष हा प्रत्येक देशांतील कामगारवर्गीय पक्षांचा सर्वांत पुढारलेला व खंबीर असा विभाग असतो व तो इतर सर्वांना पुढें ढकलत नेतो ; आणि दुसरीकडे तात्त्विक दृष्ट्या कम्युनिस्टांना सर्वसाधारण कामगार जनतेच्या मानानें एक विशेष

अनुकूलता अशी असते कीं कामगार चळवळीच्या प्रगतीची दिशा, तिची परिस्थिति, व तिचें सर्वसाधारण अंतिम फळ, यांचें त्यांना स्पष्ट आकलन झालेलें असतें.

इतर सर्व कामगारवर्गीय पक्षांचें जें तात्कालिक ध्येय असतें तेंच कम्युनिस्टांचें असतें; व तें म्हणजे: कामगारवर्गाला वर्ग या नात्यानें संघटित करणें, भांडवलदारवर्गाचें वर्चस्व उलथून पाडणें, कामगारवर्गानें सत्ता काबीज करणें.

कम्युनिस्टांचे तात्त्विक सिद्धांत सबंध जगाचा उद्धार करूं पाहाणाऱ्या कोणातरी महापुरुषानें शोधून काढलेल्या किंवा स्वतःच्या डोक्यांतून काढलेल्या कल्पनांवर किंवा तत्त्वांवर मुळींच आधारलेले नसतात.

विद्यमान वर्गलढ्यांतून, आपल्या डोळ्यांदेखत चालू असलेल्या ऐतिहासिक हालचालींतून, जे वास्तविक परस्पर-संबंध अस्तित्वांत येतात, तेच कम्युनिस्टांच्या सिद्धांतांमध्यें सर्वसाधारण स्वरूपांत व्यक्त केलेले असतात. मालकीहक्काच्या बाबतींतले चालू संबंध रद्द करणें हें कांहीं कम्युनिझमचेंच खास वैशिष्टय नव्हे.

भूतकाळांतील मालकी-हक्कांच्या बाबतींतल्या सर्व संबंधांत ऐतिहासिक परिस्थितींतील बदलामुळें सतत ऐतिहासिक बदल घडून आला आहे.

उदाहरणार्थ फ्रेंच राज्यक्रांतीनें सरंजामदारी मालकी-हक्काची पद्धत रद्द करून भांडवलदारी मालकी हक्काची पद्धत अस्तित्वांत आणली.

कम्युनिझमचें खास वैशिष्ठ्य एकंदरीनें मालकी-हक्क रद्द करणें हें नसून भांडवलदारी मालकी हक्क रद्द करणें हेंच आहे. परंतु आधुनिक भांडवलदारी खासगी मालकी म्हणजे वर्गविरोधांवर उभारलेल्या – मूठभर लोकांनीं बहुसंख्येची पिळणूक करण्याच्या तत्त्वावर उभारलेल्या – उत्पादन व द्रव्यार्जन पद्धतीचेंच अंतिम व अत्यंत परिणत स्वरूप होय.

ह्या अर्थानें कम्युनिस्टांच्या सिद्धांतांचा सारांश एका वाक्यांत सांगतां येईल व तें म्हणजे खासगी मालकी रद्द करणें.

आम्हां कम्युनिस्टांवर असा आरोप करण्यांत येतो, कीं स्वतःच्या श्रमाचें फळ म्हणून स्वतःची वैयक्तिक मालमत्ता कमाविण्याचा माणसाचा हक्क आम्ही रद्द करूं इच्छितो. हा मालकी-हक्क सर्व व्यक्ति-

स्वातंत्र्याचा, वैयक्तिक कृतीचा व व्यक्तीच्या स्वावलंबनाचा पाया आहे, असें सांगण्यांत येतें.

कष्टानें मिळविलेली मालमत्ता! स्वतः कमाविलेली, स्वतःच्या श्रमानें संपादन केलेली मालमत्ता! लहान कारागिरांच्या व लहान शेतकऱ्यांच्या मालमत्तेला अनुलक्षून तुम्ही हें बोलतां काय? भांडवलदारी पद्धतीची मालकी अस्तित्वांत येण्यापूर्वी अशा प्रकारची मालकी अस्तित्वांत होती. पण ती रद्द करण्याची आतां गरज उरलेली नाहीं; उद्योगधंद्यांच्या वाढीमुळें ती बऱ्याच अंशानें केव्हांच नष्ट झाली आहे, व अजून दररोज नष्ट होत आहे.

कीं आधुनिक भांडवलदारी खासगी मालकीला अनुलक्षून तुम्हीं हें बोलतां?

पण मोलमजुरीमुळें कामगारांसांठी मालमत्ता निर्माण होते का? मुळींच नाहीं. मोलमजुरीमुळें भांडवल निर्माण होतें, म्हणजे अशा प्रकारची मालमत्ता निर्माण होते कीं जी मोलमजुरीची पिळणूक करते व जी वाढण्याचा एकच मार्ग म्हणजे आणखी पिळणूक करण्यासाठीं मोल-मजुरांचा नवा तांडा अस्तित्वांत आणणें हाच असतो. सध्यांच्या स्वरूपाची मालकी भांडवल व मोलमजुरी यांमधील विरोधावर आधारलेली आहे. ह्या विरोधाच्या दोन्ही बाजूंचें आपण परीक्षण करूं.

भांडवलदार होणें याचा अर्थ उत्पादनाच्या क्षेत्रांत केवळ वैयक्तिकच नव्हे तर सामाजिक स्थान व्यापणें हा असतो. भांडवल सामुदायिक रीत्या निर्माण होतें, व अनेक माणसांच्या संयुक्त कार्यामुळेंच – किंबहुना अंतिम दृष्ट्या समाजांतील सर्व माणसांच्या संयुक्त कार्यामुळेंच – त्याला गति मिळूं शकतें.

म्हणून भांडवल ही एक वैयक्तिक शक्ति नव्हे, तर सामाजिक शक्ति आहे.

म्हणून भांडवलाला समाईक मालमत्ता बनविल्यामुळें – समाजांतील सर्व माणसांची मालमत्ता बनविल्यामुळें – वैयक्तिक मालमत्तेचें सामाजिक मालमत्तेंत रूपांतर होत नाहीं. त्या मालमत्तेच्या सामाजिक स्वरूपांतच बदल होतो. तिचें वर्गीय स्वरूप नाहींसें होतें.

आतां मोलमजुरीचा प्रश्न घेऊं.

मोलमजुरीची सरासरी किंमत किमान पगाराइतकी असते, म्हणजे मजुराला केवळ मजूर म्हणून कसेंबसें जिवंत ठेवण्यासाठीं उदरनिर्वाहाच्या वस्तूंचें जेवढें प्रमाण अगदींच आवश्यक असतें तेवढीच ही किंमत असते. म्हणून मजुरी करणारा कामगार आपल्या श्रमानें जें कमावितो तें त्याला जेमतेम जिवंत राहण्यास व प्रजोत्पादन करण्यास पुरेल इतकेंच असतें. श्रमाच्या फळाची ही वैयक्तिक कमाई रद्द करण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं. ह्या कमाईचा उद्देश केवळ जिवंत राहातां यावें व प्रजोत्पादन करतां यावें एवढाच असतो, व इतरांच्या श्रमावर स्वामित्व गाजविण्यासाठीं कामास येईल अशी शिल्लक तिच्यांतून मुळींच उरत नाहीं. आम्हांला फक्त एकच गोष्ट नष्ट करावयाची आहे व ती म्हणजे ह्या कमाईचें हीन स्वरूप, कारण या पद्धतीखालीं मजुरांचें जिणें फक्त भांडवल वाढविण्यासाठींच असतें व राज्यकर्त्या वर्गाच्या हितासाठीं जेवढ्या अंशानें जरूर असतें तेवढ्याच अंशानें त्याला जगूं देण्यांत येतें.

भांडवलदारी समाजांत सजीव श्रम हा केवळ संचित श्रम वाढविण्याचेंच एक साधन असतो. कम्युनिस्ट समाजांत संचित श्रम हा कामगाराचें जीवन अधिक व्यापक, संपन्न, व उन्नत करण्याचेंच एक साधन असतो.

म्हणून भांडवलदारी समाजांत वर्तमानकाळावर भूतकाळाचें वर्चस्व असते; कम्युनिस्ट समाजांत भूतकाळावर वर्तमानकाळाचें वर्चस्व असतें. भांडवलदारी समाजांत भांडवल स्वतंत्र असतें व त्याला व्यक्तित्व असतें, पण सजीव माणूस परतंत्र असतो व त्याला व्यक्तित्व नसतें.

आणि ही परिस्थिति नाहींशी करणें म्हणजेच व्यक्तित्व व स्वातंत्र्य नष्ट करणें होय, असें भांडवलदार म्हणतात! बरोबर आहे. भांडवलदारी व्यक्तित्व, भांडवलदारी स्वातंत्र्य, भांडवलदारी अनिर्बंधता, यांच्याविरुद्ध शस्त्र उपसण्यांत आलें आहे यांत शंका नाहीं.

सध्यांच्या भांडवलदारी उत्पादनाच्या परिस्थितींत स्वातंत्र्य याचा अर्थ व्यापार-स्वातंत्र्य, खरेदी-विक्रीचें स्वातंत्र्य, असाच होतो.

पण जर खरेदी व विक्री बंद झाली, तर खरेदीचें व विक्रीचें स्वातंत्र्यसुद्धां नष्ट होणारच. खरेदी-विक्रीच्या स्वातंत्र्यासंबंधींच्या ह्या

बडबडीला, सर्वसाधारणपणें स्वातंत्र्यासंबंधीं आमच्या भांडवलदारांच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या 'वीरश्रीयुक्त' घोषणांना, जर कांहीं अर्थ असेल तर तो मध्ययुगांतील खरेदी-विक्री वरील निर्बंधांशीं, त्यावेळच्या बंधन-पीडित व्यापाऱ्यांशीं, तुलना करण्याच्या दृष्टीनेंच; परंतु खरेदी-विक्री, भांडवलदारी उत्पादन-पद्धति आणि खुद्द भांडवलदार वर्ग या सर्वांचेंच उच्चाटन करणाऱ्या कम्युनिस्ट पद्धतीविरुद्ध या घोषणांना व गर्जनांना कांहींच अर्थ उरत नाहीं.

खासगी मालकी नष्ट करण्याचा आमचा बेत आहे हें तुम्हांला फार भयंकर वाटतें, पण तुमच्या सध्यांच्या समाजांत नऊ-दशांश लोकसंख्येच्या बाबतींत खासगी मालकी केव्हांच नष्ट झालेली आहे; मूठभर लोकांच्या बाबतींत खासगी मालकी अस्तित्वांत आहे याचें सुद्धां एकच कारण आहे व तें म्हणजे त्या नऊ-दशांश लोकांच्या हातीं मुळींच खासगी मालकी नाहीं. म्हणजे तुम्ही आमच्यावर जो आरोप करतां त्याचा अर्थ एवढाच कीं, समाजांतील बहुसंख्येच्या हातीं मुळींच मालकी नसण्यावरच जिचें अस्तित्व अवलंबून आहे अशा प्रकारची मालकी आम्ही नष्ट करूं इच्छितों.

थोडक्यांत सांगवयाचें म्हणजे, आम्ही तुमची मालकी नष्ट करूं इच्छितों हाच आमच्यावर तुमचा आरोप आहे. अगदीं खरें, आम्ही नेमकें हेंच करूं इच्छितों.

ज्या क्षणीं श्रमाचें भांडवलांत, पैशांत किंवा खंडांत रूपांतर करणें — म्हणजे मूठभर लोकांच्या हातींच जिची मक्तेदारी येऊं शकते अशा सामाजिक शक्तींत रूपांतर करणें — अशक्य होतें, म्हणजे ज्या क्षणीं वैयक्तिक मालमत्तेचें भांडवलदारी मालमत्तेंत रूपांतर करणें — भांडवलांत रूपांतर करणें — अशक्य होतें, त्या क्षणापासून व्यक्तित्व नाहींसें होतें असें तुमचें म्हणणें आहे.

म्हणजे तुमच्या दृष्टीनें व्यक्ति याचा अर्थ भांडवलदार, मालमत्तेचा मालक असलेला भांडवलदारवर्ग, एवढाच आहे, हें तुम्हांला कबूल करावें लगेल. ह्या 'व्यक्ती'चा खरोखरच नाश केला पाहिजे.

समाजानें निर्माण केलेल्या वस्तु आपल्या उपभोगांत घेण्याचा कोणत्याहि माणसाचा अधिकार कम्युनिझम हिरावून घेत नाहीं; पण

त्यायोगें इतरांच्या श्रमावर हुकमत गाजविण्याचा त्याचा अधिकार मात्र कम्युनिझम जरूर हिरावून घेतो.

खासगी मालकी रद्द झाल्यावर सर्व काम बंद पडेल व सर्वत्र आळसाचें राज्य होईल, असा एक आक्षेप मांडण्यांत येतो.

या मताप्रमाणें भांडवलदारी समाज केवळ निरुद्योगीपणामुळें केव्हांच धुळीस मिळावयास हवा होता; कारण या समाजांतील जे लोक काम करतात त्यांना कांहीं मिळकत करता येत नाहीं, व ज्यांना कांहीं मिळकत निर्माण करता येते ते काम करीत नाहींत. हा आक्षेप म्हणजे "जर भांडवल नाहींसें झालें तर मोल-मजुरी चालू राहूं शकणार नाहीं," ह्या द्विरुक्तिमय विधानाचाच अनुवाद आहे.

भौतिक वस्तूंचें उत्पादन व त्यांची मालकी यासंबंधींच्या कम्युनिस्ट पद्धतीविरुद्ध जे जे आक्षेप घेण्यांत येतात ते सगळे बौद्धिक वस्तूंचें उत्पादन व त्यांची मालकी यासंबंधींच्या कम्युनिस्ट पद्धतीविरुद्धहि घेण्यांत आले आहेत. वर्गीय मालकी नाहींशी होणें म्हणजे खुद्द उत्पादनच नाहींसें होणें असें ज्याप्रमाणें भांडवलदाराला वाटतें त्याचप्रमाणें वर्गीय संस्कृति नाहींशी होणें व एकंदर संस्कृति नाहींशी होणें या दोन्ही गोष्टी एकच होत असा त्याचा समज असतो.

ज्या संस्कृतीच्या नाशाबद्दल तो शोक करतो, ती संस्कृति प्रचंड बहुसंख्येच्या बाबतींत यंत्र म्हणून काम करण्याचें शिक्षण देणारीच संस्कृति असते.

परंतु स्वातंत्र्य, संस्कृति, कायदा, इत्यादि बाबतींत तुमच्या ज्या भांडवलदारी कल्पना आहेत त्यांचीच कसोटी जोंपर्यंत तुम्हीं भांडवलदारी मालकी नष्ट करण्याच्या आमच्या ध्येयाला लावतां, तोंपर्यंत तुम्ही आमच्याशीं वाद घालण्याचें कांहीं कारण नाहीं. तुमच्या ह्या कल्पनाच मुळीं तुमच्या भांडवलदारी उत्पादनाच्या व भांडवलदारी मालकीच्या परिस्थितींतून जन्मास आल्या आहेत. तसेंच तुमच्या वर्गाचीच इच्छा कायदा म्हणून सर्वांवर लादण्यांत येते व तेंच तुमचें कायदेशास्त्र बनतें. त्या इच्छेचें स्वरूप व तिची दिशा मुख्यतः काय असणार हें तुमच्या वर्गाच्या

अस्तित्वासाठीं आवश्यक असलेल्या आर्थिक परिस्थितीच्या योगेंच निश्चित होतें.

तुमची सध्यांची उत्पादन-पद्धति व मालकी-हक्काची पद्धति इतिहास-क्रमानें अस्तित्वांत आली आहे व हे ऐतिहासिक परस्पर-संबंध उत्पादनाच्या प्रगतीबरोबर उदय पावतात व अस्तास जातात, परंतु ह्या पद्धतीपासून निर्माण झालेल्या सामाजिक प्रकारांनाच निसर्गाचे व बुद्धीचे त्रिकालाबाधित नियम मानण्यास स्वार्थी गैरसमजुतीमुळें तुम्हीं प्रवृत्त झालां आहांत. तुमच्यापूर्वीं होऊन गेलेल्या प्रत्येक राज्यकर्त्या वर्गानेंसुद्धां हाच गैरसमज उराशीं बाळगला होता. प्राचीन काळांतील मालकी-हक्कांच्या पद्धतीच्या बाबतींत जें तुम्हांला स्पष्ट दिसतें, सरंजामदारी मालकी-हक्कांच्या पद्धतीच्या बाबतींत जें तुम्हीं कबूल करतां, तेंच तुमच्या स्वतःच्या भांडवलदारी मालकी-हक्कांच्या पद्धतीच्या बाबतींत कबूल करण्यास तुम्हांला अर्थात् मनाई आहे.

कुटुंबसंस्था रद्द करणें! कम्युनिस्टांची ही नीच सूचना कानीं पडतांच जहालांतले जहालसुद्धां खवळून उठतात.

सध्यांच्या कुटुंबसंस्थेचा – म्हणजे भांडवलदारी कुटुंबसंस्थेचा – पाया कोणता आहे? भांडवल, खासगी प्राप्ति, हाच. ह्या कुटुंबसंस्थेचे अगदीं परिपूर्ण स्वरूप फक्त भांडवलदारवर्गांतच आढळतें. पण त्यालाच पूरक म्हणून दोन गोष्टी असतातः एक म्हणजे कामगारवर्गांत कुटुंबसंस्थेचा जवळजवळ अभाव, व दुसरी म्हणजे सार्वजनिक वेश्या-व्यवसाय.

भांडवलदारी कुटुंबसंस्थेला पूरक असलेल्या ह्या दोन गोष्टी जेव्हां नाहींशा होतील तेव्हां ती कुटुंबसंस्थासुद्धां स्वाभाविकपणेंच नाहींशीं होईल आणि जेव्हां भांडवल नाहींसें होईल तेव्हां भांडवलदारी कुटुंबसंस्था व तिला पूरक असलेल्या गोष्टी नाहींशा होतील.

आईबापांकडून आपल्या मुलांची जी पिळणूक होते ती आम्ही बंद करूं इच्छितों, असा आमच्यावर तुमचा आरोप आहे काय? हा गुन्हा आम्हीं सपशेल कबूल करतों.

किंवा, तुम्ही असें म्हणाल कीं गृहशिक्षणाऐवजीं सामाजिक शिक्षण सुरू करून अत्यंत पवित्र नातें आम्ही नष्ट करीत आहोंत.

तुमचें शिक्षण! तेंसुद्धां सामाजिक नसतें का? तुम्ही ज्या सामाजिक परिस्थितींत शिक्षण देतां तिच्यायोगेंच, – शाळा वगैरेंच्या द्वारें समाजाकडून जो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करण्यांत येतो त्याच्या योगेंच, – ह्या शिक्षणाचें स्वरूप निश्चित होत असतें, हें खरें ना? शिक्षणाच्या क्षेत्रांत समाजानें हस्तक्षेप करणें, ही कम्युनिस्टांच्या डोक्यांतून निघालेली नवी शक्कल नव्हे. मात्र ह्या हस्तक्षेपाचें स्वरूप बदलण्याचा व शिक्षणावरील राज्यकर्त्या वर्गाचा पगडा काढून टाकण्याचा ते जरूर प्रयत्न करतात.

आधुनिक उद्योगधंद्यांच्या परिणामामुळें कामगारवर्गांतील कुटुंब-संस्थेची सर्व बंधनें तडातड तुटतात, आणि त्यांचीं मुलेंबाळें केवळ बाजारी चिजा व श्रमाचीं साधनें बनतात, आणि हें जितकें जास्त प्रमाणांत घडून येतें तितकीं कुटुंब-संस्था, शिक्षण, आईबाप व मुलें यांचे पवित्र संबंध, याविषयीं भांडवलदारांच्या तोंडून निघणारीं सुभाषितें जास्त किळसवाणीं वाटतात.

पण स्त्रियांना समाईक मालमत्ता समजण्याची पद्धत तुम्हीं कम्युनिस्ट अमलांत आणणार आहांत, असें सबंध भांडवलदारवर्ग एकसुरांत किंचाळतो.

भांडवलदार स्वतःच्या पत्नीकडे केवळ उत्पादनाचें साधन म्हणूनच पाहतो. उत्पादनाच्या साधनांचा उपयोग समाईक रीतीनें करण्यांत येणार आहे असें त्याच्या कानीं येतें, व त्यावरून स्वाभाविकपणें तो एकच अनुमान वाढूं शकतो कीं समाईक मालकीच्या वस्तु होण्याचें स्त्रियांच्यासुद्धां नशिबीं येणार.

केवळ उत्पादनाचीं साधनें हा स्त्रियांचा दर्जा नाहींसा करणें, हाच खरा उद्देश आहे, याची त्याला तिळमात्र शंका येत नाहीं!

तथापि स्त्रियांना मालमत्ता मानण्याची प्रथा कम्युनिस्ट उघडपणें व अधिकृत रीतीनें अमलांत आणणार आहेत असा कांगावा करून आमचे भांडवलदार त्या प्रथेविरुद्ध जो सात्त्विक संताप व्यक्त करतात, त्यासारखे हास्यास्पद दुसरें कांहींहि नसेल. स्त्रियांना समाईक मालमत्ता मानण्याची प्रथा सुरू करण्याची कम्युनिस्टांना कांहीं गरज नाहीं; ही प्रथा जवळ जवळ अनादिकालापासून अस्तित्वांत आहे.

आमच्या भांडवलदारांना सामान्य वेश्यांचा व आपल्या हाताखालील कामगारांच्या बायकामुलींचा उपभोग घेऊन तृप्ति होत नाही, एकमेकांच्या बायकांशीं व्यभिचार करण्यांत त्यांना सर्वांत जास्त मजा वाटते.

खरें पाहतां भांडवलदारी विवाह म्हणजे समाईक पत्नीत्वाचाच एक प्रकार होय. म्हणून फारतर कम्युनिस्टांवर कदाचित् एवढाच आरोप करतां येईल की दांभिकपणानें लपून छपून करण्यांत येणारा हा प्रकार बंद करून त्याऐवजीं ते उघडपणें कायदेशीर समाईक पत्नीत्व अमलांत आणूं चाहतात. या सर्व भाकडकथांच्या विरुद्ध हे सत्य उघड नाहीं कां कीं सध्यांची उत्पादन-पद्धति नाहींशी होतांच त्या पद्धतींतून उद्भवणारी स्त्रियांना समाईक मालकी मानण्याची प्रथासुद्धां – म्हणजे सार्वजनिक व खासगी वेश्यागमनाची प्रथासुद्धां – नाहींशी झालीच पाहिजे.

कम्युनिस्टांवर आणखी असा आरोप करण्यांत येतो कीं त्यांना देश व राष्ट्रीयत्व या गोष्टीहि नाहींशा करावयाच्या आहेत.

कामगारांना देश नसतो. त्यांच्याजवळ जें नाहीं तें त्यांच्याकडून काढून घेणें आम्हांला शक्य नाहीं. कामगारवर्गानें प्रथम राजकीय वर्चस्व मिळविलें पाहिजे, राष्ट्रांतील प्रमुख वर्ग होण्याची पायरी गांठली पाहिजे, राष्ट्र म्हणजे आपण स्वतःच अशी स्थिति अस्तित्वांत आणली पाहिजे, व एवढ्यापुरतें पाहतां कामगारवर्ग स्वतःच राष्ट्रीय असतो, मात्र 'राष्ट्रीय' या शब्दाच्या भांडवलदारी अर्थानें तो राष्ट्रीय नसतो.

भांडवलदारवर्गाचा विकास, व्यापाराचें स्वातंत्र्य, जागतिक बाजारपेठ, उत्पादनपद्धतींत एकसारखेपणा, व त्याला अनुसरून जीवनाच्या परिस्थितींतसुद्धां एकसारखेपणा, या गोष्टींमुळें निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेंतील राष्ट्रीय भिन्नपणा व विरोध दिवसेंदिवस जास्त जास्त नाहींसे होत आहेत.

कामगारवर्गाचें वर्चस्व स्थापन झाल्यावर ते आणखी जास्त वेगानें नाहींसे होतील. कामगारवर्गाच्या दास्यमोचनासाठीं आवश्यक असलेली एक पहिली गोष्ट – निदान प्रमुख सुधारलेल्या देशांनीं – एकजुटीनें लढा करणें हीच आहे.

एका व्यक्तीकडून करण्यांत येणारी दुसऱ्या व्यक्तीची पिळणूक ज्या प्रमाणांत बंद करण्यांत येईल, त्या प्रमाणांत एका राष्ट्राकडून करण्यांत येणारी दुसऱ्या राष्ट्राची पिळणूक सुद्धां बंद करण्यांत येईल. ज्या प्रमाणांत राष्ट्रांतील निरनिराळ्या वर्गांचे परस्पर-विरोध नाहींसे होतील, त्या

प्रमाणांत एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राविषयीं वाटणारी वैरभावनाही नष्ट होइल.

धार्मिक, तत्त्वज्ञानविषयक, व सर्वसाधारणतः वैचारिक भूमिकेवरून कम्युनिझमविरुद्ध जे आरोप करण्यांत येतात ते गंभीरपणें परीक्षण करण्याच्या लायकीचे नाहींत.

माणसाच्या भौतिक जीवनाची परिस्थिति, त्याचे सामाजिक संबंध व त्याचें सामाजिक जीवन, यांत जे जे बदल होतात त्यांस अनुसरून त्याच्या कल्पना, मतें, विचार, यांतहि बदल होतो – थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्याची जाणीव बदलते – हें लक्ष्यांत येण्यासाठीं विशेष बुद्धिचापल्याची कांहीं गरज आहे का?

भौतिक उत्पादन ज्या प्रमाणांत बदलतें त्याच प्रमाणांत बौद्धिक उत्पादनाचें स्वरूप बदलतें, हीच गोष्ट विचारांच्या इतिहासावरून सिद्ध होत नाहीं का? नेहमीं प्रत्येक युगांतील प्रचलित विचार त्या युगांतील राज्यकर्त्या वर्गाचेच विचार असतात.

समाजांत क्रांति घडवून आणणाऱ्या विचारांविषयीं जेव्हां लोक बोलतात तेव्हां त्याचा अर्थ एवढाच असतो कीं, जुन्या समाजांत नव्या समाजाचीं बीजें निर्माण झालीं आहेत व जुन्या जीवन-परिस्थिती बरोबरच जुन्या विचारांची वाताहत होत आहे.

प्राचीन जग मृत्युपंथास लागलें असतांना प्राचीन काळांतील निरनिराळ्या धर्मांवर ख्रिस्ती धर्मानें विजय मिळविला. अठराव्या शतकांत ख्रिस्ती धर्मांतील विचारांना बुद्धिवादी विचारांपुढें हार खावी लागली, त्यावेळीं सरंजामदारी समाज तेव्हांच्या क्रांतिकारक भांडवलदारवर्गाविरुद्ध प्राणांतिक लढा करीत होता. अनिर्बंध चढाओढीचें राज्य सुरू झालें आहे ही गोष्टच धार्मिक व वैचारिक स्वातंत्र्याच्या कल्पनांच्या द्वारें ज्ञानांच्या क्षेत्रांत व्यक्त झाली.

यावर असें सांगण्यांत येइल कीं, "धार्मिक, नैतिक, तत्त्वज्ञानविषयक, व राज्यशास्त्रविषयक कल्पनांमध्यें ऐतिहासिक विकासाच्या ओघांत निःसंशय बदल झाला आहे. परंतु धर्म, नीति, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, कायदा, या गोष्टी मात्र नेहमीं तशाच टिकून राहिल्या आहेत."

"शिवाय स्वातंत्र्य, न्याय, इत्यादि सत्यें शाश्वत आहेत व तीं समाजाच्या कोणत्याहि स्थितींत सारखींच आढळतात. परंतु कम्युनिझम शाश्वत सत्यांची, सर्व धर्माची व सर्व नीतिमत्तेची हकालपट्टीच करतो, त्यांची नव्या पायावर प्रतिष्ठापना करीत नाहीं; म्हणून कम्युनिझमचें कार्य पूर्वीच्या सर्व ऐतिहासिक अनुभवाच्या विरुद्ध असतें."

ह्या आरोपाचा अर्थ काय होतो? वर्ग-विरोधांचा विकास होत जाणें हाच आतांपर्यंतच्या सर्व समाजाचा इतिहास आहे. ह्या वर्गविरोधांनीं निरनिराळ्या युगांत निरनिराळीं रूपें धारण केलीं.

परंतु त्यांचें रूप कोणतेंहि असलें तरी एक गोष्ट आतांपर्यंतच्या सर्व निरनिराळ्या युगांत सारखीच आढळते, व ती म्हणजे समाजाच्या एका विभागाकडून होणारी दुसऱ्या विभागाची पिळणूक. तेंव्हां यांत कांहींच आश्चर्य नाहीं कीं पूर्वीच्या सर्व युगांतील विचार-प्रवाह, त्यांच्यांत कितीही भिन्नता व विविधता असली तरी, सामाजिक जाणिवेच्या एका विशिष्ट चौकटींतच राहिलेले आहेंत. वर्गविरोधांचा संपूर्ण नाश होईपर्यंत ही सामाजिक जाणीव अस्तित्वांत राहणारच.

कम्युनिस्ट क्रांति म्हणजे परंपरागत मालकी-हक्कांच्या संबंधाचा अगदीं समूळ उच्छेद करणें; अर्थात् या क्रांतीच्या विकासाबरोबर परंपरागत कल्पनांचा सुद्धां अगदीं समूळ उच्छेद होतो, यांत नवल नाहीं.

पण कम्युनिझमविरुद्ध भांडवलदारांच्या आक्षेपांचा समाचार घेणें आतां आपण आटोपतें घेऊं.

आपण वर पाहिलें आहे कीं कामगार-वर्गाच्या क्रांतींतील पहिली पायरी कामगार-वर्गाला राज्यकर्त्या वर्गाच्या दर्जाला आणून पोंचविणें, लोकशाहीच्या संग्रामांत यश मिळविणें, हीच आहे.

कामगारवर्ग भांडवलदारवर्गाच्या हातून सर्व भांडवल क्रमाक्रमानें हिसकावून घेण्यासाठीं, सर्व उत्पादन-साधनें सरकारच्या हातीं— म्हणजे राज्यकर्ता वर्ग या नात्यानें संघटित झालेल्या कामगारवर्गाच्या हातीं — केन्द्रित करण्यासाठीं व एकूण उत्पादन-शक्तींची वाढ शक्य तितक्या वेगानें करण्यासाठीं, आपल्या राजकीय वर्चस्वाचा उपयोग करील.

अर्थात् आरंभींच्या काळांत हें कार्य मालकी-हक्कांवर आणि

भांडवलदारी उत्पादनाच्या परिस्थितीवर जबरदस्तीनें आक्रमण केल्याशिवाय पार पाडतां येणार नाहीं. म्हणजे आर्थिक दृष्ट्या जे प्रथम अपुरे व कमजोर वाटतात, पण चळवळीच्या ओघांत ज्यांची नैसर्गिक वाढ होते, व उत्पादन-पद्धतींत संपूर्ण क्रांति घडवून आणण्यासाठीं ज्यांचा उपयोग करणें अपरिहार्य आहे, असे उपाय हें कार्य पार पाडण्यासाठीं योजावे लागतील.

हे उपाय निरनिराळ्या देशांत अर्थात् निरनिराळे असतील.

तथापि सर्वांत पुढारलेल्या देशांमध्यें पुढील कार्यक्रम सर्वसाधारणपणें योग्य होईल.

(१) जमिनीवरील मालकी रद्द करणें, व जमिनीचा सर्व खंड सार्वजनिक कार्यासाठीं वापरणें.

(२) पुष्कळच चढत्या प्रमाणांत प्राप्तीवरील कर.

(३) वडिलोपार्जित मिळकतीचे सर्व हक्क रद्द करणें.

(४) परदेशांत पळून गेलेल्या किंवा बंड करणाऱ्या सर्व लोकांची मालमत्ता जप्त करणें.

(५) पतीचे व्यवहार सरकारच्या हातीं केन्द्रित करणें, व त्यासाठीं सरकारी भांडवलानें राष्ट्रीय बँक स्थापन करणें व तिलाच सर्व व्यवहाराची मक्तेदारी देणें.

(६) दळणवळणाचीं व वाहतुकीचीं साधनें सरकारच्या हातीं केन्द्रित करणें.

(७) सरकारी मालकीच्या कारखान्यांचा व उत्पादन-साधनांचा विस्तार वाढविणें; पडीत जमिनी लागवडीखालीं आणणें, व एक सर्वसाधारण योजना आंखून तिच्याप्रमाणें एकंदर जमिनीची सुधारणा करणें.

(८) काम करण्याची सर्वांवर सारखीच जबाबदारी. औद्योगिक फौजांची स्थापना (विशेषतः शेतीसाठीं).

(९) कारखान्यांतील उद्योगधंद्यांशीं शेतीचा संयोग; लोकसंख्येची वांटणी देशभर जास्त सम प्रमाणांत करून शहरें व खेडीं यांमधील भेद क्रमाक्रमानें नाहींसा करणें.

(१०) सर्व मुलांना सार्वजनिक शाळांत मोफत शिक्षण. मुलांनीं कारखान्यांत काम करण्याची सध्यांची पद्धत बंद करणें. औद्योगिक उत्पादनाशीं शिक्षणाचा संयोग घडवून आणणें, इत्यादि.

विकासक्रमानें जेव्हां वर्गभेद नाहींसे होतील, व समग्र राष्ट्ररूपी प्रचंड सहकारी संस्थेच्या हातीं सर्व उत्पादन केन्द्रित होईल तेव्हां सार्वजनिक सत्तेचें राजकीय स्वरूप नाहींसें होईल. खऱ्याखुऱ्या अर्थानें राजकीय सत्ता म्हणजे इतर वर्गांवर जुलुम करण्यासाठीं एका वर्गाच्या हातीं असलेली संघटित सत्ताच होय. भांडवलदारवर्गाविरुद्ध लढाई करतांना कामगारवर्गाला वर्ग या नात्यानें स्वतःला संघटित करणें परिस्थितीमुळेंच भाग पडतें; क्रांतीच्या मार्गानें तो स्वतःला राज्यकर्ता वर्ग बनवितो. व त्या नात्यानें तो उत्पादनाच्या जुन्या परिस्थितीचें जबरदस्तीनें उच्चाटन करतो; व म्हणून ह्या परिस्थितीबरोबर वर्गविरोधांच्या व एकंदरीनें वर्गभेदांच्या अस्तित्वासाठीं आवश्यक असलेल्या परिस्थितीचेंहि त्याच्याकडून उच्चाटन झालेलें असेल, व त्यायोगें वर्ग या नात्यानें स्वतःचें वर्चस्वसुद्धां त्यानें रद्द केलेलें असेल.

वर्गभेद व वर्गविरोध यांनीं युक्त असलेला जुना भांडवलवारी समाज नाहींसा होऊन त्याऐवजीं एक सहकारी समाज अस्तित्वांत येईल; ह्या नव्या समाजांत प्रत्येक व्यक्तीचा अनिबंध विकास होणें हीच सर्वांचा अनिबंध विकास होण्याची अट असते.

# [३]

# समाजसत्तावादी व कम्युनिस्ट वाङ्मय

## (१) प्रतिगामी समाजसत्तावाद

### (अ) सरंजामदारी समाजसत्तावाद

फ्रान्स व इंग्लंड ह्या देशांतील उमराववर्गांना ऐतिहासिक दृष्टया जें स्थान प्राप्त झालें होतें त्याचा परिणाम म्हणून त्यांनीं आधुनिक भांडवलदारी समाजाविरुद्ध चोपडीं लिहिण्याचा धंदा सुरू केला. भांडवलदारांना उपटसुंभ समजून ते त्यांचा तिरस्कार करीत असत, पण जुलै १८३० च्या फ्रेंच क्रांतींत व इंग्लंडमधील पार्लमेंटरी सुधारणेच्या चळवळींत याच भांडवलदारांनीं त्यांना पुनः चीत केलें. तेव्हांपासून परिणामकारक राजकीय लढा करण्याचें नांव काढणेंच त्यांना अशक्य होऊन बसलें. फक्त वाङ्मयाच्या क्षेत्रांतच लढा करण्याची त्यांना आतां शक्यता उरली. पण वाङ्मयाच्या क्षेत्रांतसुद्धां पुनः स्थापनेच्या काळांतील* जुन्या घोषणांचा उपयोग करणें अशक्य झालें होतें.

लोकांची सहानुभूति मिळविण्यासाठीं उमराववर्गाला स्वतःचे हितसंबंध

---

*म्हणजे इंग्लंडमधील १६६० ते १६८९ पर्यंतचा पुनःस्थापनेचा काळ नव्हे, तर फ्रान्समधील १८१४ ते १८३० पर्यंतचा पुनःस्थापनेचा काळ. (एंगल्स : १८८८ च्या इंग्लिश आवृत्तींतील टीप.)

वरकरणीं नजरेआड करणें व पिळल्या जाणाऱ्या कामगारवर्गाच्याच हिताच्या दृष्टीनें भांडवलदारवर्गाविरुद्ध आरोप-पत्रिका तयार करणें भाग पडलें. उमरावांनीं आपल्या नव्या धन्याविरुद्ध तिखट उपरोधानें भरलेले लेख लिहिले व भावी सत्यानाशाचीं भयानक भाकितें त्याला सुनावलीं, व अशा रीतीनें त्याच्यावर सूड उगविला.

या प्रकारें सरंजामदारी समाजसत्तावाद उदयास आला. त्याच्यांत शोक आणि उपरोध यांचें मिश्रण होतें, भूतकाळाचे पडसाद आणि भविष्यकाळाची भयसूचक घंटा या दोन्ही गोष्टी त्याच्यांत होत्या; कधीं कधीं त्याचें तीव्र, भेदक, व चतुर टीकास्त्र भांडवलदारांचा अचूक मर्मभेद करीत असे, पण आधुनिक इतिहासाच्या गतीचें आकलन करून घेण्यास तो पूर्णपणें असमर्थ असल्यामुळें त्याचा परिणाम नेहमींच हास्यास्पद होत असे.

जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठीं हे उमराव कामगाराची भिक्षेची झोळी हातांत घेऊन तिलाच आपला झेंडा बनवीत असत. पण जनता त्यांच्या पाठीशीं जमा होऊन पाहते तों त्यांच्या पाठीवर जुना सरंजामदारी वर्गाचा शिक्का! मग सर्वजण तिरस्कारानें हंसत व त्या उमरावांना सोडून जात.

कांहीं फ्रेंच लेजिटिमिस्टांचा व 'तरुण इंग्लंड'[6] संस्थेच्या सभासदांचा थेट असाच तमाशा झाला.

आपली पिळणुकीची पद्धत भांडवलदारांच्या पद्धतीपेक्षां निराळी होती, असें सरंजामशाहीवाले म्हणतात, पण ते एक गोष्ट विसरतात कीं ज्या परिस्थितींत ते पिळणूक करीत होते तीसुद्धां अगदीं निराळी होती व ती आतां जुनीपुराणी ठरली आहे. आपल्या राजवटींत आधुनिक कामगारवर्ग अस्तित्वांतच नव्हता असें ते सांगतात, पण आधुनिक भांडवलदारवर्ग त्यांच्याच समाजपद्धतींतून स्वाभाविकपणें जन्मास आला ह्याचा मात्र त्यांना विसर पडतो.

शिवाय ते आपल्या टीकेचें प्रतिगामी स्वरूप झांकून ठेवण्याचा फारसा प्रयत्न करीत नाहींत, व म्हणून भांडवलदारांविरुद्ध ते जो मुख्य आरोप करतात त्याचा अर्थ एवढाच असतो कीं जुन्या समाजव्यवस्थेचें समूळ उच्चाटन करणें हेंच ज्याचें जीवितकार्य असा एक वर्ग ह्या भांडवलदारी राजवटींत विकास पावत आहे.

भांडवलदारवर्ग कामगारवर्गाला जन्मास आणतो यापेक्षां तो क्रांतिकारक कामगारवर्गाला जन्मास आणतो म्हणूनच हे लोक भांडवलदारवर्गाविरुद्ध बोटें मोडीत असतात.

म्हणून राजकीय कृतीची वेळ आली म्हणजे हे लोक कामगारवर्गाविरुद्ध योजण्यांत आलेल्या सर्व दडपशाहीच्या उपायांना पाठिंबा देतात; व तोंडानें ते कितीहि उच्च तत्त्वांचा घोष करोत, तथापि त्यांना उद्योगधंद्यांच्या वृक्षावरून पडलेलीं सोनेरी फळें वेचण्यांत, आणि लोकर, बीटरूट साखर, व बटाट्याची दारू यांच्या व्यापारासाठीं सत्य, प्रेम, इज्जत, यांचा सौदा करण्यांत मुळींच कमीपणा वाटत नाहीं.*

पाद्री नेहमीं जमीनदाराला साथ देत आला आहे, व त्याचप्रमाणें 'ख्रिश्चन समाजसत्तावाद' सरंजामदारी समाजसत्तावादाला साथ देत आला आहे.

ख्रिश्चन संन्यस्तवृत्तीला समाजसत्तावादी रंग देण्याइतकी सोपी गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं. खासगी मालकी, विवाहसंस्था, राज्यसत्ता, यांच्याविरुद्ध ख्रिस्ती धर्मानें जळजळीत टीका केली आहेच ना? त्यांच्याऐवजीं दयाधर्म आणि दारिद्र्य, ब्रह्मचर्य आणि देहदंड, मठवासी जीवन आणि चर्च-मातेची सेवा, ह्यांचा उपदेश त्यानें केला नाहीं का? पाद्री ज्याप्रमाणें 'तीर्थ' शिंपडून अपवित्र वस्तु पवित्र करतो; त्याचप्रमाणें ख्रिश्चन समाजसत्तावाद हा उमरावांच्या पोटांतील मत्सराला पवित्र भावना बनविण्याचा त्यांचा उपाय असतो.

---

* हें विशेषतः जर्मनीला लागू पडतें. जर्मनींतील जमीनदार व युंकेरवर्ग आपल्या जमिनीचा बराच भाग कुळांकडून लागवडीला आणतात व शिवाय ते बीटरूटची साखर व बटाट्याची दारू बनविण्याचा धंदाहि मोठ्या प्रमाणावर करतात. ब्रिटनमधील श्रीमंत उमराव अजून इतक्या थराला गेले नाहींत; पण बनावट कंपन्या स्थापन करणाऱ्या लफंग्या लोकांना आपल्या नांवाचा उपयोग करूं द्यावा व खंडाचें उत्पन्न कमी होऊं लागल्यामुळें होणाऱ्या नुकसानाची भरपाई अशा रीतीनें करावी, एवढें मात्र त्यांना चांगलें समजतें. (एंगल्स : १८८८ च्या इंग्लिश आवृत्तींतील टीप.)

## ( आ ) मध्यमवर्गीय समाजसत्तावाद

भांडवलदारवर्गानें केवळ सरंजामदारी उमराववर्गाचाच सत्यानाश केला असें नव्हे, आधुनिक भांडवलदारी समाजाच्या वातावरणांत केवळ त्या वर्गाच्याच जीवनाला आवश्यक असलेल्या गोष्टी लयास गेल्या असें नव्हे. आधुनिक भांडवलदारवर्ग अस्तित्वांत येण्यापूर्वी मध्ययुगीन नागरिक व छोटे शेतमालक अस्तित्वांत होते. उद्योगधंदे व व्यापार या बाबतींत ज्या देशांची फारशी प्रगति झालेली नाहीं अशा देशांत हे दोन वर्ग अजूनसुद्धां उदयोन्मुख भांडवलदार वर्गाच्या जोडीला कसेबसे जीव धरून असलेले दिसतात.

जेथें आधुनिक संस्कृतीचा पूर्ण विकास झाला आहे अशा देशांत एक नवा मध्यमवर्ग अस्तित्वांत आला आहे. हा वर्ग कामगारवर्ग व भांडवलदारवर्ग यांच्या दरम्यान हेलकावे घेत असतो, व त्याचे घटक असलेले जुने लोक जाऊन त्याऐवजीं नवे येण्याची क्रिया सतत चालू असते व अशा रीतीनें भांडवलदारी समाजाचा एक पुरवणीदाखल भाग म्हणून तो अस्तित्वांत राहतो. तथापि चढाओढीच्या परिणामामुळें या वर्गांतील लोक व्यक्तिशः कामगारवर्गांत ढकलले जातात, आणि जसजसा आधुनिक उद्योगधंद्यांचा विकास होतो तसतसें या वर्गाला दिसून येतें कीं आधुनिक समाजाचा एक स्वतंत्र विभाग या नात्यानें आपलें अस्तित्व पूर्णपणें नष्ट होण्याचा क्षण जवळ येऊन ठेपला आहे, व कारखाने, शेती, व व्यापार, या क्षेत्रांत आपणांऐवजीं पगारी मुकादम नेमण्यांत येतील.

जेथें शेतकऱ्यांचें प्रमाण एकूण लोकसंख्येच्या निम्याहून किती तरी जास्त आहे अशा फ्रान्ससारख्या देशांत, भांडवलदारवर्गाविरुद्ध कामगारवर्गाची बाजू उचलून धरणाऱ्या लेखकांनीं भांडवलदारी राजवटीविरुद्ध टीका करतांना शेतकऱ्याचा व मध्यमवर्गीय माणसाचा दृष्टिकोन स्वीकारावा, व ह्या मधल्या वर्गांच्या भूमिकेवरून कामगारवर्गासाठीं लढावें, हें स्वाभाविकच होतें. अशा रीतीनें मध्यमवर्गीय समाजसत्तावाद उदयास आला. केवळ फ्रान्समध्येंच नव्हे, तर इंग्लंडमध्यें सुद्धां सिस्मंडी हा ह्या पंथाचा अध्वर्यु होता.

समाजसत्तावादाच्या ह्या पंथानें आधुनिक उत्पादनाच्या परिस्थितींतील अंतर्विरोधांची अगदीं बारकाईनें छाननी केली. अर्थशास्त्रज्ञांच्या ढोंगी युक्ति-

वादाचा त्यानें दंभस्फोट केला. यंत्रें व श्रमविभाग यांचे घातुक परिणाम–मूठभर लोकांच्या हातीं भांडवलाचें व जमिनीचें केन्द्रीकरण, अत्युत्पादन व आर्थिक अरिष्टें–त्यानें निर्विवादपणें सिद्ध केले; मध्यमवर्ग व शेतकरीवर्ग ह्यांचा सत्यानाश होण्याची अपरिहार्यता, कामगारवर्गाची दुर्दशा, उत्पादनांतील बेबंदशाही, संपत्तीच्या वाटणींतील भयंकर विषमता, औद्योगिक क्षेत्रांत राष्ट्राराष्ट्रांमध्यें चालणारें विध्वंसक युद्ध, जुन्या नीतिबंधनांचा, जुन्या कौटुंबिक संबंधांचा, जुन्या राष्ट्रांचा विलय, ह्या गोष्टी त्यानें निदर्शनास आणल्या.

तथापि या प्रकारच्या समाजसत्तावादाचे प्रत्यक्ष उद्देश पाहिले तर असें दिसून येतें कीं एकतर उत्पादनाचीं व विनिमयाचीं जुनीं साधनें पुनः चालू करावीं व त्याबरोबर मालकी-हक्काच्या बाबतींतले जुने परस्पर संबंध व जुनी समाजव्यवस्था यांचाहि पुनरुद्धार करावा, नाहींतर मालकी-हक्काच्या बाबतींतील जुन्या परस्परसंबंधांची चौकट ज्यांनीं स्वाभाविकपणेंच फोडली आहे अशा उत्पादनाच्या व विनिमयाच्या आधुनिक साधनांना पुनः त्याच चौकटींत कोंबावें, अशीच त्याची आकांक्षा असते. या दोन्ही बाबतींत तो प्रतिगामी असतो व मनोराज्यवादी सुद्धां असतो.

उद्योगधंद्यांसाठीं हुन्नरसंघ काढा, शेतींत शिष्ठशासित समाजांतील परस्परसंबंध पुनः सुरू करा,–ह्याच त्याच्या पोतडींतील शेवटच्या मात्रा असतात.

अखेरीस ऐतिहासिक वस्तुस्थितीच निष्ठुर तडाखे बसल्यामुळें आत्म-वंचनेची नशा पार उतरली, व मग ह्या पंथाचें सारें अवसान मावळून त्यानें आपला अवतार समाप्त केला.

### (इ) जर्मन अथवा 'अस्सल' समाजसत्तावाद

फ्रान्समधील समाजसत्तावादी व कम्युनिस्ट वाङ्मय सत्तारूढ भांडवलदारवर्गाच्या दडपणामुळें जन्मास आलें होतें व तें भांडवलदारी सत्तेविरुद्ध चालू असलेल्या लढ्यांचें प्रतिबिंब होतें, पण त्याचा जर्मनींत

प्रवेश झाला त्यावेळीं जर्मनींतील भांडवलदारवर्गानें सरंजामदारी अनियंत्रित सत्तेविरुद्ध झगडण्यास नुकतीच कोठें सुरवात केली होती.

जर्मनींतील तत्त्ववेत्ते, किंवा तत्त्ववेत्ते होऊं पाहणारे पंडित, व ललित लेखक, यांनीं या फ्रेंच वाङ्मयाचा उत्साहानें स्वीकार केला. पण एक गोष्ट ते विसरले व ती ही कीं हें वाङ्मय जेव्हां फ्रान्समधून जर्मनींत आलें तेव्हां त्याच्याबरोबर फ्रान्समधील सामाजिक परिस्थिति जर्मनींत आली नव्हती. जर्मनीच्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भांत ह्या फ्रेंच वाङ्मयाला तात्कालिक कृतीच्या दृष्टीनें कांहीं महत्त्व उरलें नाहीं, व त्याला केवळ साहित्यिक महत्त्वच प्राप्त झालें. उदाहरणार्थ अठराव्या शतकांतील जर्मन तत्त्ववेत्त्यांना पहिल्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या मागण्या म्हणजे सर्वसाधारण 'व्यावहारिक बुद्धी' च्या मागण्याच वाटत असत, व क्रांतिकारक फ्रेंच भांडवलदारवर्गाची इच्छा व्यक्त करणाऱ्या उद्‌गारांना ते 'शुद्ध इच्छाशक्तीचे नियम', 'अपरिहार्य इच्छाशक्तीचे नियम', 'खऱ्याखुऱ्या सर्वसाधारण मानवी इच्छाशक्तीचे नियम', या दृष्टीनें महत्त्व देत असत.

जर्मन साहित्यिकांनीं फक्त एकच कामगिरी केली व ती म्हणजे स्वतःच्या प्राचीन तत्त्वज्ञानावरील निष्ठेशीं त्यांनीं या नव्या फ्रेंच कल्पनेचा मेळ बसविला, — किंवा जास्त बरोबर शब्दांत सांगावयाचें तर तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतील स्वतःचा दृष्टिकोन सोडून न देतांच त्यांनीं फ्रेंच कल्पना आत्मसात् केल्या.

परकीय भाषा जशी भाषांतरद्वारें आत्मसात् करण्यांत येते, त्याचप्रमाणें या फ्रेंच कल्पना त्यांनीं भाषांतरद्वारेंच आत्मसात् केल्या.

प्राचीन ख्रिस्तपूर्वकालीन अभिजात वाङ्मयाच्या हस्तलिखित प्रतींच्या वर ख्रिस्ती महंतांनीं कॅथॉलिक साधूंचीं खुळचट चरित्रें लिहून ठेवलीं हें सुप्रसिद्धच आहे. जर्मन साहित्यिकांनीं फ्रान्सच्या भौतिक वाङ्मयाच्या बाबतींत हाच प्रकार उलटचा रीतीनें केला. त्यांनीं मूल फ्रेंच ग्रंथांच्या खालीं स्वतःच्या तत्वज्ञानाचें अर्थशून्य भारूड लिहून ठेवलें. उदाहरणार्थ 'पैसा' याचीं आर्थिक कार्यें कोणतीं यावर फ्रेंच लेखकांनीं केलेल्या टीकेखालीं त्यांनीं 'मानवतेचें उपहरण' अशी टीप जोडली, भांडवलदारी राज्यसत्तेविरुद्ध फ्रेंच लेखकांनीं केलेल्या टीकेखालीं त्यांनीं 'सर्वसाधारणत्वाचें उच्चाटन' असा शेरा मारला, वगैरे वगैरे.

फ्रेंच लेखकांनीं केलेल्या ऐतिहासिक टीकेला त्यांनीं ह्या तत्त्वज्ञानात्मक शब्दावडंबराचें शेंपूट जोडून त्यालाच 'कृतीचें तत्त्वज्ञान', 'अस्सल समाजसत्तावाद' 'समाजसत्तावादाचें जर्मन शास्त्र,' "समाजसत्तावादाचा तत्त्वज्ञानात्मक पाया', वगैरे झोंकदार नांवें दिलीं.

फ्रेंच समाजसत्तावादी व कम्युनिस्ट वाङ्मय अशा रीतीनें पूर्णपणें नि:सत्व बनविण्यांत आलें. तें वाङ्मय एका वर्गानें दुसऱ्या वर्गाविरुद्ध चालविलेल्या लढ्याचें प्रतिबिंब होतें, पण त्याच्यावरून जर्मनांचा हात फिरतांच त्याचें हें स्वरूप नाहींसें झालें, व मग त्या जर्मनांनीं स्वत:ची अशी कल्पना करून घेतली कीं 'फ्रेंचांचा एकांगीपणा' आपण काढून टाकला आहे, वास्तविकदृष्टया कशाची गरज आहे तें सांगण्याच्या भरीस न पडतां 'सत्य' प्रस्थापित करण्यासाठीं काय आवश्यक आहे तेंच आपण मांडलें आहे, कामगारवर्गाच्या हिताचा पुरस्कार करण्याऐवजीं आपण मानवतेच्या हिताचा – सर्वसाधारण मानव प्राण्याच्या हिताचा – पुरस्कार करीत आहोंत. अर्थात् हा 'सर्वसाधारण मानव' कोणत्याहि वर्गाचा नसतो, त्याला खरेंखुरें अस्तित्व नसतें, तत्त्ववेत्त्यांच्या कल्पना-विलासाच्या दाट धुक्यांतच त्याचें वास्तव्य असतें.

'जर्मन समाजसत्तावादी' पंथानें हातीं घेतलेलें हें कार्य अगदीं पोरकटपणाचें होतें, पण त्याला स्वत:ला मात्र तें अगदीं गंभीरपणाचें वाटत होतें. एखाद्या वैदू फेरीवाल्याच्या थाटांत ते आपल्या ह्या दरिद्री मालाची स्तुति करीत असत. पण ह्या पंथाचा पांडित्यप्रचुर भाबडेपणा हळूहळू मावळूं लागला.

सरंजामदारी उमराववर्गाविरुद्ध आणि अनियंत्रित राजेशाहीविरुद्ध जर्मन भांडवलदारांनीं, विशेषत: प्रुशियन भांडवलदारांनी, चालविलेल्या लढ्याला – म्हणजेच उदारमतवादी चळवळीला – जास्त जोर आला.

त्यामुळें 'अस्सल समाजसत्तावाद' मांडणाऱ्या लोकांना समाजसत्तावादी मागण्यांचा पुरस्कार करून राजकीय चळवळीशीं सामना करण्याची, उदारमतवाद, प्रातिनिधिक राज्यपद्धति, भांडवलदारी चढाओढ, भांडवलदारी मुद्रण-स्वातंत्र्य, भांडवलदारी कायदेकानू, भांडवलदारी स्वातंत्र्य व समता, यांवर जुन्यापुराण्या शिव्याशापांचा वर्षाव करण्याची, ह्या भांडवलदारी

चळवळीनें तुम्हांला कांहींसुद्धां मिळणार नसून उलट सगळें गमावून बसावें लागणार आहे असा बहुजनसमाजांत प्रचार करण्याची, नामी संधी मिळाली. ह्या संधीची ते फार दिवसांपासून वाटच पाहात होते. हा 'जर्मन समाजसत्तावाद' फ्रेंच टीका-वाङ्मयाचाच निर्बुद्ध अनुवाद होता, पण त्याला ऐनवेळीं एका गोष्टीचा विसर पडला व ती ही कीं फ्रेंचाची टीका त्यावेळीं अस्तित्वांत येऊन चुकलेल्या आधुनिक भांडवलदारी समाजाविरुद्ध, त्याच्या आर्थिक जीवन-परिस्थितीविरुद्ध, व त्याला अनुरूप असलेल्या राज्यघटनेविरुद्ध होती, व या सर्व गोष्टी जर्मनींत अजून अस्तित्वांत यावयाच्या होत्या, त्या अस्तित्वांत आणणें हेंच जर्मनींतील उदयोन्मुख लढ्याचें उद्दिष्ट होतें.

अनियंत्रित सरकारें व त्यांना पाठिंबा देणारे पाद्री, प्रोफेसर, जमीनदार व अंमलदार, यांना भांडवलदारांच्या संकटाविरुद्ध जनतेला घाबरवून सोडण्यासाठीं एक बुजगावणें म्हणून ह्या पंथाचा चांगलाच उपयोग झाला.

हींच सरकारें ह्याच वेळीं जर्मन कामगार-वर्गाचे उठाव चिरडून टाकण्यासाठीं चाबकाच्या फटक्यांचा व बंदुकीच्या गोळ्यांचा खुराक चारीत होतीं, आणि ह्या कडू औषधानंतर 'अस्सल' समाजसत्तावादाचें गोड चाटण देणें अर्थात् फार सोईचें होतें.

हा 'अस्सल' समाजसत्तावाद जर्मन भांडवलदारवर्गाविरुद्ध लढण्याचें एक हत्यार म्हणून अशा रीतीनें सरकारांच्या उपयोगीं पडलाच, पण शिवाय तो एका प्रतिगामी वर्गाच्या हिताचा प्रत्यक्षही पुरस्कार करीत होता. हा वर्ग म्हणजे जर्मनींतील संकुचित वृत्तीचा मध्यमवर्ग. जर्मनीमध्यें हा मध्यमवर्गच विद्यमान परिस्थितीचा खरा सामाजिक पाया आहे. हा वर्ग सोळाव्या शतकाचा अवशेष आहे, व तेव्हांपासून तो निरनिराळ्या स्वरूपांत पुनः पुनः सतत डोकें वर काढीत असतो.

हा वर्ग कायम ठेवणें म्हणजे जर्मनींतील विद्यमान परिस्थिति कायम ठेवणेंच होय. भांडवलदार वर्गाच्या औद्योगिक व राजकीय वर्चस्वामुळें—एकीकडे भांडवलाचें केंद्रीकरण होऊन, व दुसरीकडे क्रांतिकारक कामगारवर्ग उदयास येऊन—हा मध्यमवर्ग रसातळास जाणार हें निश्चित आहे. एका

घोंड्यानें दोन पक्षी मारावे त्याप्रमाणें 'अस्सल' समाजसत्तावादाच्या योगें भांडवलशाहीच्या या दोन्ही परिणामांना आळा घालतां येईल, असें वाटत होतें. म्हणून हा पंथ सांथीसारखा पसरला.

जर्मन समाजसत्तावाद्यांची शाश्वत सत्यें म्हणजे निर्जीव हाडांचा सांपळाच होता. पण त्यांनीं या अस्थिपंजरावर तर्कवितर्कांच्या कोळिष्टकांची शाल पांघरली, तिच्यावर अलंकारिक भाषेची वेलबुट्टी काढली व निःसत्त्व भावनाविलासाचें अत्तर शिंपडलें, व अशा रीतीनें सजविलेल्या या मालाचा असल्या वर्गांत चांगलाच खप झाला.

मध्यमवर्गाच्या संकुचित दृष्टिकोनाचा अगडबंब भाषेंत पुरस्कार करणें हेंच आपलें खास कार्य आहे, ही गोष्ट हा जर्मन समाजसत्तावादी पंथ सुद्धां जास्त जास्त मान्य करूं लागला.

त्यानें जाहिर केलें कीं जर्मन राष्ट्र हेंच आदर्श राष्ट्र आहे व जर्मन मध्यमवर्गीय गृहस्थ हाच आदर्श मानव आहे. ह्या आदर्श मानवाच्या प्रत्येक दुष्ट क्षुद्रपणाला त्यानें कांहीं तरी गहन, उच्च, समाजसत्तावादी अर्थ चिटकविला, व दुर्गुणांनाच सद्गुण ठरविलें. कम्युनिझम ही 'पाशवी स्वरूपाचा विध्वंस करणारी' प्रवृत्ति आहे असा आरोप करून या प्रवृत्तीला प्रत्यक्ष विरोध करण्यापर्यंत व सर्व प्रकारच्या वर्गलढ्यांविषयीं आपणाला सारखाच व संपूर्ण तिटकारा वाटतो असें जाहिर करण्यापर्यंत, त्यानें मजल गांठली. फारच थोडे अपवाद सोडल्यास आज (१८४७ सालीं) जर्मनींत समाजसत्तावादी व कम्युनिस्ट या नांवाखालीं खपणारीं सर्व पुस्तकें लोकांना निःसत्त्व बनविणाऱ्या ह्या गलिच्छ वाङ्मयांतच मोडतात.*

---

*१८४८ च्या क्रांतीच्या तुफानांत या गलिच्छ प्रवृत्तीचा संपूर्ण धुव्वा उडाला, व समाजसत्तावादाच्या क्षेत्रांत लुडबुड करण्याची तिच्या पुरस्कर्त्यांची हौस पार मावळून गेली. या प्रवृत्तीचा मुख्य प्रतिनिधि व नमुना कार्ल ग्रून हा होता.
(एंगल्स: १८९० च्या जर्मन आवृत्तींतील टीप).

## (२) पुराणवादी अथवा भांडवलदारी समाजसत्तावाद

भांडवलदारवर्गापैकीं कांहींजण भांडवलदारी समाजाचें अस्तित्व टिकवून धरण्यासाठीं सामाजिक गाऱ्हाणीं दूर करूं इच्छितात.

या विभागांत अर्थशास्त्रज्ञ, भूतदयावादी, मानवतावादी, कामगारवर्गाची स्थिति सुधारणारे, दानधर्माची संघटना करणारे, जनावरांना निर्दयपणें वागविण्याला प्रतिबंध करण्यासाठीं काढलेल्या संस्थांचे सभासद, दारूबंदीचा हिरीरीनें प्रचार करणारे, या लोकांचा आणि येन केन प्रकारेण सुधारणा करूं पाहणाऱ्या हरतऱ्हेच्या माणसांचा समावेश होतो. शिवाय या प्रकारच्या समाजसत्तावादाला पद्धतशीर तत्त्वप्रणालीचें स्वरूप देण्याचीहि खटपट करण्यांत आली आहे.

या प्रकारच्या समाजसत्तावादाचें उदाहरण म्हणून प्रूधाँ याच्या 'तत्वज्ञानाचें दारिद्र्य या ग्रंथाचा उल्लेख करतां येईल.

समाजसत्तावादी भांडवलदारांना आधुनिक सामाजिक परिस्थितीचे सगळे फायदे हवे असतात, पण तिच्यांतून अपरिहार्यपणें निर्माण होणारे लढे व धोके मात्र नको असतात. त्यांना समाजाची सध्यांची स्थिति हवी असते, मात्र त्यांच्यांतलीं क्रांतिकारक व विध्वंसक बीजें काढून टाकलीं पाहिजेत असें त्यांना वाटतें. त्यांना भांडवलदारवर्ग हवा असतो. पण कामगारवर्ग मात्र नको असतो. भांडवलदारवर्गाला स्वाभाविकपणेंच वाटतें कीं ज्या दुनियेंत आपलें वर्चस्व असतें तीच दुनिया सर्वोत्कृष्ट होय, आणि भांडवलदारी समाजसत्तावाद याच सोइस्कर कल्पनेला कमीअधिक परिपूर्ण अशा निरनिराळ्या तत्त्वप्रणालींचें रूप देतो. कामगारवर्गानें अशा प्रकारची तत्त्वप्रणाली अमलांत आणली पाहिजे, व तसें केल्यास त्याला पृथ्वीवरच स्वर्गाचें राज्य भोगावयास मिळेल, असें हा भांडवलदारी समाजसत्तावाद जेव्हां आग्रहानें सांगतो, तेव्हां त्याचा खरा अर्थ एवढाच असतो कीं कामगारवर्गानें विद्यमान समाजपद्धतींच्या चौकटींतच राहावें, मात्र

भांडवलदारवर्गाविषयीं त्याच्या मनांत असलेल्या सर्व दुष्ट कल्पना त्यानें टाकून द्याव्यात.

या भांडवलदारी समाजसत्तावादाचा आणखी एक प्रकार आहे. तो तितकासा पद्धतशीर नसला तरी जास्त व्यावहारिक आहे. प्रत्येक क्रांतिकारक चळवळीच्या बाबतींत तो कामगारवर्गाला असें भासवितो कीं असल्या चळवळीचा फारसा उपयोग नाहीं. त्यासाठीं तो असें दाखवून देतों कीं केवळ राजकीय सुधारणेनें नव्हे, तर भौतिक जीवन-परिस्थिति बदलल्यानेंच, आर्थिक परस्पर-संबंध बदलल्यानेंच, कामगारवर्गाचा कांहीं फायदा होऊं शकेल. परंतु भौतिक जीवन-परिस्थिति बदलणें याचा अर्थ भांडवलदारी उत्पादन-संबंध नाहींसें करणें असें हा समाजसत्तावाद मुळींच समजत नाहीं. कारण भांडवलदारी उत्पादन-संबंध फक्त क्रांतीच्या मार्गानेंच नाहींसे करतां येतात. भौतिक जीवन-परिस्थिति बदलणें याचा अर्थ तो एवढाच करतो कीं हे भांडवलदारी उत्पादन-संबंध तसेंच कायम ठेवून राज्यकारभाराच्या बाबतींत कांहीं सुधारणा कराव्या, या सुधारणांमुळें भांडवलदार व कामगार यांच्या परस्पर-संबंधांत मुळींच बदल होणार नाहीं, फार तर भांडवलदारी राज्यकारभाराचा खर्च कमी होईल व त्याचें काम जास्त सोपें होईल.

भांडवलदारी समाजसत्तावाद जेव्हां केवळ एक शब्दालंकार बनतो, तेव्हांच त्याचें खरें स्वरूप पूर्णपणें व्यक्त होतें.

व्यापार-स्वातंत्र्य – कशासाठीं? तर कामगारवर्गाच्या हितासाठीं! संरक्षक जकाती – कशासाठीं, तर कामगारवर्गाच्या फायद्यासाठीं! तुरुंगाची सुधारणा – कशासाठीं, तर कामगारवर्गाचें भलें करण्यासाठीं! भांडवलदारी समाजसत्तावादाची अंतिम घोषणा हीच असते व तिच्याबद्दलच त्याला खरा उत्साह असतो.

भांडवलदारी समाजसत्तावादाचें सार एका वाक्यांत सांगतां येइल व तें म्हणजें: "भांडवलदार भांडवलदार बनला आहे; कशासाठीं? तर कामगारवर्गाच्या कल्याणासाठींच!"

# (३) टीकात्मक व मनोराज्यमय समाजसत्तावाद आणि कम्युनिझम

आधुनिक काळांतील प्रत्येक महान् क्रांतींत कामगारवर्गाच्या मागण्यांना सदैव वाचा फोडणारे वाङ्मय अस्तित्वांत आलें आहे, उदाहरणार्थ बबूफ वगैरेंचे लेख. पण आम्ही येथें त्या वाङ्मयाची चर्चा करीत नाहीं.

सार्वत्रिक खळबळीच्या काळांत, सरंजामदारी समाजाचें उच्चाटन होत असतांना, कामगारवर्गानें स्वतःचे खास उद्देश सिद्धिस नेण्यासाठीं जे पहिले सरळसरळ प्रयत्न केले, ते स्वाभाविकपणेंच अयशस्वी झाले, कारण त्यावेळीं कामगारवर्गाचा पुरेसा विकास झाला नव्हता, व त्याच्या दास्यविमोचनासाठीं आवश्यक असलेली आर्थिक परिस्थिति अस्तित्वांत नव्हती. ही परिस्थिति अजून निर्माण व्हावयाची होती, व आगामी भांडवलदारी युगांतच ती निर्माण होणें शक्य होतें. कामगारवर्गाच्या या पहिल्या चळवळींच्या जोडीला जें क्रांतिकारक वाङ्मय प्रसिद्ध झालें त्याला स्वाभाविकपणेंच एक प्रतिगामी स्वरूप प्राप्त झालें होतें. सर्वांनीं संन्यस्तवृत्तीनें राहावें असा उपदेश या वाङ्मयांत करण्यांत येत असे, व समाजांत सर्वजण सारख्या पातळीवर आले पाहिजेत असा प्रकार अत्यंत ओबडधोबड स्वरूपांत करण्यांत येत असे.

समाजसत्तावादी व कम्युनिस्ट हीं नांवें ज्यांना देणें खरोखरीं योग्य होईल अशा तत्वप्रणाली – म्हणजे सेंट सायमन, फूरिए, ओवेन, इत्यादींच्या तत्वप्रणाली – ज्या काळांत कामगारवर्ग व भांडवलदारवर्ग यांच्यामधील लढा आरंभींच्या अपरिपक्व अवस्थेंत होता अशा काळांत उदयास आल्या. (त्या काळाचें वर्णन वर 'विभाग १ : भांडवलदार व कामगार' यांत दिलें आहे.)

ह्या तत्वप्रणालींच्या संस्थापकांना वर्गविरोध स्पष्ट दिसतात, तसेंच प्रचलित समाज-पद्धतींतील मरणोन्मुख घटकांची क्रियाहि त्यांना दिसते, हें खरें. कामगारवर्ग इतिहासाच्या चळवळींत कोणचाही भाग घेत असलेला, त्याची कोणतीही स्वतंत्र राजकीय चळवळ असल्याचे, त्यांना दिसत नाहीं.

वर्गविरोधांचा विकास उद्योगधंद्यांच्या विकासाच्या बरोबरीनेंच होत असतो, व म्हणून त्यांच्या डोळ्यापुढें असलेल्या आर्थिक परिस्थितींत त्यांना कामगारवर्गाच्या दास्यविमोचनासाठीं आवश्यक असलेली भौतिक परिस्थिति आढळत नाहीं. म्हणून ही परिस्थिति निर्माण करण्यास समर्थ असें नवें समाजशास्त्र, नवे सामाजिक नियम, शोधून काढण्याचा ते प्रयत्न करतात.

ऐतिहासिक घडामोडींऐवजीं स्वतःच्या वैयक्तिक शोधकतेलाच ते महत्त्व देतात; दास्यविमोचनासाठीं आवश्यक असलेली परिस्थिति इतिहासक्रमानें निर्माण होण्याची वाट पाहण्याऐवजीं स्वतःच्या डोक्यांतूनच ती निर्माण करण्याचा ते प्रयत्न करतात; कामगारवर्गाची वर्ग-संघटना क्रमाक्रमानें व स्वयंस्फूर्तीनें अस्तित्वांत येण्याऐवजीं या संशोधकांनीं तयार केलेल्या खास योजनांस अनुसरून सबंध समाजाची संघटना करणेंच त्यांना पसंत असतें. त्यांच्या सामाजिक योजनांचा प्रचार करणें व त्या अमलांत आणणें म्हणजेच भावी इतिहास घडविणें होय, असें त्यांना वाटतें.

आपल्या योजना तयार करतांना त्यांना अशी जाणीव असतें कीं कामगारवर्ग हा सर्वांत जास्त हालअपेष्टा भोगणारा वर्ग आहे व म्हणून मुख्यतः त्याच्या हिताचीच काळजी वाहिली पाहिजे. 'सर्वांत जास्त हालअपेष्टा भोगणारा वर्ग' एवढ्याच स्वरूपांत कामगारवर्ग त्यांच्या नजरेस पडतो.

त्यावेळीं वर्गलढ्याचा फारसा विकास झालेला नसल्यामुळें तसेंच जीवनांतील त्यांच्या स्वतःच्या परिस्थितीमुळें, त्यांचा असा समज होतो कीं आपण स्वतः सर्व प्रकारच्या वर्गविरोधापासून पूर्णपणें अलिप्त आहोंत. ते समाजांतील प्रत्येक व्यक्तीची – अत्यंत संपन्न लोकांचीसुद्धां – स्थिति सुधारूं इच्छितात. म्हणून वर्गभेद लक्ष्यांत न घेतां सबंध समाजाला उद्देशून प्रचार करावयाचा – किंबहुना राज्यकर्त्या वर्गाला उद्देशून विशेष प्रचार करावयाचा – असा त्यांचा परिपाठ असतो. "लोकांना आमची तत्त्वप्रणाली जर कां समजली, तर सर्वोत्कृष्ट योजना हीच आहे हें त्यांना दिसून आल्यावांचून कसें राहील?" असें त्यांचें म्हणणें असतें.

म्हणून ते सर्व राजकीय चळवळ, व विशेषतः सर्व क्रांतिकारक चळवळ त्याज्य समजतात; ते आपले उद्देश शांततेच्या मार्गानेंच तडीस नेऊं इच्छितात, व आपल्या नव्या सामाजिक शुभवर्तमानाचा स्वीकार

करण्यास लोकांचीं मनें तयार व्हावीं म्हणून ते लहान प्रमाणावर प्रयोग करून दाखवतात व उदाहरण घालून देतात. अर्थात् हे प्रयोग अयशस्वी व्हावयाचें हें ठरलेलेंच असतें.

त्यावेळीं कामगारवर्गाचा फारसा विकास झालेला नसतो व स्वतःच्या स्थानाविषयीं त्याची कल्पना अगदीं अवास्तव असते, व अशा वेळीं रंगविण्यांत आलेलीं हीं भावी समाजाचीं कल्पनामय चित्रें समाजाची सर्वसाधारण पुनर्रचना करण्याची कामगारवर्गाच्या मनांत सहजप्रेरणेनेंच जी आतुरता उत्पन्न होऊं लागलेली असते तिला अनुरूपच असतात.

पण या समाजसत्तावादी व कम्युनिस्ट वाङ्मयांत एक टीकात्मक भागहि असतो. विद्यमान समाजाच्या प्रत्येक तत्त्वावर त्यांत हल्ला केलेला असतो. म्हणून कामगारवर्गाला जागृत करण्यासाठीं त्यांत अत्यंत मौल्यवान सामुग्री असते. या वाङ्मयांत पुढील प्रत्यक्ष उपाय सुचविलेले असतात: शहरें व खेडीं यांमधील भेद नष्ट करणें; कुटुंबसंस्था, उद्योगधंद्यांवरची खाजगी मालकी व मोल-मजुरीची प्रथा, नष्ट करणें; समाजांत एकोपा निर्माण करणें; राज्यसंस्थेचें कार्य उत्पादनावर देखरेख ठेवण्यापुरतेंच मर्यादित करणें. अर्थात् हे उपाय अंमलांत आणावयाचे म्हणजे वर्गविरोध नष्ट झाला पाहिजे, त्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. परंतु त्या काळांत वर्गविरोध नुकताच कोठें डोकें वर काढूं लागला होता. व गर्भाच्या प्राथमिक आकारशून्य अवस्थेपेक्षां जास्त स्पष्ट दर्शन या लेखकांना वर्गविरोधाचें झालेले नव्हते. म्हणून त्यांत सुचविलेले हे उपाय केवळ मनोराज्याच्या स्वरूपाचेच असतात.

इतिहासाचा जसजसा विकास होतो तसतसें या टीकात्मक व मनोराज्यमय समाजसत्तावादाचें व कम्युनिझमचें महत्त्व कमी होतें. आधुनिक वर्गलढ्याचा जसजसा विकास होतो व त्याला निश्चित आकार येतो, तसतशी ही खोट्या कल्पनेवर आधारलेली, लढ्यापासून अलिप्त राहण्याची व लढ्यावर टीका करण्याची वृत्ति व्यावहारिक दृष्ट्या अगदीं निरुपयोगी व तात्त्विकदृष्ट्या पूर्णपणें असमर्थनीय ठरते. म्हणून या तत्त्वप्रणालींचे उत्पादक जरी अनेक बाबतींत क्रांतिकारक होते, तरी त्यांच्या सर्व शिष्यांनीं मात्र केवळ प्रतिगामी स्वरूपाचेच पंथ स्थापन केले आहेत. ऐतिहासिक दृष्ट्या कामगारवर्गाच्या विकासाची प्रगति होत

असतांना तिला विरोध करून हे शिष्यवर आपल्या गुरूंच्या मूळच्या मतांनाच चिकटून बसतात. म्हणून ते वर्गलढ्याला निर्जीव बनविण्याचा व वर्गविरोध सलोख्यानें मिटविण्याचा सुसंगतपणें प्रयत्न करीत असतात. आपलीं सामाजिक मनोराज्यें प्रयोगरूपानें प्रत्यक्षांत आणण्याची – अलग अलग 'फॅलॅन्स्तेर', 'होम कॉलनीज', 'लिटल आयकेरिया,'* अस्तित्वांत आणण्याची, म्हणजे नव्या नंदनवनाच्या चिमुकल्या आवृत्त्या निर्माण करण्याची – त्यांना अजून आशा वाटते. आणि हीं मनोराज्यें प्रत्यक्षांत आणण्यासाठीं त्यांना भांडवलदारांच्या दयाबुद्धीवर व थैलीवर विसंबून राहावें लागतें. क्रमाक्रमानें त्यांचा अधःपात होत जाऊन ते वर वर्णन केलेल्या प्रतिगामी पुराणप्रिय समाजसत्तावाद्यांच्या पंक्तीला जाऊन बसतात, फरक इतकाच कीं या नव्या पंथाचें पांडित्य-प्रदर्शन जास्त पद्धतशीर असतें व स्वतःच्या समाजशास्त्राच्या अद्‌भुत परिणामांविषयीं त्याला अंधश्रद्धा असते.

म्हणून या पंथाचे लोक कामगारवर्गाच्या प्रत्येक राजकीय चळवळीस जोरानें विरोध करतात. त्यांचें असें म्हणणें असतें कीं आम्हीं सांगितलेल्या शुभवर्तमानाविषयीं ज्यांना आंधळेपणानें अविश्वास वाटतो असे लोकच राजकीय चळवळीस प्रवृत्त होऊं शकतात.

इंग्लंडमध्यें ओवेनचे अनुयायी चार्टिस्ट चळवळीला विरोध करतात, व फ्रान्समध्यें फूरिएचे अनुयायी 'ला रिफॉर्म' गटाला विरोध करतात.[7]

---

*फूरिए याच्या योजनेस अनुसरून स्थापन झालेल्या समाजसत्तावादी वसाहतींना 'फॅलॅन्स्तेर' (उद्योग-मंदिर) असें नांव देण्यांत आलें होतें; कॅबेट यानें आपल्या मनोराज्यमय नंदनवनाला व मागाहून अमेरीकेंत स्थापन केलेल्या कम्युनिस्ट वसाहतीला 'आयकेरिया' असें नांव दिलें होतें.

(एंगल्स : १८८८ च्या इंग्लिश आवृत्तींतील टीप.)

ओवेन यानें आपल्या आदर्श कम्युनिस्ट समाजांना 'होम कॉलनीज' असें नांव दिलें होतें. फूरिये याच्या योजनेस अनुसरून स्थापन होणाऱ्या सार्वजनिक भुवनांचें 'फॅलॅन्स्तेर' हें नांव होतें. कॅबेटनें ज्या कम्युनिस्ट समाजाचें चित्र रेखाटलें होतें, त्या त्याच्या काल्पनिक मनोराज्यमय नंदनवनाला 'आयकेरिया' असें नांव होतें.

(एंगल्स : १८९० च्या जर्मन आवृत्तींतील टीप.)

[४]

# सध्यांच्या निरनिराळ्या सरकारविरोधी पक्षांच्या बाबतींत कम्युनिस्टांची भूमिका

इंग्लंडमधील चार्टिस्ट, अमेरिकेंतील शेतीसुधारणावाले, वगैरे विद्यमान कामगारवर्गीय पक्षांशीं कम्युनिस्टांचे संबंध कोणते आहेत, हें विभाग २ मध्यें स्पष्ट करण्यांत आलें आहे.

कम्युनिस्ट तात्कालिक उद्देश साध्य करण्यासाठीं – कामगारवर्गाच्या तात्पुरत्या हिताच्या गोष्टी अमलांत आणण्यासाठीं – लढतात; पण आजच्या चळवळींत ते त्या चळवळीच्या भवितव्याचेंहि प्रतिनिधित्व करतात व त्याची जोपासना करतात. फ्रान्समध्यें कम्युनिस्ट हे पुराणवादी व जहाल भांडवलदारांविरुद्ध सोशल-डेमोक्रॅट पक्षाशीं * दोस्ती करतात; मात्र महान

---

* ह्या पक्षाचा पार्लमेंटमधील प्रतिनिधि लेद्रू-रोलिन हा होता, वाङ्मयांतील प्रतिनिधि लुई ब्लाँक हा होता व 'ला रिफॉर्म' हें त्याचें दैनिक मुखपत्र होतें. कमी अधिक प्रमाणांत समाजसत्तावाद मान्य करणारा 'डेमोक्रॅटिक' किंवा 'रिपब्लिकन' पक्षाचा एक विभाग हा अर्थंच त्याला हें नांव देणारांना अभिप्रेत होता.

(एंगल्स: १८८८ च्या इंग्लिश आवृत्तींतील टीप.)

फ्रेंच क्रांतीच्या वेळेपासून चालत आलेल्या परंपरागत घोषणांच्या व भ्रामक कल्पनांच्या बाबतींत टीकात्मक भूमिका घेण्याचा आपला हक्क ते राखून ठेवतात.

स्वित्झर्लंडमध्यें ते 'रॅडिकल' पक्षाला पाठिंबा देतात, मात्र ह्या पक्षांत निरनिराळे परस्परविरोधी गट आहेत व कांहींजण (फ्रेंच अर्थानें) लोकसत्तावादी सोशालिस्ट आहेत व कांहींजण केवळ जहाल भांडवलदार आहेत, ही गोष्ट ते नजरेआड होऊं देत नाहींत.

पोलंडमध्यें ते राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं आवश्यक असलेली पहिली गोष्ट म्हणजे शेतीसंबंधांत क्रांति घडवून आणणें हीच आहे असें आग्रहपूर्वक मांडणाऱ्या पक्षालाच — म्हणजे १८४६ सालीं ज्यानें क्रॅकौच्या बंडाची आग पेटवली त्या पक्षाला — पाठिंबा देतात.

जर्मनीमध्यें ते जेव्हां जेव्हां भांडवलदारवर्ग क्रांतिकारक मार्गानें लढतो तेव्हां तेव्हां त्याला पाठिंबा देऊन अनियंत्रित राजेशाहीविरुद्ध, सरंजामदारी जमीनदारवर्गाविरुद्ध व प्रतिक्रांतिकारी मध्यम वर्गाविरुद्ध लढा करतात.

पण भांडवलदारवर्ग व कामगारवर्ग यांच्यांत शत्रुत्वाच्या स्वरूपाचा परस्पर-विरोध असतो, या गोष्टीची कामगारवर्गाला शक्य तितकी स्पष्ट जाणीव करून देण्याचें कार्य ते क्षणभरहि बाजूला सारीत नाहींत; हेतु असा कीं भांडवलदारवर्गाचें वर्चस्व स्थापन होतांच तो जी सामाजिक व राजकीय परिस्थिति अपरिहार्यपणें अस्तित्वांत आणील तिचाच भांडवलदारवर्गाविरुद्ध लढ्याचें हत्यार म्हणून ताबडतोब उपयोग करणें कामगारवर्गाला शक्य व्हावें व जर्मनींतील प्रतिगामी वर्गांच्या पाडावानंतर भांडवलशाहीविरोधी लढयाची ताबडतोब सुरवात व्हावी.

---

स्वत:ला 'सोशल-डेमोक्रॅटिक' (लोकशाही-समाजवादी) म्हणविणाऱ्या फ्रान्समधील पक्षाचे प्रतिनिधि म्हणून राजकीय जीवनांत-लेद्रू रोलिन व साहित्यांत लुई ब्लाँ यां कडें बोट दाखवितां येईल. यावरूनच दिसेल कीं या पक्षांत व आजकालच्या जर्मन सोशल-डेमोक्रॅटिक पक्षांत जमीन-अस्मानाचे अंतर आहे.

(एंगल्स: १८९० च्या जर्मन आवृत्तींतील टीप.)

कम्युनिस्ट मुख्यतः जर्मनीकडे लक्ष्य देतात, त्याचें एक कारण म्हणजे त्या देशांत भांडवलदारी क्रांति घडून येण्याची वेळ नजीक येऊन ठेपली आहे, व इंग्लंडमधील १७व्या शतकांतील भांडवलदारी क्रांति व फ्रान्समधील १८व्या शतकांतील भांडवलदारी क्रांति ह्या क्रांत्यांच्या वेळीं कामगारवर्गाचा जेवढा विकास झाला होता त्यापेक्षां जर्मनींतील या आगामी भांडवलदारी क्रांतींत कामगारवर्ग अधिक विकास पावलेला असेल व युरोपियन संस्कृतीची अधिक प्रगति झालेली असेल. दुसरें कारण म्हणजे जर्मनींतील भांडवलदारी क्रांति तिच्यामागोमाग ताबडतोब घडून येणाऱ्या कामगार-क्रांतीची नांदीच ठरणार आहे.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सध्यांच्या सामाजिक व राजकीय व्यवस्थेविरुद्ध चाललेल्या प्रत्येक क्रांतिकारक चळवळीला कम्युनिस्ट सर्वत्र पाठिंबा देतात.

ह्या प्रत्येक चळवळींत कम्युनिस्ट दाखवून देतात कीं मालकी हक्काचा प्रश्न हाच या चळवळीचा मुख्य प्रश्न आहे, व ते हा प्रश्न प्रामुख्यानें पुढें आणतात, मग त्या वेळीं त्या प्रश्नाला विकासक्रमानें कोणतेंहि स्वरूप आलेलें असो.

शेवटचा मुद्दा म्हणजे, सर्व निरनिराळ्या देशांतील लोकसत्तावादी पक्षांचें ऐक्य व सहकार्य घडवून आणण्यासाठीं ते सर्वत्र परिश्रम करतात.

आपलीं मतें व ध्येयें लपविणें कम्युनिस्टांना अगदीं तुच्छपणाचें वाटतें. ते उघडपणें जाहिर करतात कीं आमचे उद्देश सध्यांच्या समग्र सामाजिक परिस्थितीचें जबरदस्तीनें उच्चाटन करूनच साध्य करतां येतील. कम्युनिस्ट क्रांतीच्या भीतीनें सत्ताधारी वर्गाचा थरकांप उडूं दे! कामगारांजवळ त्यांना जखडणाऱ्या बेड्यांखेरीज गमावण्यासारखें कांहींच नाहीं. जिंकण्यासाठीं सारें जग त्यांच्यापुढें आहे.

जगांतील कामगारांनो, एक व्हा!

# टीपा

[1] 'कम्युनिस्ट पार्टीचा जाहिरनामा' म्हणजे शास्त्रशुद्ध साम्यवादाची महान कार्यक्रमपत्रिकाच होय. कॉ. लेनिन म्हणाला, "या लहानशा पुस्तिकेची किंमत मोठ्या ग्रंथभांडाराहून जास्त आहे. सुसंस्कृत जगाचा सगळा सुसंघटित व लढाऊ कामगारवर्ग आजतागायत जाहिरनाम्याच्या संदेशानें भारलेला आहे, त्याच्या आदेशांवर मार्गक्रमण करीत आहे." का. मार्क्स व फ्रे. एंगल्स यांनीं हा 'कम्युनिस्ट संघा'चा कार्यक्रम लिहिला, व पहिल्या प्रथम लंडनमध्यें १८४८ सालच्या फेब्रुआरीमध्यें 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा' या नांवाखाली स्वतंत्र २३ पानीं पुस्तिकेंत हा प्रसिद्ध झाला. लंडनमधील जर्मन निर्वासितांच्या लोकशाही मुखपत्रांत—'डयूश लंदनेर झीटूंग' मध्यें—मार्च ते जुलै, १८४८ मध्यें हा प्रसिद्ध झाला. व या आवृत्तींतील मुद्रणदोष व शुद्धलेखनाच्या चुका सुधारुन त्याच १८४८ सालीं याची स्वतंत्र ३० पानीं जर्मन आवृत्ती लंडनमध्यें प्रसिद्ध झाली. या आवृत्तीचा उपयोग या पुढील अधिकृत आवृत्त्यांकरता मार्क्स व एंगल्स यांनीं केला. १८४८ सालीं जाहिरनाम्याची भाषांतरें फ्रेंच, इटालियन, डॅनिश, डच, पोलीश व स्वीडीश आदि युरोपीयन भाषांत झाली. १८४८ सालच्या आवृत्त्यांमध्यें लेखकांच्या नांवाचा उल्लेख नव्हता. १८५० सालीं चार्टिस्ट पंथाच्या 'रेड रिपब्लिकन' पत्रांत प्रसिद्ध झालेल्या पहिल्या इंग्रजी आवृत्तीच्या प्रस्तावनेंत पत्र-संपादक जॉन गार्नी यानें लेखकांच्या नावांचा उल्लेख केला.

१८७२ सालीं जाहिरनाम्याची नवीन जर्मन आवृत्ती ग्रंथ-कर्त्यांच्या थोडया बहुत दुरुस्त्या व प्रस्तावने–सह प्रसिद्ध झाली. या आवृत्तीचा, तसेंच नंतर प्रसिद्ध झालेल्या १८८३ व १८९० च्या जर्मन आवृत्त्यांचा, मथळा 'कम्युनिस्ट जाहिरनामा' असा होता.

पहिली रशियन आवृत्ती 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा' या नांवाखाली जिनेव्हा मध्यें १८६९ सालीं बकूनिनच्या भाषांतरांत प्रसिद्ध झाली. इच्यांत अनेक ठिकाणी मूळ जाहिरनाम्याचा मजकूर विकृत स्वरूपांत आला होता. पण या विकृती १८८२ सालीं जिनेव्हांत प्रसिद्ध झालेल्या प्लेखनोव्हच्या भाषांतरांत दूर करण्यांत आल्या. या भाषांतरांपासून जाहिरनाम्याच्या तत्वांचा रशियांत विस्तृत प्रसार होण्यास सुरुवात झाली. अशा प्रचाराचे महत्व जाणून मार्क्स व एंगल्सनीं या आवृत्तीला खास प्रस्तावना लिहिली.

मार्क्सच्या मृत्यूनंतर एंगल्सनें तपासलेल्या अशा खालील आवृत्त्या जाहिरनाम्याच्या निघाल्या: १८८३ सालची एंगल्सच्या प्रस्तावनेसह निघालेली जर्मन आवृत्ती; १८८८ सालीं मूरनें केलेले इंग्रजी भाषांतर– (हे एंगल्सनें तपासून त्याला स्वतःची प्रस्तावना व टीपा जोडल्या होत्या); १८९० सालची एंगल्सच्या नवीन प्रस्तावनेसह निघालेली जर्मन आवृत्ती. या शेवटी उल्लेखिल्या आवृत्तीलाही एंगल्सनें कैक टीपा जोडल्या होत्या. मार्क्सची मुलगी लऊरा लफार्ग हिनें केलेले फ्रेंच भाषांतर एंगल्सच्या तपासणीनंतर १८८५ सालीं 'सोसियालीस्त' पत्रांत प्रसिद्ध झाले. १८९१ मधल्या पोलिश आवृत्तीला व १८९३ मधल्या इटालियन आवृत्त्यांनाही एंगल्सनें प्रस्तावना लिहिल्या.

[2] 'कम्युनिस्ट संघ' ही कामगारांची पहिली अंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटना होय. वेगवेगळ्या देशांतील पुढारलेल्या कामगारांचे व सोशॅलिस्टांचे तात्विक व संघटनात्मक एकीकरण घडवण्यांत मार्क्स व एंगल्सनें जी प्रचंड शक्ती कामी लावली होती तिनेंच संघाचा पाया घातला गेला. याच उद्देशानें त्यांनीं १८४६ सालीं ब्रूसेल मध्यें कम्युनिस्ट वार्तालाप कमिटीची स्थापना केली. वेतलींगचा ठोकळ-समताकरण 'कम्युनिझम' व प्रूधांची मध्यम-वर्गीय

मनोराज्यें व 'अस्सल' सोशियालिझम यांचा प्रभाव त्यावेळीं बऱ्याच कामगारांवर – विशेषत: 'न्यायप्रेमी संघा'च्या सदस्यांवर – होता. कामगार व शिल्पकारांच्या या गुप्त-मार्गी संघटनेच्या बऱ्याच शाखा त्यावेळीं इंग्लंड, फ्रांस, जर्मनी व स्विट्झर्लंडमध्यें होत्या. वरील तत्वज्ञानांशी अविश्रांत लढत घेऊन शास्त्रशुद्ध समाजवादाचा पाठपुरावा मार्क्स व एंगल्स यांनीं केला. मार्क्स व एंगल्सच्या विचारांची सत्यता पटून 'न्यायप्रेमी' च्या लंडन शाखेच्या नेत्यांनीं आपणांत सामील होऊन संघाची पुनर्घटना व कार्यक्रम रचना करण्याचे आमंत्रण १८४७ सालच्या जानूआरी अखेर मार्क्स-एंगल्सना केले, जे त्यांनीं मान्य केले.

'न्यायप्रेमींच्या संघा' ची १८४७ जूनमध्यें भरलेली लंडन परिषद 'कम्युनिस्ट संघा' ची प्रथम परिषद म्हणून इतिहासांत प्रसिद्धी पावली. परिषदेंत एंगल्स व वे. वोल्फनें भाग घेतला. संघाचे नांव 'कम्युनिस्ट संघांत' बदलण्यांत आले. "आपण मानव तेवढे बंधू!" ह्या पूर्वीचा भावना-प्रधान पण धुंधल्या घोषणेऐवजी "जगांतील कामगारांनो, एक व्हा!" अशी कामगार वर्गाच्या पक्षाला शोभेलशी आंतरराष्ट्रीय लढाऊ घोषणा स्वीकारण्यांत आली. परिषदेंत 'कम्युनिस्ट संघाच्या घटने' वरही विचार-विनिमय झाला, ज्याच्यांत एंगल्सनें सक्रिय भाग घेतला. नवीन घटनेंत कम्युनिस्ट चळवळीच्या अंतिम उद्दिष्टांची स्पष्ट मांडणी करण्यांत आली व कटवादी संघटनेचे रूप असणाऱ्या नियमांचे उच्चाटन करण्यांत आले. संघाची रचना लोकशाही तत्वांवर करण्यांत आली. घटनेंचे अंतिम स्वरूप कम्युनिस्ट संघाच्या द्वितीय परिषदेंत मान्य करण्यांत आले. २९ नोवेंबर ते ८ डिसेंबर, १८४७ पर्यंत लंडनमध्यें चाललेल्या या परिषदेंत मार्क्स व एंगल्सनें भाग घेतला. शास्त्रशुद्ध समाजवादाच्या तत्वांचा पुरस्कार अनेक दिवस चाललेल्या चर्चेत त्यांनीं केला. व परिषदेंनें एकमतानें या तत्वांचा स्वीकार केला. याच परिषदेच्या आदेशानुसार संघाचा कार्यक्रम मार्क्स व एंगल्स यांनीं लिहिला. व 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहिरनामा' या नांवाखाली १८४८ च्या फेब्रुआरींत तो प्रसिद्ध झाला.

१८४८ च्या फ्रेंच क्रांतीला सुरुवात झाली तेंव्हा कम्युनिस्ट संघाचे संचालन मार्क्सच्या नेतृत्वाखाली असलेल्या ब्रूसेल्स मंडल कमिटीच्या हातांत

संघाच्या लंडनमधील मध्यवर्ती कमिटीनें फेब्रुआरी १८४८ च्या अखेरीस सोपविले. ब्रूसेल्समधून मार्क्सला हद्दपार करण्यांत आले तेव्हां तो पॅरिस मध्यें येऊन राहिला. व नवीन मध्यवर्ती कमिटीचे स्थानही मार्च महिन्यापासून पॅरिसमध्यें कायम झाले. त्याच वेळीं मध्यवर्ती कमिटींत एंगल्सची निवड झाली. मार्च एप्रिल १८४८ मध्यें शेकडों जर्मन कामगारांना – (त्यांतील बहुसंख्यांक संघाचे सदस्य होते) – जर्मनींत परत पोचवण्याचे कार्य मध्यवर्ती मंडळानें केले. नुकत्याच सुरुं होत असलेल्या जर्मन क्रांतींत भाग घेणें हा त्यांच्या परतीचा उद्देश होता. या क्रांतींत कम्युनिस्ट संघानें घेतलेली राजकीय भूमिका मार्क्स एंगल्सनें मार्च अखेर तयार केलेल्या 'कम्युनिस्ट पक्षाच्या जर्मनींतील मागण्यां'त मांडली गेली.

एप्रिल १८४८ च्या सुरुवातीस मार्क्स, एंगल्स व त्यांचे सहकारी जर्मनींत आले. तेव्हां त्यांची खात्री झाली कीं जर्मनीची राजकीय दृष्ट्या मागासलेली स्थिती व तिच्या कामगारांचे विकेंद्रीकरण व राजकीय निरक्षरता पाहतां कम्युनिस्ट संघाचे देशभर विखुरलेले दोन तीन शें सदस्य बहुसंख्यांक जनतेवर आपला प्रभाव पाडूं शकत नाहीत. म्हणून लोकशाही चळवळीच्या जहाल डाव्या गटांत – जो खरोखरी कामगारांचेच प्रतिनिधित्व करत होता – सामील होण्याची गरज मार्क्स एंगल्सनीं ओळखली. व क्योल्न मधील 'लोकशाही सभेंत' स्वतः सामील होऊन आपल्या अनुयायांनाही लोकशाहीवादी संघटनांत सामील होण्याचा सल्ला त्यांनीं दिला, कीं ज्या योगें अशा संघटनांत क्रांतीकारी कामगारवर्गाची बाजू मांडली जाऊन मध्यम-वर्गीय धरसोडीला व भ्याडपणाला आळा घातला जावा व परिणामकारक चळवळीच्या मार्गावर या संघटना जाव्यांत. पण या बरोबरच स्वतंत्र कामगार सभा स्थापून कामगारवर्गाला राजकीय दृष्ट्या शिक्षित करण्याचाही आदेश त्यांनी दिला, कीं ज्या मुळें कामगारवर्गाच्या विशाल पक्षनिर्मितीचा पाया घातला जावा. मार्क्सनें चालविलेले "न्यू राइनीत्शे झीटूंग" हे वर्तमानपत्र "कम्युनिस्ट संघाचे" मार्गदर्शक व संघटनात्मक केंद्र बनले. इकडे १८४८ सालच्या अखेरीस कम्युनिस्ट संघाच्या लंडनमधील मध्यवर्ती समितीनें तुटलेल्या संबंधांचा धागा परत जोडण्याकरतां व संघाच्या पुनर्गठनेच्या उद्देशानें जोसेफ मोल्य याला दूत म्हणून जर्मनींत

पाठवले. पण १८४७ च्या घटनेंतील मूल तत्वांना धक्का लागेल असें बदल लंडनमधील मध्यवर्ती समितीनें केले होते. उदाहरणार्थ भांडवलशाही राजवट उलथून कामगारांची हुकूमत स्थापणें व वर्गरहित कम्युनिस्ट समाजाची रचना करणें ही ध्येयें सोडून तथाकथित "सामाजिक लोकतंत्रा" ची स्थापना हें संघाचे उद्दिष्ट बनवण्यांत आले. एकंदरींत, १८४८-४९ मधील मोल्यच्या जर्मनीतील हिंवाळीं यात्रेला यश आले नाही.

एप्रिल १८४९ मध्यें मार्क्स, एंगल्स व त्यांच्या अनुयायांनीं लोकशाही सभेंतून अंग बाहेर काढले. तोपर्यंत कामगारवर्गाला राजकीय अनुभव आलेला होता व मध्यम-वर्गीय लोकशाहीचा फोलपणा त्याला कळून चुकला होता. म्हणून कामगारवर्गाचा स्वतंत्र पक्ष स्थापण्याविषयीं आतां विचार होऊं शकत होता. पण हा विचार अमलांत आणणें कांहीं मार्क्स-एंगल्सना शक्य झाले नाही. नैऋत्य जर्मनींत त्याचवेळीं उठाव झाला व त्याचा पराभवही झाला. या पराभवानें जर्मन क्रांतीला मूठमाती दिली.

पण या क्रांतीनें एक धडा दिला कीं 'कम्युनिस्ट पक्षाच्या जाहिर-नाम्यांत' नमूद केलेली कम्युनिस्ट संघाची तत्वें हींच एकमेव बरोबर आहेत. कम्युनिस्ट संघाचा उपयोग क्रांतीकारी कार्याची शाळा म्हणून चांगला झाला – असें क्रांतीनें दाखवून दिले. वर्तमानपत्रांत, व शहरांतील व मैदानांतील लढायांत, प्रत्येक ठिकाणीं संघाचे सदस्य हिरीरीनें लढले व सर्वांत क्रांतिकारक वर्गाचे कामगारवर्गाचे शील त्यांनीं प्रत्येक ठिकाणीं रक्षण केले. पण क्रांतीच्या पराभवानें संघावर फार मोठा आघात झाला. कैक सदस्य तुरुंगांत पडले, कैक निर्वासित झाले किंवा बेपत्ता झाले, सदस्यांचे आपसांतील संबंध तुटले व सगळीकडे संघाच्या शाखा बंद पडल्या जर्मनीबाहेरच्या शाखांवरही या पराजयाचा बराच घातक परिणाम झाला.

१८४९ च्या शरदऋतूंत संघाचे बहुसंख्यांक नेतागण लंडनमध्यें जमले व मार्क्स-एंगल्सच्या नेतृत्वाखालील केंद्रीय समितीच्या परिश्रमानें १८५० च्या वसंतऋतूंच्या आधीच संघांत परत जीवन खेळूं लागले. १८५० च्या मार्च मध्यें मार्क्स-एंगल्सनीं "केंद्रीय समितीचे कम्युनिस्ट संघाला आवाहन" लिहिले. त्यांत १८४८-४९ च्या क्रांतीच्या मूल्यमापनाच्या आधारावर मध्यम-वर्गीय संसर्गाहून स्वतंत्र असा कामगारांचा पक्ष स्थापण्याची

आवश्यकता प्रतिपादन करण्यांत आली. 'आवाहनांत' पहिल्याप्रथम अखंड क्रांतीची कल्पना मांडण्यांत आली. कम्युनिस्ट प्रचाराचे नवीन मुखपत्र म्हणून "न्यू राईनीत्से झीटूंग, पोलितिश्शोकोनोमिश्शे रिव्यू" नें मार्च १८५० मध्यें जन्म घेतला.

१८५० च्या ग्रीष्म ऋतूंत मध्यवर्ती समितींत कम्युनिस्ट संघाच्या प्रात्यक्षिक हालचालींबद्दल गंभीर तात्विक मतभेद निर्माण झाले. यूरोपमधील परिस्थिती नजरेआड करुन व इतिहासाच्या अंतर्गत नियमांकडे लक्ष न देतां क्रांतीच्या उठावाचा प्रयत्न करण्याची पांथिक अट्टाहासाची नीति विल्लिख व शापेरच्या गटानें पुढे मांडली. मार्क्स-एंगल्सच्या नेतृत्वाखाली मध्यवर्ती समितींतील बहुसंख्येनें या नीतिला विरोध केला. व तिच्या उलट प्रतिक्रांतीच्या चढाईच्या काळांत शास्त्रशुद्ध कम्युनिझमचा प्रचार करणें व पुढें वाढून ठेवलेल्या क्रांतिकारी लढायांकरितां कामगार-योद्धे निर्माण करणें हें कम्युनिस्ट संघाचे मुख्य कर्तव्य आहे असें मार्क्स-एंगल्सनें सर्वांगीण पुराव्यानें दाखविलेः विल्लिख-शापेरच्या फूटपाडया कार्यवायांमुळें त्यांच्या गटाशी पुढें १८५० च्या सेप्टेंबरमध्यें झालेली तूट अटळच होती. या सालीं १५ सेप्टेंबरला भरलेल्या सभेंत मध्यवर्ती समितीचे सगळे हक्क कयोल्न् मधील मंडल-कमिटीला मार्क्सच्या सूचनेवरुन देण्यांत आले. संघाच्या जर्मनीतील सर्व स्थानीय शाखांनीं लंडन मध्यवर्ती समितींतील बहुसंख्येच्या निर्णयाचे स्वागत केले. मार्क्स-एंगल्सच्या निर्देशांप्रमाणें कयोल्नमधील नवीन मध्यवर्ती समितीनें डिसेंबर १८५० मध्यें संघाची नवीन घटना बनवली. पण पुलीस कार्रवाईमुळें व संघाच्या सदस्यांच्या धरपकडी मुळें मे १८५१ मध्यें संघाची जर्मनींतील कार्यवाही जवळ-जवळ बंद पडली. कम्युनिस्टांविरुद्ध चालवल्या गेलेल्या कयोल्न खटल्यानंतर मार्क्सनें स्वतःच संघाचे विसर्जन करण्याची सूचना केली; व १७ नोवेंबर १८५२ ला संघानें स्वतःचे विसर्जन घोषित केले.

कामगार-क्रांतिकारकांची शाळा म्हणून कम्युनिस्ट-संघानें मोठे ऐतिहासिक कार्य केले. संघ हा बीजरूप कामगारपक्ष होता; आंतरराष्ट्रीय कामगार मंडळाचा — पहिल्या इंटरनॅशनलचा — पूर्वावतार म्हणून संघानें काम केले.

[3] 'कोलोकोल' (घंटानाद) – प्रख्यात रशियन विचारवंत व क्रांतिकारक अलेक्सांदर इवानोविच ग्येर्त्सेननें आपल्या जिवलग मित्राच्या – रशियन कवी निकोलाय प्लतोनोविच अगाऱ्योव्ह्‌च्या – सहकार्यानें "सर्व जिवंत आत्म्यांना साद घालीन" या घोषवाक्याखाली लंडनमध्यें चालवलेले रशियन पत्र. ग्येर्त्सेननें लंडनमध्यें स्थापन केलेल्या 'स्वतंत्र रशियन छापखान्यां'त १८५७ पासून एप्रिल १८६५ पर्यंत हें पत्र संपादन झाले व नंतर १८६५ पासून डिसेंबर १८६८ पर्यंत जिनेव्हामध्यें निघाले. १८६८ मध्यें पत्र फ्रेंच भाषेंत निघत होते; पण त्याला रशियन पुरवणीची नेहेमी जोड असायची. "कोलोकोल"च्या कार्याचे मूल्यमापन लेनिननें लिहिलेल्या "ग्येर्त्सेनच्या स्मृतीस" या लेखांत सांपडेल.

[4] या टीपेचा समावेश 'कम्युनिस्ट पक्षाच्या जाहिरनाम्या'च्या १८९० मधल्या जर्मन आवृत्तींतही एंगल्सनें केला. फक्त शेवटले वाक्य त्यानें गाळले.

[5] नंतरच्या काळांतील आपल्या ग्रंथांत मार्क्स-एंगल्सनें "श्रमाची किंमत" किंवा "श्रमाची क्रयशक्ति" या ऐवजी मार्क्सनें परिसंपादित केलेल्या "श्रमशक्तिची किंमत" किंवा "श्रमशक्तिची क्रयशक्ति" या परिभाषांचा उपयोग करायला सुरुवात केली.

[6] 'फ्रेंच लेजिटिमिस्ट' म्हणजे १८३० मध्यें उलटलेल्या बूरबान राजवटीचे व मोठ्या परंपरागत जमीनदारांचे पाठीराखे. थैलीशहांच्या व मोठ्या भांडवलदारांच्या पाठींब्यावर राज्य करणाऱ्या ओर्लीन वंशाशी लढाई घेतांना आपण कामगारांचे हितसंरक्षण करत असल्याचा बाजा अनेक वेळां लेजिटिमिस्ट वाजवत असत.

'तरुण इंग्लंड' नावाचा गट टोरी पक्षांतील कांहीं राजकीय कार्यकर्त्यांनीं व साहित्यिकांनीं बनविला होता. गटाची स्थापना १८४०-१८५० च्या काळांत झाली. भांडवलदारांच्या वाढत्या आर्थिक व राजकीय शक्ति विरुद्ध जमीनदारी वरिष्ठांचा असंतोष या गटांतून व्यक्त होत होता. व आपल्या लढ्यांत कामगारांच्या पाठिंब्याचा उपयोग करण्याकरितां 'तरुण इंग्लंड'चे अनुयायी अनेक वेळां मुखर थापेबाजीचा उपयोग करत असत.

मार्क्स-एंगल्सनें या लोकांच्या विचारप्रणालीचे "सरंजामी समाजवाद" असें वर्णन 'कम्युनिस्ट पक्षाच्या जाहिरनाम्यांत' केले आहे.

[7] हा उल्लेख फ्रेंच 'सुधारकां' विषयीं आहे. 'रिफोर्मे' (सुधारणा) वर्तमानपत्राचे हे अनुयायी प्रजातंत्राच्या स्थापनेची व लोकशाही व सामाजिक सुधारणा करण्याची मागणी करत असत.

'ला रिफोर्मे' (सुधारणा) हें फ्रेंच दैनिक मध्यम-वर्गीय लोकशाहीवादी-गणतंत्रवादी विचारांचे मुखपत्र होते. १८४३ ते १८५० पर्यंत ते पॅरिसमध्यें चालले. आक्टोबर १८४७ ते जानेवारी १८४८ च्या काळांमध्यें एंगल्सचे कैक लेख या पत्रांत प्रसिद्ध झाले.

## वाचकांस

परदेशी भाषा प्रकाशन गृहाची विनंती आहे कीं भाषांतराच्या दर्जाबद्दल तसेंच पुस्तकाची मांडणी व छपाई याबद्दल स्वतःची टीका-टिप्पणी वाचकांनीं अवश्य पाठवावी. आपले विचार व सूचना यांचा स्वीकार कृतज्ञतापूर्वक केला जाईल.

आमचा पत्ताः
२१ झूबव्ह्स्किय् बुल्यवार,
मास्को, सोवियत संघ.

Редактор *П. Гладышев*
Корректор *З. Журкова*
Художественный редактор *В. Колганов*
Технический редактор *Л. Шупейко*

Подписано к печати 19.VII. 1963 г. Формат 84×108 $^{1}/_{32}$
Бум. л. $1^{1}/_{2}$. Печ. л. 4,92+3 вклейки. Уч.-изд. л. 5,64
Заказ 1298. Цена 20 коп. Тираж 11250

Московская типография № 3 Мосгорсовнархоза

**К. МАРКС и Ф. ЭНГЕЛЬС**

# МАНИФЕСТ КОММУНИСТИЧЕСКОЙ ПАРТИИ

*На языке маратхи*